प्रस्तावना :

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला पूर्वी पासूनच महत्वाचे स्थान आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा हिस्सा ६०.५ टक्के होता म्हणजेच निम्मयापेक्षा जास्त राष्ट्रीय उत्पन्न शेती क्षेत्रातुन प्राप्त होत होते. स्वातंत्र्यानंतर ही परिस्थिती बदललेली असली व राष्ट्रीय उत्पन्नातला शेतीचा वाटा निम्म्यापेक्षा कमी झालेला असला तरी अर्थव्यवस्थेतले शेतीचे महत्त्व टिकून आहे. तसेच प्रगत देशाशी तुलना करता भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा हिस्सा जास्त आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला असे असाधारण महत्त्व असल्यानेच स्वातंत्र्या-नंतर शेतीच्या विकासाचे सर्वांगिण प्रयत्न करण्यात आले. शेतीतले दोष काढण्यासाठी संस्थात्मक व संघटनात्मक सुधारणांची सुरवात झाली. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादन वाढीच्या प्रेरणा निर्माण होणे महत्वाचे होते. उत्पादकाला उत्पादित मालाला योग्य किंमत मिळाल्यास व शेतमालाच्या विपणनातील दोष नष्ट झाल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून शेतीच्या विकासाला मदत होईल अशी सरकारची अपेक्षा होती. शेतमालाच्या विपणनात सुधारणा होण्यासाठीचा अेक मार्ग म्हणून नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढविण्यात आली.

नियंत्रित बाजार पेठांचा विस्तार करण्यामागचे मुख्य हेतू शेतकऱ्यांचे शोषण थांबविणे व शेतमालाच्या किंमती उघड लिलाव पध्दतीने ठरविणे हे होते. शेती विकासाचा धोरणात्मक भाग म्हणून नियंत्रित बाजापेठांना आलेले हे महत्त्व लक्षांत घेऊनच प्रस्तुत अभ्यासासाठी नियंत्रित बाजारपेठेचा विचार करण्यात आलेला आहे.

अभ्यासाची रूपरेषा :

अ) समस्येची निवड :

वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत अभ्यासाचा विषय शेतमाळाची नियंत्रित बाजार आहे. नियंत्रित बाजापेठेच्या अभ्यासासाठी करमाळा नियंत्रित बाजार-पेठेचा विचार केलेला आहे. करमाळ्याची नियंत्रित बाजारपेठ स्थापन होऊन ४० वर्षे होऊन गेलेली आहेत. अशा जुन्या बाजारपेठेची निवड अभ्यासाच्या दृष्टिने अधिक योग्य वाटल्याने या बाजारपेठेचा प्रस्तुत अभ्यासासाठी विचार करण्यात आला . करमाळा तालुका दुष्काळ ग्रस्त भाग आहे. या तालुक्यात पुर्वापार करडीचे व शेंगाचे पिक घेतले जाते. करमाळयाची नियंत्रित बाजारपेठ स्थापन झाली तेव्हां या दोन तेलबियांचा नियंत्रित वस्तुमध्ये समावेश करण्यात आलेला होता. यामुळे या बाजारपेठेचा अभ्यास करत असताना तेलबियांच्या अभ्यासावर अधिक भर देणे योग्य वाटले शिवाय स्वत: संशोधक या भागातील रहिवासी असल्याने ही बाजारपेठ अभ्यासाच्या दृष्टीने व माहिती मिळवि-ण्यासाठी अधिक सोयिस्कर वाटली.

ब) अभ्यासाचा कालावधी :

करमाळा नियंत्रित बाजारपेठेची स्थापना १ जानेवारी १९४८ मध्ये झाली आहे. परंतु या अभ्यासासाठी १९७४-७५ ते १९८७-८८ हा १३ वर्षांचा कालावधी निवडला आहे. या कालावधीतील या बाजारपेठेच्या अभ्यासामुळे या बाजारपेठेतील शेतमालाच्या व विशेषत: तेलबियांच्या विपणनातील अलीकडील बदल समजू शकतील असे वाटल्याने या कालावधीची निवड करण्यात आली आहे.

क) अभ्यासाचे उद्देश :

१) करमाळा नियंत्रित बाजारपेठेच्या आवारात येणा-या एकूण शेतमालाच्या आवकेतील बदलाचा आढावा घेणे.

२) तेलबियांच्या आवकेतील बदलांचा अभ्यास करणे.

३) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्न खर्चाचा अभ्यास करणे.

४) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमुळे झालेले सर्व साधारण फायदे अभ्यासणे.

या प्रस्तुत प्रबंधात या उद्देशाने करमाळा बाजार समितीचा १९७४-७५ ते १९८७-८८ या काळावधीसाठी अभ्यास केला आहे.

ड) तथ्य संकलन :

तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीचा वापर केलेला आहे. दुय्यम सामुग्री म्हणून करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल वापरलेले आहेत. जेथे दुय्यम माहिती अपुरी वाटली तेथे प्रत्यक्ष माहिती मिळविण्यात आलेली आहे. प्राथमिक सामुग्री मिळविण्यासाठी आवश्यक तेथे प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखती या दोन पध्दतींचा वापर केलेला आहे.

फ) अभ्यासाची योजना :

प्रस्तावनेत शेती विकासाचा धोरणात्मक भाग म्हणून भारतात नियंत्रित बाजारपेठांच्या विकासाला महत्व आले. अशा पार्श्वभूमीवर अभ्यासाची रूपरेषा स्पष्ट केली आहे.

विपणनाची सर्वसाधारण संकल्पना व शेतमालाच्या विपणनाची वैशिष्टये आणि फायदे यांचा आढावा पहिल्या प्रकरणात घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणात भारतातील कृषी विपणनाची स्वातंत्र्यालगतची स्थिती व सद्य:स्थिती मांडली आहे.

करमाळा तालुक्याची आर्थिक रूपरेषा प्रकरण तिनमध्ये मांडली आहे.

चौथ्या प्रकरणात करमाळा नियंत्रित बाजारपेठेचे विश्लेषण केले आहे. हे विश्लेषण -

भाग १ : कृषी उत्पन्न बाजार समिती करमाळा

भाग २ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतमालाची आवक.

भाग ३ : तेलबियांच्या आवकेमधील बदल .

भाग ४ : करमाळा कृषी उत्पन्नाबाजार समितीची वित्तिय स्थिती.

भाग ५ : करमाळाकृषी उत्पन्न बाजार समिती नमुना पाहणी.

अशा पांच भागात करण्यात आलेले आहे. शेवटच्या प्रकरणात या अभ्यासाचे निष्कर्ष मांडले आहेत.

परिशिष्ट १ मध्ये १९६३ च्या महाराष्ट्र राज्याच्या बाजार कायद्यातील ठळक वैशिष्टये मांडली आहेत.

परिशिष्ट २ मध्ये करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे कांही महत्वाचे उपनियम मांडले आहेत.

प्रबंधाच्या शेवटी प्रश्नावली व संदर्भ सुची दिली आहे.

...

प्रकरण १ ले

## कृषी विपणनाची वैशिष्टये व महत्त्व

### अ) विपणी अथवा बाजार म्हणजे काय ?

प्रस्तुत अभ्यासाचा संबंध कृषी उत्पादन बाजाराशी अथवा विपणनाशी असल्याने अभ्यासाच्या सुरवातीला विपणी म्हणजे काय ? याचा थोडक्यात विचार केलेला आहे.

२० व्या शतकात वस्तु निर्मिती इतकेच महत्त्व वस्तुंच्या विपणीला आहे. प्रगत देशात अेक विशेष शास्त्र म्हणून विपणनाचा अभ्यास सुरु आहे. मानव समाजाच्या प्रगतीचा आणि विपणनाचा नजीकचा संबंध असल्याचे आढळून येते.

मानवी गरजांची तृप्ती हा आर्थिक व्यवहारांचा अंतिम हेतू असतो. या गरजांच्या तृप्तीसाठी मनुष्य विविध वस्तुंचे उत्पादन करु लागला. अशा वस्तुंचा विनिमय सुरु झाला. परंतु मानव समाजाच्या गरजा सुरवातीला अत्यंत मोजक्या असल्याने प्रत्येक व्यक्ती आपापली गरज भागवू शकत होती. गरजा जशा वाढू लागल्या तशी गरज भागविणा-या वस्तुत विनिमयाची सुरूवात झाली. सुरवातीला हा विनिमय कुटुंबा-कुटुंबात अथवा एकाच गावात होत असे. वाहतुकीच्या साधनांच्या विकासाबरोबर विनिमय व्यवहार वाढत गेले. पैशाच्या शोधामुळे वस्तुंच्या खरेदी विक्रीचे व्यवहार वाढले. उत्पादित झालेला माल गरजु व्यक्तीपर्यंत पोचविणारा व्यापारी वर्ग उदयाला आला. विपणनाची अशा त-हेने क्रमश: वाटचाल झाली.

१७५० च्या सुमारास इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन पध्दतीत आमूलाग्र बदल झाले. मोठया प्रमाणावर उत्पादनाची सुरवात झाली. हे

उत्पादन खपविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. विपणन व्यवहार त्यामुळे गुंतागुंतीचे झाले. वाहतुकीच्या आधुनिक साधनांच्यामुळे विपणनाच्या भौगोलिक मर्यादा संपल्या विपणन हे स्वतंत्र शास्त्र बनले.

विपणन या शब्दाची व्युत्प-त्ती लक्षात घेतल्यास विपणनाचा अर्थ व्यापार अथवा धंदयाची जागा असा घ्यावा लागेल. सर्व सामान्यत: व्यवहारातही विपणन म्हणजे खरेदी व विक्रीदारांच्या आपापसातील व्यवहारांची जागा असाच अर्थ घेतला जातो.×

विपणनाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विपणनाच्या काही व्याख्या विचारात घेतल्या आहेत.

अमेरिकन विपणन संघाच्यामते "उत्पादन ते उपभोग असा वस्तु आणि सेवाचा प्रवास प्रवाहित ठेवण्यासाठी कामी येणा-या व्यापारी क्रिया म्हणजे विपणन", तर कान्व्हर्स, हयुजी आणि मिचेल यांच्यामते स्थल, काल व मालकिच्या उपयोगितेच्या निर्मितीत अंतर्भूत असणा-या सर्व क्रिया म्हणजे विपणन" विल्यम स्टॅन्टन विपणन म्हणजे अनेक क्रिया मिळून झालेली एक प्रणाली असे म्हणतात. तर जॉन फ्रिमन पाईल "विपणन ही व्यावसायिक कार्यांची अवस्था आहे. या मार्फत वस्तु व सेवांचा विनिमय करून मानवी गरजा पूर्ण करण्यात येतात. विपणनामध्ये उत्पादक किंवा विक्रेता स्वत:कडे असलेल्या अतिरिक्त वस्तुंची विक्री करतो व उपभोक्ता किंवा ग्राहक स्वत:च्या गरजांची पूर्तता करतो"[१]. अशी विपणनाची व्याख्या देतात.

---

* Foot Note: The word is derived from the lation word mercatus from the verb mercari which means to trade. It came to signify a Public place in which goods and services are bought and sold.

Foot Note:
(विपणन (Market) व विपणन क्रिया (Marketing) या संकल्पनातही फरक केला जात असल्याचे आढळते. विपणन म्हणजे विक्रेते व खरेदीदार यांच्यातील संपर्काची पध्दत अथवा जागा तर मार्केटिंग म्हणजे वस्तु व सेवांच्या मालकी हक्कातील बदलासाठी व या वस्तुंच्या वाटपासाठी आवश्यक असणा-या सर्व क्रिया असा फरक) या दोन संकल्पनात केल्याचे दिसून येते.

या व्याख्यांवरून विपणन म्हणजे केवळ वस्तुंची खरेदी विक्री असा मर्यादित अर्थ घेता येत नाही. विपणनामध्ये वस्तुंच्या खरेदी व विक्रीसाठी सहाय्य करणा-या अनेक क्रियांचा समावेश होतो. विपणनाचा अंतिम हेतू वस्तु उपभोक्त्यापर्यंत पोहचविणे हा असतो. विपणनामध्ये वस्तुंची खरेदी-विक्री, वाहतूक, साठवण, खरेदी विक्रीसाठी आवश्यक असणारा पैसा बाजार माहिती व प्रमाणीकरणाच्या सोयी अशा अनेक घटकांचा समावेश करावा लागतो.

ब) कृषी उत्पादन विपणी अथवा बाजार:

विपणीमध्ये विविध प्रकारच्या वस्तुंचे व्यवहार होत असतात. या वस्तुंचे स्थूलमानाने व अभ्यासाच्या सोयीसाठी तिन प्रकार पाडले जातात.

| | |
|---|---|
| निर्मित उपभोक्त्यांच्या वस्तु | (Manufactured on goods) |
| औद्योगीक वस्तू | (Industrial goods) |
| कृषी वस्तू | (Agricultural goods) |

पैकी कृषी वस्तुमध्ये कृषी क्रियेतून अथवा कृषी कलेतून निर्माण होणा-या वस्तु समाविष्ठ केल्या जातात. अधिक व्यापक अर्थाने कृषी वस्तुंमध्ये कृषीशी पूरक असणा-या व्यवसायातून निर्माण होणा-या वस्तुंचाही समावेश केला जातो. कृषीत निर्माण होणारा विक्री योग्य वाढावा उपभोक्ते किंवा ग्राहकांच्या पर्यंत पोहचविण्याच्या प्रक्रियेला कृषी विपणी अथवा बाजार म्हणता येईल. कृषी उत्पादन विपणनाचे स्वरूप उपभोक्त्यांच्या अथवा औद्योगिक उत्पादनाच्या विपणनापेक्षा वेगळे असते. कृषी वस्तुंच्या वैशिष्टयांमुळे कृषी उत्पादन विपणनात काही समस्याही निर्माण होतात. कृषी उत्पादन विपणनाची काही वैशिष्टये खालील प्रमाणे -

१) कृषी उत्पादन विपणनही औद्योगिक वस्तू विपणनाच्या तुलनेत दीर्घकालीन क्रिया असते. या क्रियेत अधिक मध्यस्थ गुंतलेले असतात.

२) कृषी उत्पादन हंगामी असते. परंतु अशा उत्पादनासाठी असणारी मागणी मात्र बारमाही असते. यामुळे अशा उत्पादनाची विक्री साठवण व वाहतूक यावर तीव्रतम ताण ( Peak load ) येतो. त्यामुळे कृषी उत्पादन विपणनाचा खर्च वाढावयास मदत होते.

३) यंत्र निर्मित वस्तुंच्या तुलनेत शेतात वस्तुंचे उत्पादन लहान प्रमाणावर होते. न्यून विकसित देशात अशी परिस्थिती अधिक आढळते. यामुळे एकटा दुकटा शेतकरी विपणनावर व किंमतीवर आपला प्रभाव पाडू शकत नाही. लहान प्रमाणावरील उत्पादनामुळे उत्पादनाची प्रत करणे अवघड होते. वाहतूक खर्चात काटकसर करता येत नाही. शेतक-यांला मध्यस्थावर अधिक अवलंबून रहावे लागते.

४) कृषि उत्पादन अवजड (bullcy) असल्याने वाहतूक खर्च अधिक येतो. शेती उत्पादन बहुतांशी नाशवंत, स्वरूपाचे असल्याने अशा वस्तूसाठी शीत गृहांच्या सोयी आवश्यक असतात. तर ज्या वस्तु तुलनात्मक दृष्टया अधिक काळासाठी टिकू शकतात. त्याना योग्य साठवण सोयी उपलब्ध नसल्यास त्यांचा दर्जा कमी होतो. यामुळे कृषी उत्पादन विपणनात योग्य साठवण सुविधा आवश्यक असतात. याचा परिणाम पुन्हा कृषी विपणनाचा खर्च वाढण्यावर होतो.

५) नैसर्गिक परिस्थीतील फरकामुळे प्रदेशानुसार अथवा काळानुसार शेती उत्पादनाचा दर्जा बदलतो. नैसर्गिक आपत्तीचा कृषी उत्पादनावर परिणाम होतो. कृषी उत्पादनातील अशा अनिश्चिततेमुळे वाहतुकीची साधने व उत्पादन साठवणाच्या सोयीच्या मागणीवर परिणाम होतो. तुलनात्मक विचार केल्यास यामुळेच कृषी उत्पादन विपणी अन्य वस्तूंच्या बाजारापेक्षा अधिक गुंतागुंतीची आहे.२

क) <u>कृषी विपणनाचे महत्व</u> :
(Significance of Agricultural Marketing)

१) <u>अर्थिक विकासाला उपयुक्त</u> :

शेती पध्दतीत प्रमुख दोन घटक आहेत. ते म्हणजे उत्पादन आणि

विपणन. शेतीमालाचे विपणन हे शेती मालाच्या उत्पादनापेक्षा जास्त महत्वाचे आहे. उत्पादक आणि उपभोक्ता यांच्यात समन्वय साधण्यात विपणन व्यवस्थेचा महत्वाचा सहभाग असतो. हा सहभाग फक्त उपभोक्ते आणि उत्पादक यांच्यात समन्वय साधण्यासाठीच मर्यादित नसून तो आर्थिक विकास वाढविण्यासाठी सुध्दा महत्वाचा असतो.

शेतीच्या विकासात उत्पादनाच्या वाढीबरोबर विपणन व्यवस्थेचा देखील महत्वाचा वाटा असतो. प्राचीन काळी अशी म्हण होती की " उत्कृष्ट शेतक-याचा एक डोळा नांगरावर व दुसरा डोळा बाजार पेठेवर असतो"[3] याचा अर्थ शेती विकास हा फक्त उत्पादनाच्या वाढीवर अवलंबुन नसून तो शेतमालाच्या विक्री व्यवस्थेवर देखील अवलंबुन असतो.

कृषी मालाचे विपणन ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी, त्या गावातील, तसेच भोवतालच्या खेडे गावातील अनेक लोक माल विकण्यासाठी व खरेदी करण्यासाठी एकत्र येतात. या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार होत असतो. म्हणजेच जीवनावश्यक वस्तुंची विक्री व उपलब्धता होण्याच्या दृष्टीने कृषी विपणन व्यवस्थेला महत्त्व प्राप्त होते. हे महत्त्व आर्थिक स्वरूपा बरोबर सामाजिक स्वरूपाचे देखील असते. बाजाच्या निमि-ताने एकत्रित आलेले लोक कौटुंबिक व सामाजिक अडीअडचणीचा विचार करत असतात. अशा प्रकारे कृषी विपणनाचे आर्थिक व सामाजिक स्वरूपाचे महत्त्व सांगता येईल.

प्रा. सोवनी म्हणतात "किंमतीच्या चढ उताराप्रमाणे उत्पादन कमी जास्त करण्याची शक्ती व शक्यता शेतीत सर्वात कमी असते. त्या मानाने बिगर शेती व्यवसायात ती जास्त असते. याचा अर्थ शेतकरी या बाबतीत बिगर शेतकी उत्पादनापेक्षा जास्त परावलंबी असतो[४]". शेतक-यांचे हे परावलंबन कमी करण्यासाठी शेतीतून उत्पादित होणा-या उत्पादनाला त्याच्या उत्पादन व्यया एवढी किंमत मिळणे आवश्यक असते. शेती मालाला योग्य किंवा उत्पादन व्यया एवढी किंमत प्राप्त होण्यासाठी कृषी विपणन व्यवस्था कार्यक्षम किंवा सुविधा पूर्ण असणे आवश्यक असते.

२) <u>कृषी उत्पादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विपणन व्यवस्थेचे महत्त्व</u>:

उत्पादित वस्तु किंवा सेवा जो पर्यंत ग्राहकांच्या पर्यंत पोहचत नाहीत तो पर्यंत उत्पादनाची प्रक्रिया पुर्ण होत नाही. कृषी विपणनामुळे शेतीत उत्पादित होणारा शेतमाल ग्राहकांच्या पर्यंत पोहचविण्याची प्रक्रिया पार पाडली जाते. त्यामुळे कृषी उत्पादनाची प्रक्रिया पुर्ण करण्याच्या दृष्टीने कृषी विपणन व्यवस्थेचे महत्त्व आहे.

कृषी विपणनात समाविष्ठ असणा-या प्रक्रिया कृषी उत्पादनाची प्रक्रिया पुर्ण करण्याच्या दृष्टीने केल्या जातात. एक, शेती उत्पादन हे विस्तीर्ण भौगोलीक क्षेत्रात होते. त्या उत्पादनाचे एकत्रीकरण विपणन व्यवस्थे द्वारे केले जाते. दुसरे, एकत्रित केलेल्या शेतमालाचे दर्जानुसार वर्गीकरण करण्याची प्रक्रिया विपणन व्यवस्थे द्वारे पार पाडली जाते. शेती मालाला योग्य किंमत मिळविण्यासाठी शेतमालाची वाहतूक व साठवणुक करण्याची प्रक्रिया विपणनामुळे होते. तसेच हा शेतीमाल व्यापा-यांच्या मार्फत ग्राहकांच्या पर्यंत पोहचविण्याची प्रक्रिया कृषी विपणन व्यवस्थे द्वारे केली जाते.

म्हणजेच कृषी उत्पादनाची प्रक्रिया पुर्ण करण्याच्या दृष्टीने कृषी विपणन व्यवस्थेचे महत्त्व आहे.

३) <u>उत्पादकाला योग्य किंमत प्राप्त होते</u>:

कृषी विपणन व्यवस्था ही उत्पादकाला किंवा शेतक-याला त्याच्या शेतमालाला रास्त किंमत प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

एखाद्या अर्थव्यवस्थेत कृषी विपणनाच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नसतील तर त्या अर्थव्यवस्थेत शेतीतून उत्पादित होणा-या मालाला योग्य किंमत प्राप्त होत नाही.

या उलट एखाद्या प्रगत अर्थव्यवस्थेत कृषी विपणनाच्या सुविधा योग्य प्रमाणात उपलब्ध असतील तर शेती मालाला रास्त किंमत प्राप्त होते. रास्त किंमत प्राप्त होण्याची कारणे बाजार पेठ पुर्ण पणे नियमित व नियंत्रित असल्यामुळे या बाजार पेठेत मध्यस्थांचे अस्तित्व असत नाही. त्याच प्रमाणे उघड लिलाव पध्दतीने शेतमालाची किंमत ठरविली जात असल्यामुळे शेतक-यांची फसवणुक होण्याची शक्यता नसते. जर एखाद्या शेतक-याला चालु किंमतीला आपल्या मालाची विक्री करण्याची इच्छा नसेल तर शासनाने निर्माण केलेल्या साठवणुक सुविधांचा फायदा शेतकरी घेवू शकतो. हाँ शेतकरी शेतमालाची विक्री थांबवु शकतो.

थोडक्यात असे सांगता येईल की कार्यक्षम कृषी विपणन व्यवस्था उपलब्ध असणा-या अर्थव्यवस्थेत शेती माल उत्पादकाला त्याच्या उत्पादनाला रास्त किंमत प्राप्त होते.

४) <u>उपभोक्त्याला योग्य किंमतीला शेतमाल उपलब्ध होतो</u>:
<u>किंवा उपभोक्त्याच्या दृष्टीने महत्त्व</u>:

कार्यक्षम कृषी विपणन ज्या प्रमाणें उत्पादकाला उपयुक्त ठरते त्याच प्रमाणे उपभोक्त्यांना सुध्दा उपयुक्त ठरते नियंत्रित विक्री व्यवस्थेत मध्यस्थांचे अस्तीत्व कमी असल्यामुळे शेतक-यांना मिळणारी किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यांच्यात फारशी तफावत निर्माण होत नाही. मध्यस्थांच्या लांबलचक साखळीमुळे उपभोक्त्यांचे होणारे आर्थिक शोषण कमी होते.

विपणनाची योग्य सुविधा उपलब्ध असलेल्या अर्थव्यवस्थेत ग्राहकांना मिळणारा शेतमाल निर्भेळ असतो. कारण शेत मालाचे दर्जानुसार वर्गीकरण केलेले असते. तसेच चांगल्या विक्री व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे ते असे की विक्रीसाठी उपलब्ध केला जाणारा शेतमाल हा निर्भेळ असतो. त्यामुळे जास्त किंमत देणा-या ग्राहकांना योग्य प्रतिचा शेत माल प्राप्त होतो.

ग्राहकांना योग्य किंमतीला शेतमाल उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कृषी विपणनाचे महत्त्व आहे.

५) कृषी विकासात कृषी विपणनाचे महत्व:

शेतीचा विकास करण्यासाठी कृषी विपणनाला विशेष महत्व असते. शेतक-यांला उत्पादित मालाला वाजवी किंमती मिळाल्या तर शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारते. शेतीत आवश्यक असणा-या सुधारणा शेतकरी अशा परिस्थितीत करू शकतो. उत्पादन वाढीची प्रेरणा निर्माण होते. परिणामी शेतीच्या विकासाला चालना मिळते.

कृषी विकासासाठी राबविलेल्या कार्यक्रमाचे (Programme )यश हे विपणन यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर अवलंबुन असते असे मानले जाते.[५]

६) औद्योगिकरणाच्या दृष्टीने कृषी विपणनाचे महत्व:

अर्थव्यवस्थेच्या औद्योगिकरणासाठी शेती उत्पादनात वाढ होणे गरजेचे असते. शेतीवर आधारलेल्या उद्योगांना सातत्याने कच्या मालाचा पुरवठा होण्यासाठी शेतीत उत्पादित होणा-या वस्तुंना योग्य किंमत प्राप्त होणे गरजेचे असते. रास्त किंमत प्राप्त करण्याचे कार्य कृषी विपणन व्यवस्था करत असते. जर एखाद्या अर्थव्यवस्थेत कार्यक्षम कृषी विपणन व्यवस्था असेल तर शेतमालाला रास्त किंमत प्राप्त होईल.

दुसरे असे सांगता येईल की औद्योगिकरणासाठी मोठया प्रमाणावर कामगार वर्गाची आवश्यकता असते. या कामगारांना लागणारा अन्नधान्याचा पुरवठा शेती क्षेत्रातुनच होत असतो. हा पुरवठा वाढविण्यासाठी उत्पादकांना योग्य किंमत मिळणे आवश्यक असते. कृषी विपणनामार्फत उत्पादकांना योग्य किंमत प्राप्त झाल्यास उत्पादन वाढीला चालना मिळते व कामगारांना अन्न धान्याचा पुरेसा पुरवठा होऊ शकतो.

थोडक्यात असे सांगता येईल की कृषी विपणन व्यवस्थेमुळे औद्योगिकरणासाठी आवश्यक असणारा कच्या माल व अन्नधान्य यांच्या उत्पादनात वाढ होते. उत्पादनात वाढ झाल्यामुळे औद्योगिकरणातून उत्पादित होणा-या वस्तुंची मागणी

वाढते व त्यापुन पुन्हा औद्योगिकरणाचा वेग वाढतो. अशा प्रकारे कृषी विपणन व्यवस्थेचे औद्योगिकरणासाठी महत्व सांगता येईल.

७) सुस्थितीतील कृषि विपणन हे शेती उत्पादनातुन विक्री योग्य वाढावा एकत्र करण्यास उपयुक्त:

देशाच्या आर्थिक विकासासाठी जास्तीत जास्त विक्री योग्य वाढावा कृषी क्षेत्रातुन निर्माण करणे आवश्यक असते. हे विक्री योग्य आधिक्य एकत्र करण्याचे कार्य विपणन यंत्रणा पार पाडते. कार्यक्षम विपणन व्यवस्था असल्यामुळे ती लहान शेतक-यांना कृषीआदानांचा पुरवठा करते व त्यातुन उत्पादनात वाढ होते. वाढीव उत्पादन गोळा करण्यासाठी विपणन व्यवस्थे मार्फत सुलभ वाहतूकीच्या व साठवणुकीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. शिवाय बाजारात शेत मालाला योग्य किंमत प्राप्त होईपर्यंत शेतक-यांना हवा असणारा कर्जपुरवठा विपणन यंत्रणेमार्फत केला जातो. या सर्व कार्यामुळे शेतक-यांचे उत्पन्न वाढते व त्यातुन ते उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतात. उत्पादन वाढल्यानंतर विक्री योग्य वाढावा जास्त प्रमाणात निर्माण होतेर.

थोडक्यात असे म्हणता येईल की कृषी विपणनाचे अनेक फायदे असतात. परंतु हे फायदे मिळविण्यासाठी योग्य कृषी विपणनाची गरज असते.

...

संदर्भ :


१) प्रा. अशोक श्री. बोरीकर, प्रा. पी.आर. कुळकर्णी :
भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार,
पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर-१९८४, पान नं. ८६

२) C.N. Sontakki, R.G. Deshpande : Marketing Salesmanship and Advertising, Page No. 71,72.
Ravi-Chandra Publication, Belgaum.

३) प्रा. अशोक श्री. बोरीकर, प्रा. पी.आर. कुळकर्णी :
भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार, पिंपळापुरे ॲण्ड कं.
पब्लिशर्स, नागपुर-१९८४, पान.नं. ८५.

४) अर्थ संवाद : खंड ६ अंक २, जुलै-सप्टेंबर, १९८२ पान नं. ५९.

५) A Sivarama Prasad : Agricultural Marketing in India, Mittal Publications, Delhi-110035 (India) 1985.
Page No. 223.


...

प्रकरण २ रे

## भारतातील कृषी विपणन

### अ) स्वातंत्र्या लगतच्या काळातील भारतातील कृषी विपणनाची परिस्थिती :

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेंव्हा भारताची कृषी विपणन व्यवस्था असमाधानकारक होती. स्वातंत्र्य पूर्व काळात या व्यवस्थेत बदल होण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे असल्यामुळे फारसे परिणाम कारक ठरले नव्हते. स्वातंत्र्या लगतच्या काळात भारतातील कृषी विपणन व्यवस्थेत खालील दोष ठळकपणे आढळत होते.

#### १) खेडयात शेतमालाची मोठया प्रमाणात विक्री :

आपापल्या खेडयात शेतमालाच्या उत्पादकांकडून शेतमालाची विक्री मोठया प्रमाणात होत असे शेतक-यांचा कर्जबाजारीपणा, वाहतूकीच्या सोयींचा अभाव, पैशाची तातडीची गरज इत्यादी अनेक कारणांमुळे शेतमाल सर्वात नजिकच्या बाजारपेठेत म्हणजे खेडयातच हंगामानंतर लगेचच फार मोठया प्रमाणात विकला जात असे. अयोग्य वेळेला व अयोग्य ठिकाणी होणा-या शेतमालाच्या अशा विक्रीमुळे शेतक-याला उत्पादित मालाला किंमतीही कमी मिळत असत १९५१ मध्ये भारत सरकारने नियुक्त केलेल्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा समितीच्या मते व्यापा-यांमार्फत होणा-या एकंदर विक्री व्यवहारापैकी जवळ जवळ २/३ वस्तु खेडयातच विक्रीला आणल्या जात असत. कापूस विपणन समितीने १९५२ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार भारतात कापसाच्या एकंदर विक्री पैकी सरासरीने ७२ .४ टक्के कापसाची विक्री खेडयातच होत असे. वेगवेगळया प्रांतात ग्रामीण भागात कापसाची विक्री या प्रमाणे होती.

कोष्टक १

कापसाच्या ग्रामीण विक्रीचे प्रमाण :

| प्रांत | कापसाच्या ग्रामीण विक्रीचे शेकडा प्रमाण |
|---|---|
| मद्रास | ८७ . ० |
| खानदेश | ८१ . ४ |
| पंजाब | ८० . ५ |
| मध्यगुजराथ | ८१ . ० |
| व-हाड | ३२ . ० |

संदर्भ : प्रा. सौ. शांता पंडीत / डॉ. लीला पाटील

कृषी अर्थशास्त्राची मूलतत्वे

पान नं. ३०७

२) मध्यस्थांचे अस्तित्व :

स्वातंत्र्यालगतच्या काळात भारतातील कृषी विपणन व्यवस्थेत उत्पादक व ग्राहक यांच्यात मध्यास्थांची लांबलचक साखळी होती. यामुळे उत्पादक व ग्राहक या दोन्ही वर्गाचे शोषण होत आसे.

गहू, शेंगा, कापूस, ताग, बटाटे, तांदूळ अशा सर्व शेतमाला बाबत अनेक मध्यस्थ असत सर्वसाधारणपणे शेतकरी व ग्राहक यांच्यात १० ते १२ पर्यंत मध्यस्थ असत. या संदर्भात केलेल्या बाजार सर्वेक्षणानुसार ग्राहकाने तांदुळाला १ रुपया दिल्यास त्यातील केवळ ५२ पैसे उत्पादकाला मिळत तर ग्राहकाच्या संदर्भात ५७ पैसे मिळत. याचा परिणाम शेतीव्यवसायावरही अनिष्ट होत असे.[१]

३) वजने व मापे यांची विविधता :

स्वातंत्र्या लगतच्या काळात वेगवेगळ्या प्रदेशात व वेगवेगळ्या बाजारपेठेत

वेगवेगळी वजने व मापे वापरण्यात येत असत. तसेच वजना मापांचा हिशेब करणे सुलभ नसे. यामुळे शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत गंतागुत, अनिश्चितता व गोंधळ निर्माण होण्याला मदत होत असे. वजना मापातील विविधतेचे खालील अनिष्ट परिणाम होत.

३:१) अज्ञानी व अडाणी शेतक-यांना फसविण्याची संधी व्यापारी वर्गाला उपलब्ध होत असे.

३:२) दोन ठिकाणी भिन्न वजने मापे वापरल्याने कारणाशिवाय हिशेबात गुंतागुत होत असे अशी गुंतागुंत व्यापा-याला पोषक ठरत असे.

३:३) भारतातील कृषी विपणनाबाबत अचूक व एकसुत्री संख्याशास्त्रिय माहिती देणे अवघड होत असे.

स्वातंत्र्या लगतच्या काळातील वजने व मापे यांतील भिन्नता बी. एन्. सरकार यांनी कांही प्रमाणात स्पष्ट केली होती. यांनी १४२६ बाजार पेठांची पाहणी केल्यानंतर " शेर " या मापाचे परिमाण वेगवेगळे असल्याचे दिसून आले. या एका शराचे परिमाण ४८ तोळयापासून ८० तोळयापर्यंत होते. हीच गोष्ट " मण " या परिमाणा बाबत होती. एक मण परिणामाबरोबर २१$\frac{१}{२}$– शेरापासून ते ७२ शेरा पर्यंत होते.[२] यावरून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्या लगतच्या काळात भारतातील कृषी विपणन व्यवस्थेत वजना मापातील विविधता हा दोष होता.

४) <u>साठवणुकीच्या सोयींचा अभाव</u> :

बाजार पेठेत योग्य वेळी त्या प्रमाणात दर्जेदार शेतमाल उपलब्ध करावयाचा असेल तर शेतमालाची शास्त्रिय पध्दतीने साठवणुक करणे आवश्यक असते. भारतात स्वातंत्र्यालगतच्या कालावधीत साठवणुकींच्या पुरेशा व शास्त्रशुध्द सोयींचा अभाव होता. या सोयींच्या अभावी शेतक-याला हंगामालगतच्या काळातच आपला माल विकावा लागत असे. परिणामी त्याच्या मालाला पुरेशा किंमतीही मिळत नसत.

१९५७ मध्ये भारतसरकारने नेमलेल्या अन्नधान्य चौकशी समितीच्या मते शेतमालाची साठवण करण्यासाठी अशास्त्रिय पध्दतीचा उपयोग केल्यामुळे साठविलेल्या मालाच्या १.५ टक्के शेतमालाची नासधुस होत होती. १९५७ मध्ये स्थापन झालेल्या गोदाम महामंडळाने असे मत व्यक्त केले होते की शेतमालाची साठवण करण्याकरीता पुरेशा सोयी नसल्यामुळे तसेच अशास्त्रिय पध्दतीच्या साठवणुकी मुळे एकुण उत्पादित शेतमालाच्या ८ ते २० टक्के शेतमाल वाया जातो.[3]

यावरून साठवणुकीच्या सोयीची परिस्थिती भारतात स्वातंत्र्यालगतच्या काळात किती असमाधान कारक होती हे स्पष्ट होईल.

५) वाहतूकीच्या सोयींचा अभाव :

उत्पादित शेतमाल शेतापासून घरापर्यंत आणि घरापासून बाजार पेठे पर्यंत पोहचविण्यासाठी कार्यक्षम व स्वस्त वाहतूक व्यवस्था होत नाही तो पर्यंत शेतक-यांना त्यांच्या मालाला योग्य किंमत प्राप्त होत नाही. स्वातंत्र्या लगतच्या काळात भारतात वाहतूकीच्या साधनांचा फारसा विकास झालेला नव्हता. शेतकरी मालाच्या वाहतूकीसाठी खेचरे उंट व बैलगाड्यांचा वापर मुख्यत्वे करत असत. यामुळे वाहतूकीचा खर्च जास्त येत असे व वाहतूकीला वेळ ही अधिक लागत असे. सहाजिकच उत्पादित माल स्थानिक बाजारपेठेत विकणे शेतकरी पंसद करी. भारतात रस्ते वाहतूकीची परिस्थिती अन्य देशांच्या तुलनेत किती असमाधानकारक होती हे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होईल. १९५६-६६ या दशकांत भारतात दर १०० चौरस मैलामागे रस्त्यांचे प्रमाण केवळ ५२ मैल होते. तर फ्रान्स इंग्लड आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशात हेच प्रमाण अनुक्रमे ४३०, २०१ व १०१ मैल होते.[४]

६) शेतमालाच्या प्रतवारीच्या सोयींचा अभाव :

शेतमालाला योग्य किंमत येण्यासाठी शेतमालाची प्रतवारी ठरविणे आवश्यक

असते. १९३७ च्या कायद्यानुसार अशा सुविधा उपलब्ध झालेल्या असल्या तरी या सुविधांची व्याप्ती मर्यादित होती.

शेतमालाची योग्य पध्दतीने प्रतवारी होत नसल्यामुळे चांगल्या दर्जाच्या मालाला अधिक किंमत प्राप्त होत नसे. परिणामत: चांगले बियाणे वापरून चांगला माल उत्पादित करण्याला शेतक-याला प्रोत्साहन मिळत नसे.

७) <u>बाजार माहितीचा अभाव</u> :

भारतीय शेतकरी ज्या मालाचे उत्पादन करतो त्या मालाच्या बाजारासंबंधी अद्यावत व पुरेशी माहिती देणा-या यंत्रणेचा भारताच्या कृषी विपणनात अभाव होता. अशी माहिती शेतमालाला योग्य किंमत मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. जो पर्यंत बाजार पेठेशी निगडीत असणा-या सर्व बाबींची पुरेशी निश्चित व विश्वासार्ह माहिती त्वरीत प्राप्त होत नाही, तसेच या माहितीचे महत्त्व लक्षात घेऊन त्याचा उपयोग करण्याची जागरूकता जो पर्यंत शेतकरी दाखविणार नाहीत तो पर्यंत शेतमालाला योग्य किंमत मिळणे कठीण आहे.

बाजार पेठेची माहिती न होण्याची अनेक कारणे होती. शेतकरी अज्ञानी होते. वाहतूक व दळणवळणाची अद्यावत साधने खेडयापर्यंत पोचलेली नव्हती शेतक-याला अशा माहिती बाबत फारसा रस नव्हता. यामुळे बाजार माहितीचा अभाव भारतातील कृषी विपणन व्यवस्थेचा अेक महत्त्वाचा दोष मानला जात असे.

८) <u>अनियंत्रित बाजारपेठेतील अनिष्ट प्रथा</u> :

भारतातील कृषी विपणनात अनियंत्रित बाजारपेठांचे वर्चस्व होते. सहाजिकच अशा बाजारपेठात अनेक अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या.

१) वजनात व मापात शेतक-याला फसविले जात असे.

२) धार्मिक व अन्य कारणासाठी शेतक-याकडून विक्रीला आलेल्या मालातील कांही माल विनामूल्य कापून घेतला जात असे.

३) नमुना म्हणून फार मोठया प्रमाणात उत्पादित माल काढून घेतला जात असे.

४) किंमत ठरविताना सांकेतिक खुणांचा वापर होत असे.

या सर्व अयोग्य प्रथांमुळे शेतक-यांचे शोषण होत असे.

९) <u>पतपुरवठयाच्या अपु-या सोयी</u> :

शेतक-यांना योग्य वेळेला योग्य प्रमाणात व योग्य व्याजदराने पतपुरवठा करणा-या संस्थाचा अभाव होता. यामुळे हंगामानंतर ताबडतोब शेतक-यांला उत्पादित माल विकावा लागत असे व स्वत:ची पैशाची गरज पूर्ण करावी लागत असे यालाच सक्तीची विक्री असे म्हणतात. त्यामुळे शेतमालाची खरेदी व्यापारी अयोग्य किंमतीला करत असत.

ब) <u>कृषी विपणनातील दोष कमी करण्यासाठी करण्यात आलेले उपाय :</u>

स्वातंत्र्यालगतच्या काळात भारताच्या कृषी विपणन व्यवस्थेत वरील दोष ठळकपणे आढळत होते. हे दोष नाहीसे करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु झालेले असले तरी स्वातंत्र्यानंतर या प्रयत्नाना अधिक गती आली सरकारने अर्थिक नियोजनामार्फत हे दोष नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाचा आढावा खालील प्रमाणे.

१) <u>नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न</u> :

व्यापारी व अन्य मध्यस्थ यांच्याकडून उत्पादकांचे होणारे शोषण थांबावे व शेतक-यांच्या हिताची जपणूक व्हावी यासाठी नियंत्रित बाजारपेठांची संख्या

वाढविण्याचे प्रयत्न झाले. अनेक राज्यांनी नियंत्रित बाजारपेठे विषयक कायदे मंजूर केले. महाराष्ट्र राज्याने १९६३ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पादन नियंत्रण कायदा मंजूर केला.

भारतातील राज्य सरकारांनी केलेल्या अशा कायद्यामुळे कृषी विपणनात नियंत्रित बाजार पेठांची संख्या वाढली एप्रिल १९५१ मध्ये देशात फक्त २८६ नियंत्रित बाजार पेठा होत्या. त्यात वाढ होऊन मार्च १९८७ मध्ये या बाजारपेठांची संख्या ५९४२ झाली. यापैकी २१३६ प्राथमिक बाजारपेठा तर ३८०० उप बाजार पेठा होत्या[5] सातव्या पंचवार्षिक योजनेत आणखीन २०० नियंत्रित बाजारपेठांचा विकास करण्याचे ठरविण्यात आले आहे.

नियोजन काळात नियंत्रित बाजारपेठांची व नियमनाखाली आणलेल्या वस्तूंची संख्या ही वाढली.

२) <u>सहकारी कृषी विपणन व्यवस्थेच्या विकासासाठी प्रयत्न</u> :

सहकारी तत्वावर आधारलेली कृषी विपणन व्यवस्था लहान व सीमांत शेतक-यांना अधिक उपयुक्त ठरू शकते. स्वातंत्र्य पूर्व काळात सहकारी कृषी विपणनाची सुरवात झालेली असली तरी सहकारी कृषी विपणनाचा फारसा विकास झालेला नव्हता. पहिल्या पंचवार्षिक योजनेतही सहकारी कृषी विपणनाच्या विकासाचे प्रयत्न झालेले नव्हते.

परंतु १९५१ च्या ग्रामीणपत पुरवठा समितीच्या शिफारशीवरून दुस-या पंचवार्षिक योजनेत सहकारी विपणन व्यवस्थेच्या विकासाला महत्वाचे स्थान देण्यात आले होते. दुस-या योजनेत १८०० प्राथमिक खरेदी विक्री संस्था २९ प्रक्रिया संस्था प्रस्थापित करण्याचे ठरविले होते. नंतरच्या पंचवार्षिक योजनातही विविध स्तरावरील सहकारी कृषी विपणन संस्थांची वाढ करण्याचे प्रयत्न झाले सहकारी कृषी विपणन रचनेत शिखर विपणन संस्थाना मदत करण्यासाठी व आंतर राज्य व्यापाराला मदत व्हावी यासाठी १९५८ या वर्षी (राष्ट्रीय सहकारी कृषी विपणन संस्था **(National Agricultural Co-operative Marketing Federation )** नाफेडची स्थापना करण्यात आली.

यामुळे आर्थिक नियोजनाच्या काळात सहकारी कृषी विपणन संस्थांची संख्या वाढत गेली. १९८५-८६ मध्ये भारतात २९ राज्य विपणन संघ, १६० मध्यवर्ती विपणन संघ (सेंट्रल मार्केटिंग संस्था) ६२३० प्राथमिक विपणन संस्था पैकी ३२९० विशेष वस्तुंच्या विपणन संस्था होत्या. १९६०-६१ मध्ये १६९ कोटी रुपयांच्या शेतमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले होते. तर १९८५-८६ या वर्षी ४,२०० कोटी रुपयांच्या शेतमालाची उलाढाल सहकारी विपणन संस्थानी केली होती.[६]

१९८५-८६ या वर्षी नाफेडने ७९ कोटी रुपयांची प्रत्यक्ष ( Direct ) निर्यात केली होती.[७]

या वरून हे स्पष्ट होते की नियोजन काळात कृषी विपणन व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी सहकारी विपणन व्यवस्थेचा विकास मोठया प्रमाणात करण्यात आला आहे.

३) साठवणुकींच्या सोयींचा विस्तार:

शेतमालाच्या साठवणुकींच्या सोयींचा अभाव हा भारतातील शेतमालाच्या विपणन व्यवस्थेचा एक महत्वाचा दोष होता. हा दोष टाळण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने शेतमालाची साठवण करणे आवश्यक होते. योजना काळात भारत सरकारने केलेल्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून आज देशात विविध स्तरावर शेतमालाची साठवण करणा-या संस्था आहेत.

१९५४ च्या ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या शिफारशी वरून भारत सरकारने १९५६ मध्ये "राष्ट्रीय सहकारी विकास व संग्रह गृह मंडळाची" तर १९५७ मध्ये "मध्यवर्ती संग्रह गृह महामंडळ" अशा दोन संस्था स्थापन केल्या. "मध्यवर्ती संग्रह गृह"महामंडळाच्या अधिपत्या खाली प्रत्येक राज्यात 'राज्य संग्रह गृह महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

या संस्थांची स्थापना केल्यामुळे साठवणुकीच्या क्षमतेत वाढ झाली. १९६०-६१ मध्ये भारतात साठवणुकीची क्षमता ०.१ दशलक्ष टन होती. १९८४-८५

या वर्षी ही साठवणुक क्षमता ३४.८ दशलक्ष टन झाली. या पैकी सार्वजनिक संस्थाकडे (भारतीय अन्नधान्य महामंडळ, मध्यवर्ती गोदाम महामंडळ व राज्य गोदाम महामंडळे) २६.८ दशलक्ष टन आणि सहकारी क्षेत्रात ८ दशलक्ष टन साठवण क्षमता होती.[८]

या शिवाय १९८६-८७ मध्ये २०.९ लाख मेट्रीक टन क्षमतेची ४०४५ गोडावून ग्रामीण भागात स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. तसेच मांस खाद्य उत्पादन आदेश १९७३ नुसार देशात मांस खाद्य पदार्थांचा दर्जा नियंत्रित करण्याचे आणि योग्य जागेवर उत्पादन करण्याचे निश्चित केले आहे. १९८० मध्ये शीत गोदामांची स्थापना करून शेतक-याचे शोषण थांबविण्यासाठी कायदा देशभर लागु केला आहे. परंतु उत्तर प्रदेश, प. बंगाल, हरियाना आणि पंजाब या राज्यात शीत साठवणुक व्यवस्थेसाठी स्वत:चे अधिनियम तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना १९८० च्या कायद्यातून वगळण्यात आले आहे. १९८७-८८ या वर्षी परवाना दिलेल्या शीत गोदामांची संख्या २१० होती. व त्यांची साठवण क्षमता ३३,८३,०४७ घन मिटर होती.[९]

४) <u>वजने व मापे यात सुधारणा</u>:

प्रमाणित वजने कायदा १९३९ (Standard Weights Act,1939) हा केंद्र सरकारने १९३९ मध्ये केला असताना सुध्दा स्वातंत्र्या लगतच्या काळात कृषी विपणन व्यवस्थेत वेगवेगळी वजने व मापे वापरण्यात येत होती. या भिन्न मापातून शेतक-यांची फसवणूक केली जात असे. नियोजन मंडळाने या संदर्भात अशी शिफारस केली की देशात वजने व मापे यासाठी दशमान पध्दतीचा वापर केला जावा. कारण दशमान पध्दती साधी सोपी व सहज लक्षात ठेवता येण्यासारखी आहे.

नियोजन मंडळाची शिफारस मान्य करून भारत सरकारने १९५८ मध्ये "सुधारित वजने आणि मापे कायदा" लागू केला. या कायद्यानुसार जुनी वजने मापे रद्द करून दशमान पध्दतीची वजने व मापे कृषी विपणनासाठी लागू करण्यात आली. यामुळे वजनामापाचे व्यवहार हिशेबांच्यादृष्टिने सुलभ झालेच शिवाय सर्व देशात एकाच

वजनाचा व मापाचा वापर सुरु झाला.

५) वाहतूकींच्या सोयींचा विस्तार:

शेतमाल योग्यवेळी बाजारपेठेत पोहचविण्यासाठी वाहतुकीच्या जलद कार्यक्षम व आधुनिक सुविधा आवश्यक असल्याने वाहतूकीच्या सोयीचा विस्तार करण्याचा प्रयत्न नियोजन काळात सरकारकडून केला गेला. विशेषत: रस्ते वाहतूकीचा विस्तार झाल्याने खेडयातील शेतमाल नजिकच्या बाजारपेठेत आणणे शेतक-याला शक्य झाले. १९५१ मध्ये केवळ १५ टक्के खेडी रस्त्यामार्फत बारमाही नजिकच्या शहरासाठी जोडलेली होती. १९८७ मध्ये हे प्रमाण ४० टक्के झालेले होते.[१०] या कालावधीत वाहतूकीच्या सोयींचा विस्तार झाल्यामुळे शेतक-यांना आपला माल योग्य त्या ठिकाणी विक्री करून योग्य किंमत मिळविता येणे शक्य झाले आहे.

६) शेतमालाचे प्रमाणीकरण व श्रेणीकरण करण्याच्या सुविधात वाढ:

शेतमालाला त्याच्या दर्जानुसार किंमत प्राप्त होण्यासाठी त्याचे प्रमाणीकरण व श्रेणीकरण करणे आवश्यक असते. यासाठी भारतात १९३७ मध्ये शेती उत्पादन प्रतवारी आणि विपणन कायदा ( ॲग्रिकल्चर प्रोडयूस ग्रेडींग ॲण्ड मार्केटींग ॲक्ट) करण्यात आला होता. या कायद्यात सुरूवातीला ९० प्रकारच्या शेतमालाचा समावेश करण्यात आला होता. नियोजन काळात या सुविधात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत निर्यात शेतमालासाठी शेतमालची प्रत करणे आवश्यक आहे, असे ठरविण्यात आले. दुस-या पंचवार्षिक योजनेत निर्यात शेतमाला प्रमाणेच अंतर्गत व्यापारातील शेतमालासाठी ही प्रतवारी आवश्यक मानण्यात आली. यासाठी नागपुर येथे मध्यवर्ती दर्जा नियंत्रण प्रयोग शाळा व आठ विभागीय प्रयोग शाळा स्थापन करण्यात आल्या. या प्रयोगशाळानी शेतमालाच्या केलेल्या पृथ:करणाच्या आधारे शेतमालाची प्रत निश्चित केली जाते. वस्तुची प्रत ठरविली आहे हे दर्शविणारा ॲग्मार्क हा शिक्का वापरला जातो. १९८६-८७ मध्ये १४२ वस्तुसाठी अशी सोय उपलब्ध करण्यात आलेली होती.[११]

७) <u>बाजार विषयक माहिती</u>:

बाजारपेठेत होणा-या किंमती विषयी शेतक-यांचे अज्ञान असल्यास शेतक-यांना योग्य निर्णय घेता येणे शक्य होत नाही. शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होण्यासाठी शेतक-यांना बाजार भावासंबंधी माहिती असणे आवश्यक असते. सध्या शासनामार्फत व विविध विपणन संस्थामार्फत बाजार भावासंबंधी माहिती प्रकाशित केली जाते. या शिवाय आकाशवाणी, वृत्तपत्र, पुस्तिका व माहिती पत्रके इत्यादी व्दारा शेतक-यांसाठी बाजार माहिती दिली जाते. यामुळे शेतक-यांना हे समजते की आपण कोणत्या बाजारपेठेत शेतमाल विक्रीला नेला असता योग्य किंमत प्राप्त होईल, त्यानुसार शेतक-यांना शेतमालाची विक्री करता येते.

८) <u>इतर उपाय योजना</u>:

वरील उपाय योजना शिवाय भारत सरकारने कृषी विपणन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी नियोजन काळात प्रयत्न केले आहेत. यात प्रामुख्याने बाजार संशोधन व मोजणी, बाजार पेठेत आकारल्या जाणा-या शेतमालाच्या विक्रीवरील शुल्कवर नियंत्रण, विपणन व्यवस्थेसाठी आवश्यक असणा-या कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाच्या सुविधा आणि विशिष्ट वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण इत्यादी उपाय योजना केल्या आहेत.

या उपाय योजनांच्यामुळे भारतातील कृषी विपणनात झालेले काही महत्वपूर्ण बदल खालील कोष्टकाच्या आधारे स्पष्ट होतील.

क) <u>भारतातील कृषी विपणनाची सद्य:स्थिती</u>:

(Present Practice of Agri. Marketing in India)

भारताच्या कृषी विपणनात कृषी मालाची खरेदी-विक्री सर्वसाधारण पणे खालील प्रकारच्या बाजर पेठेतून होते.

१) <u>प्राथमिक बाजारपेठा</u>:

प्राथमिक बाजार पेठांनाच प्रामुख्याने आठवडी बाजार म्हणतात. या बाजाराला मध्यप्रदेश, ओरिसा, बंगाल व उत्तर प्रदेश या राज्यात "हाट" म्हणतात. दक्षिणेकडे यालाच "शंडी" म्हणतात.

कोष्टक – २

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या कृषी विपणनातील ठळक बदल

| अ. नं. | तपशिल | वर्षे १९५१ | वर्षे १९८७ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | |
| १) | नियंत्रित बाजारपेठांची संख्या | २८६ | ५९४२ |
| २) | विपणनासाठी नियंत्रित केलेल्या वस्तु | ८६ | ११० |
| ३) | सहकारी कृषी विपणन संस्थाची संख्या | ३१०८× | ६२२७ |
| ४) | सहकारी विपणन संस्थांनी विपणनाचे केलेले व्यवहार | ४७ को. रु. | ४००० को. रु. |
| ५) | साठवणुक क्षमता (द. ल. टन) | ०.१× | ३४.८ |
| ६) | शित गोदामांची साठवण क्षमता (घन मिटर) | उ. ना. | ३३,८३,०४७ |
| ७) | प्रमाणीकरणासाठी व श्रेणीकरणासाठी निवडण्यात आलेल्या वस्तु. | ९० | १४२ |
| ८) | प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थाची संख्या | उ. ना. | ५६१ |
| ९) | प्रमाणीकरण करुन निर्यात केलेल्या वस्तुचे मुल्य. | उ. ना. | ७१२.४४ को. रु. |

टीप:– १) उ. ना. उपलब्ध नाही.

२) × १९६०–६१ या वर्षाचे आकडे.

शेतकऱ्यांच्याकडे जो विक्री योग्य वाढावा निर्माण होतो तो गरजेनुसार शेतकऱ्याकडुन विकला जातो. बाजारातील किंमतीच्या अज्ञानामुळे, वाहतूकीच्या साधनांच्या अभावामुळे, साठवणुकींच्या सोयींच्या अभावामुळे हा शेतमाल फिरत्या व्यापाऱ्यांना सावकारांना किंवा प्राथमिक बाजार पेठेत विकला जातो.

प्राथमिक बाजारपेठेत खरेदीदार हे व्यापा-याचे मध्यस्थ, लहान व फिरते आणि ग्राहक इत्यादी असतात.

<u>प्राथमिक बाजार पेठेचे फायदे</u>:

प्राथमिक बाजारपेठांची स्थिती फारशी समाधानकारक नसली तरी या बाजारपेठांचे स्वत:चे काही फायदे आहेत.

१.१) पारंपारीक पध्दतीने उत्पादन केले जात असल्यामुळे शेतक-यांच्याकडे असणारा विक्री योग्य वाढावा कमी असतो. हा कमी वाढावा घाऊक बाजारपेठेत विकणे लहान शेतक-यांना परवडत नाही. त्यासाठी प्राथमिक बाजारपेठेत शेतमालाची विक्री करणे शेतक-यांना फायदयाचे ठरते.

१.२) कर्जाची परत फेड करण्यासाठी तसेच शेतीचा व कौटुंबिक खर्च भागविण्यासाठी शेतमालाची त्वरित विक्री करण्याची आवश्यकता असते. गावातील बाजारपेठेत शेतमालाची विक्री करून शेतक-यांना तत्काळ पैसा उपलब्ध होतो.

१.३) गावातील सावकाराला किंवा दुकानदाराला शेतमाल विकण्या ऐवजी जर प्राथमिक बाजारपेठेत विकला तर शेतक-यांना चांगली किंमत मिळु शकते.

१.४) प्राथमिक बाजारपेठेत शेतमालाच्या पुरवठयावर शेतकरी काही प्रमाणात नियंत्रण ठेवू शकतो. त्यामुळे शेतक-यांना योग्य किंमत प्राप्त होवू शकते.

प्राथमिक बाजारपेठांचे संगठन व व्यवस्थापन करण्याचे कार्य ग्रामपंचायतीकडे असते. ग्रामपंचायतीकडून शेतमालाची विक्री करणा-या शेतक-याकडून तीन प्रकारे कर वसुल केला जात असतो.

अ) मालाच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल कर.

ब) शेतमालाच्या विक्रीवरील कर.

क) ग्रामपंचायतीकडून विशिष्ट सुविधा बाजारात उपलब्ध करून दिल्याबद्दल आकारला जाणारा कर.

या बाजारपेठेत कोणत्या प्रकारे व किती प्रमाणात कर आकारावेत या संबंधी अनेक राज्यात कायद्याचे बंधन नाही. त्यामुळे ग्रामपंचायती वाटेल तेवढा कर शेतक-यांच्याकडून वसूल करतात. पण त्या प्रमाणात बाजारपेठेत सुविधा उपलब्ध केल्या जात नाहीत. शेतक-यांच्या वाहतूकीच्या अडचणी सोडविल्या जात नाहीत. पिण्याच्या पाण्याची गैरसोय, पावसात विक्रीचे सौदे करावे लागतात, इत्यादी अडचणी शेतक-यांना जाणवतात. तसेच प्राथमिक बाजारातून व्यवहार करणे शेतक-याला सोयिस्कर असले तरी मोठया बाजारपेठापेक्षा किंमत कमी मिळते.

२) <u>घाऊक बाजार</u>:

घाऊक बाजारपेठांनाच "मंडी" किंवा "गंज" म्हणतात. या बाजारपेठाचे ठिकाण तालुक्याच्या किंवा जिल्हयाच्या ठिकाणी असते. यात घाऊक प्रमाणात शेतमालाची खरेदी विक्री केली जाते. विक्रीनंतर किंमत रोख स्वरूपात व त्वरित मिळते. या बाजारात मध्यस्थ किंवा अभिकर्ते मोठया प्रमाणावर कार्य करीत असतात. या बाजारात शेतमाल शेतक-यांच्याकडून किंवा फिरत्या व्यापा-याकडून घाऊक व्यापा-याकडे येत असतो.

<u>घाऊक बाजाराचे प्रकार</u>:

२.१) <u>प्राथमिक घाऊक बाजार</u>:

या बाजारात शेतकरी किंवा फिरते व्यापारी विक्रीसाठी शेतमाल आणतात. घाऊक व्यापारी स्वत: किंवा मध्यस्थामार्फत या शेतमालाची खरेदी करतात.

२.२) <u>दुय्यम घाऊक बाजार</u>:

प्राथमिक घाऊक बाजारात शेतमालाची खरेदी करणारे

व्यापारी दुय्यम घाऊक बाजारात शेतमालाची विक्री करतात. या बाजारात शेतमालाची खरेदी करणारा व्यापारी हा सुध्दा घाऊक व्यापारीच असतो.

२.३) <u>मध्यवर्ती घाऊक बाजार</u>:

या बाजारात शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी घाऊक व्यापारीच कार्य करतात. या बाजारात शेतमालाची खरेदी विक्री घाऊक प्रमाणात किंवा अल्पप्रमाणात किरकोळ व्यापा-यांना किंवा ग्राहकांना केली जाते.

मध्यस्थांचे अस्तित्व हे घाऊक बाजार पेठेचे वैशिष्टये आहे. यामध्यें कच्चा व पक्का आडत्या, दलाल, हमाल व मापाडी यांचा समावेश असतो. या मध्यस्थामुळे शेतक-यांना मिळणारी किंमत व ग्राहकाने दिलेली किंमत यात फार मोठया प्रमाणात तफावत निर्माण होते. शेतक-यांना त्यांच्या शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होत नाही.

३) <u>सहकारी कृषी विपणन</u>:

मार्गारेट डिग्बीच्या मते "सहकारी विपणन अशी पध्दती आहे, की तिच्यात शेतकरी किंवा उत्पादक वर्ग यांना स्वत:च्या मालाला किंवा वस्तुस ग्राहकापर्यंत पोहचविण्यासाठी जी कामे करावी लागतात ती पार पाडण्यासाठी ते सहकारी पध्दतीवर एकत्रीत होतात"[१२].

सहकारी कृषी विपणनात शेतकरी सहकारी तत्वावर एकत्र येऊन विपणनाचे व्यवहार करतात. अशा व्यवहारामुळे शेतकरी व ग्राहक यांच्यातील मध्यस्थ वर्गाचे महत्त्व कमी होते.

भारतात सहकारी कृषी विपणनाला सहकारी चळवळीचा एक भाग म्हणून महत्त्व मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी कृषी विपणनाचा कसा विकास झाला याचा आढावा या आधी घेतलेला आहे.

ग्राहकांना सहाकारी विपणनाचे फायदे झाले यात प्रामुख्याने दर्जेदार शेतमालाची योग्य किंमतीला उपलब्धता, फसवणूक कमी इत्यादीचा समावेश करता येतो.

४) <u>सरकार मार्फत कृषी विपणन</u>:

१९३० पूर्वीच्या काळात शासनाचा अर्थव्यवस्थेत कमीत कमी हस्तक्षेप असावा अशी विचार श्रेणी होती. १९३० च्या जागतिक महामंदीत जुनी विचार श्रेणी बाजुला पडली आणि अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप असावा हा विचार प्रवाह पुढे आला. भारतात याच दरम्यानच्या काळात सरकारचा विपणन व्यवस्थेत हस्तक्षेप सुरु झाला.

शेतमालाला योग्य किंमत मिळावी यासाठी शासनाने इतर काही उपाय योजना केल्या असल्यातरी कृषी उत्पादनात होणाऱ्या चढ उताराप्रमाणें किंमतीत बदल होतात. उत्पादन जास्त झाल्यास कमी किंमत प्राप्त होते. तर उत्पादन कमी झाल्यास जास्त किंमत प्राप्त होते. याचा त्रास ग्राहकांना सहन करावा लागतो. सरकारने शेतमालाच्या किंमतीचे स्थिरीकरण करण्यासाठी शेतमालाच्या खरेदी विक्रीचे कार्य हाती घेतले आहे. हे कार्यपार पाडण्यासाठी शासनाने पुढील संस्था स्थापन केल्या आहेत.

४.१) <u>भारतीय अन्नधान्य महामंडळ</u>:

या महामंडळाची स्थापना १९६५ मध्ये झाली. या महामंडळाची प्रमुख कार्ये शेतमालाच्या साठवणुकीची व्यवस्था करणे, शेती उत्पादनाच्या वाढीस प्रोत्साहन देणे, शेती साधनांची प्रशिक्षणाव्दारे माहिती देणे, शेतमालाची खरेदी करणे व वितरण करणे इत्यादी होत. म्हणजेच शेतमालाच्या विपणनासाठी आवश्यक असणारी कार्ये अन्नधान्य मंडळाव्दारे पार पाडली जातात.

४.२) <u>केंद्रीय शेतमाल विपणन संस्था</u>:

या संघटनेची स्थापना १९६५ ला झाली. या संघटनेची प्रमुख कार्ये म्हणजे बाजार संशोधन व चौकशी करणे, बाजार पेठांचे नियंत्रण करणे, शेतमालाचे प्रमाणीकरण व प्रतवारी करणे आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी होत. ही कार्ये सुध्दा विपणन यंत्रणेला आवश्यक असतात.

४.३) <u>अन्नधान्याची सरकार मार्फत खरेदी व विक्री</u>:

सरकारकडून अन्नधान्याची खरेदी प्रामुख्याने अन्नधान्य टंचाईला तोंड देण्यासाठी केली जाते. या शिवाय शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी शासनाने विशिष्ट पिकांची हंगामा पूर्वी हमी किंमत जाहिर केलेली असते. त्यामुळे हमी किंमतीला शासनाला अन्नधान्याची खरेदी करावी लागते. तसेच अन्नधान्याचा अतिरिक्त साठा करण्यासाठी शासनाकडून अन्नधान्याची खरेदी केली जाते.

या उलट ग्राहकांना योग्य दराने शेतमाल उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून ठराविक किंमतीला अन्नधान्याची विक्री केली जाते. ग्राहक व उत्पादक यांच्या हितासाठी शासन मार्फत शेतमालाची खरेदी-विक्री केली जाते.

५) <u>अनियंत्रित बाजार पेठा</u>:

ज्या बाजार पेठेतील व्यवहार विशिष्ट कायदानुसार तयार केलेल्या यंत्रणेमार्फत नियंत्रि केले जात नाहीत अशा बाजारपेठेला "अनियंत्रित बाजारपेठ" म्हणतात. अशा बाजारात शेतकरी व ग्राहकांच्या हीता पेक्षा व्यापा-याचे हीत जोपासण्याचा प्रयत्न होतो.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारतात बहुसंख्य बाजारपेठा अनियंत्रि होत्या. आज काही बाजारपेठा अनियंत्रित आहेत. या बाजारपेठेत विक्रेते व ग्राहक यांचे हित संबंध सुरक्षीत नसतात. या बाजारात अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा व रुढी प्रचलीत असतात. अशा बाजारपेठामुळे शेतक-यांच्या शोषणाला मदत होते.

या बाजारात शेतमालाची किंमत ठरविताना सांकेतीक पध्दतीचा वापर केला जातो. विक्री करताना दलाल व खरेदीदार हे दोघेच सक्रिय भाग घेत असतात. शेतमालाची विक्री करणा-या व्यक्तीस तटस्थतेची भूमिका घ्यावी लागते. नमुना म्हणून जो शेतमाल घेतला जातो त्याचा कोणताच मोबदला शेतक-यांना दिला जात नाही. किंमत देताना ब-याच प्रमाणावर वर्गणी शेतक-याकडून घेतली जाते. या शिवाय इतर मार्गाने सुध्दा अनियंत्रित बाजारपेठेत शेतक-यांची फसवणुक केली जाते.

६) <u>विनियमित बाजार</u> ( Regulated Markets )

कृषी विपणनात शेतकरी मध्यस्थ व उपभोक्ता या तिघांच्याही हीताची जपणूक होण्यासाठी नियमनांची गरज असते. नियमनाखाली चालविल्या जाणा-या कृषी विपणन बाजारपेठा या संघटित अथवा नियंत्रित बाजार पेठा असतात. बाजाराचे नियमन जेव्हा बाजारातील विविध घटक एकत्र येऊन स्वत:च करतात तेंव्हा त्याला संघटित बाजारपेठ मानले जाते. या उलट जेंव्हा बाजाराचे कामकाज सरकारने केलेल्या एखाद्या कायद्यानुसार केले जाते तेंव्हा त्याला नियंत्रित बाजार असे म्हणतात.

६.१) <u>भारतात नियंत्रित बाजारपेठेची सुरवात व विकास</u>:

१८९७ चा कापूस आणि अन्नधान्य विपणी कायदा भारतातील नियंत्रित बाजारपेठेची सुरवात मानली जाते. हा कायदा अन्नधान्याप्रमाणें कापूस विपणनालाही लागू होता. या कायद्यामुळे बाजारपेठेत होणा-या विविध प्रकारच्या आकारणीबाबत नियम झाले. बाजारासाठी व्यापा-यांना परवाना आवश्यक झाला. वजने व मापे या बाबतही तपासणीची तरतूद झाली. त्यानंतर १९२७ मध्ये मुंबई राज्याने मुंबई कापूस विपणी कायदा केला. परंतु १९२९ च्या रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चरच्या (शाही कृषी आयोगाच्या) शिफारशीमुळे भारतात नियंत्रित बाजारपेठाच्या विकासाला गती आली। १९३० पासून अनेक राज्यानी नियंत्रित बाजार विषयक कायदे केले. दुसरे महायुध्द सुरु झाले तेंव्हा भारतात नियंत्रित बाजारांची संख्या १२२ होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कृषी विपणनातील दोष घालविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नियंत्रित बाजारपेठाच्या विकासाला प्राधान्य मिळाले. यामुळे नियंत्रित बाजारपेठांच्या संख्येत वाढ झाली. ही वाढ कोष्टक ३ मध्यें दर्शविली आहे.

१९५१ ते १९८७ या कालावधीत नियंत्रित बाजार पेठांच्या संख्येत ५६५६ ने निव्वळ वाढ झाली आहे।

कोष्टक -३
निर्यंत्रित बाजारपेठांच्या संख्येतीलवाढ

| वर्षे | निर्यंत्रित बाजार पेठांची संख्या |
|---|---|
| १९५१ | २८६ |
| १९६१ | १००० |
| १९७१ | - |
| १९८१ | ४४५० |
| १९८७ | ५९४२ |

संदर्भ :१) Ruddar Datt and K.P.M. Sundharam- Indian Economy Page No. 470.
२) भारत सरकार कृषी मन्त्रालय ग्रामिण विकास विभाग वार्षिक रिपोर्ट १९८७-८८, पान नं. ४५

६.२) निर्यंत्रित बाजाराची उद्दिष्टे:

निर्यंत्रित बाजार कायदे ही भारतात राज्य सरकारांची अखत्यारी असल्याने राज्याराज्यातील या कायद्यात तफावत आढळते. हे खरे असले तरी सर्वसाधारणपणे निर्यंत्रित बाजाराचा उद्देश उत्पादक विक्रेत्याचा बाजारातील गैरव्यवहारापासून बचाव करणे हा असतो. तसेच अशा बाजारात कोणत्याही एका घटकाच्या हिताला प्राधान्य न देता शेतकरी, दलाल, ग्राहक आणि एकंदर समाज या सर्वांच्याच लाभाचा विचार केला जातो. शेतकरी व व्यापारी यांच्या हिताचे रक्षण करणे व योग्य स्पर्धेचे वातावरण निर्माण करणे ही निर्यंत्रित बाजाराची उद्दीष्टये सांगितली जातात.

६.३) बाजार समिती:

निर्यंत्रित बाजार पेठेतील कामकाज पाहण्यासाठी व अशा बाजाराची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी कायदेशीर तरतुदीनुसार बाजार समिती अस्तित्वात येते. या समितीवर बाजाराशी संबंधित असणा-या सर्व घटकांचे प्रतिनिधी असतात. सर्वसाधारपणपणे बाजार समिती खालील कार्ये करते.

१) बाजाराच्या कामकाजासाठी आवश्यक असणारे परवाने देणे

२) बाजारातील अनाधिकृत आकारणी थांबविणे.

३) खुली लिलाव पध्दती सुरू करणे.

४) वजने व मापे योग्य वापरली जात आहेत हे पाहणे.

५) विक्री व खरेदीदारातील भांडण तंटे सोडविणे.

६) बाजाराशी संबंधीत असणा-या घटकांना विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

६.४) <u>नियंत्रित बाजारपेठेचे फायदे</u>:

१) <u>आर्थिक फायदा</u>:

नियंत्रित बाजारपेठेमुळे कृषी विपणनात मध्यस्थाकडून होणा-या शोषणावर नियंत्रण येते व त्यामुळे शेतक-यांचा आर्थिक फायदा होतो. बाजारातील आकारणीचे दर निश्चित होतात. धार्मिक अथवा अन्य कारणासाठी शेतक-यांकडून केली जाणारी आकारणी थांबते. यामुळे १०० रुपये किंमतीच्या वस्तु विकल्या गेल्यातर शेतक-यांचे निदान ५ रुपये वाचतात असा एक अंदाज आहे[१३].

२) <u>बाजारातील अनिष्ट प्रथांचे उच्चाटन</u>:

कृषी विपणनात आढळणा-या प्रथांचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने नियंत्रित बाजारपेठांचा फायदा होतो. अशा बाजारपेठांमुळे हप्ता पध्दतीने किंमत ठरविण्याची प्रथा बंद होते. वजना मापातील फसवणुक थांबते. व्यापारी, दलाल अशानी खोटे व्यवहार केल्यास शिक्षेची तरतूद असल्याने नियंत्रित बाजार पेठेत अनिष्ट प्रथांचे उच्चाटन होते.

३) <u>शेतक-यांना प्रतिनिधित्व</u>:

बाजार समितीत शेतक-यांना प्रतिनिधीत्व मिळाल्याने बाजारातील निर्णय प्रक्रियेत शेतक-यांचा सहभाग असतो. यामुळे कृषी विपणनात व्यापा-याप्रमाणेच शेतक-याचा प्रभाव पाडणे शक्य झालेले आहे.

४) <u>बाजारासंबंधी माहिती उपलब्ध होते</u>:

नियंत्रित बाजारपेठेमुळे अद्यायावत व विश्वासर्ह अशी खरेदी विक्रीच्या व्यवहाराची माहिती शेतक-यांना मिळते. यात प्रामुख्याने शेतमालाच्या किंमती शेतमालाची आवक आणि विक्री यांचा समावेश होतो. यामुळे शेतक-यांना आपल्या शेतमालाची कोणत्यावेळी कोणत्या बाजारात विक्री करून योग्य किंमत मिळविता येईल याची कल्पना येते.

५) <u>इतर फायदे</u>:

याशिवाय शेतक-यांना साठवणुकीच्या सुविधांचा फायदा, प्रतवारीचा फायदा, शेतक-यांच्या हितसंबंधाची जपणुक इत्यादी मिळतात.

भारतात नियंत्रित बाजार पेठा वरील प्रमाणे फायद्याच्या ठरल्या आहेत. भारतातील बहुतेक सर्व राज्यात नियंत्रि बाजारपेठा स्थापन झाल्या आहेत.

...

संदर्भ :


१) Dr. C.B. Mamoria,
Agricultural Co-operative Structure in India
(First Edition 1983) Kitab Mahal, Allahabad,
Delhi, Patna, Nagpur-1983, Page No. 103-and 104.

२) प्रा. अशोक श्री. बोरीकर, प्रा. पी. आर. कुळकर्णी,
भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार,
पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपुर १९८४ , पान नं. १२३

३) Dr. B.S. Mathur, Co-operation in India,
Sahitya Bhawan, Agra-3, 1988 Page No.269.

४) Dr. C.B. Mamoria, Agricultural Problems of India,
Kitab Mahal, Allahabad- Delhi,1979, Page No. 756.

५) भारत सरकार, कृषि मन्त्रालय ग्रामिण विकास विभाग,
वार्षिक रिपोर्ट-१९८७-८८, पान नं. ४५.

६) Ruddar Datt/K.P.M. Sundharam, Indian Economy,
S. Chand and Company (Pvt) Ltd., RamNagar-
New Delhi-110055, 1987. Page No. 473.

७) उपरोक्त, पान नं- ४७३.

८) उपरोक्त, पान नं- ४७५.

९) भारत सरकार, कृषी मन्त्रालय ग्रामिण विकास विभाग,
वार्षिक रिपोर्ट-१९८७-८८ पान नं. ४६.

१०) उपरोक्त, पान नं-४७.

११) उपरोक्त, पान नं.-४६.

१२) प्रा. अशोक श्री. बोरीकर, प्रा. पी. आर. कुळकर्णी,
भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार,
पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपुर, १९८४ पान नं. १०१.

१३) प्रा. अशोक श्री. बोरीकर, प्रा. पी.आर. कुळकर्णी,
भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार,
पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपुर, १९८४
पान नं. १०१.

...

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रकरण ३ रे

## करमाळा तालुक्याची आर्थिक रूपरेषा :


### अ) भौगोलिक स्थान :

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेयला असून त्याचे भौगालिक स्थान १७°, १० ते १८°, ३२ उत्तर अक्षांश व ७४°, ४२ ते ७६°, १५ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्हाच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद हे जिल्हे, पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा व आंध्रप्रदेश दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे जिल्हे आहेत.

करमाळा तालुका सोलापूर जिल्हयांच्या उत्तरेला असुन सोलापूर पासून करमाळा हे तालुक्याचे ठिकाण १३५ कि. मी. आहे. करमाळा तालुक्याच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद जिल्हे आहेत. पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा व माढा ( सोलापूर जिल्ह्यातील ) तालुका आहे. पश्चिमेस पुणे व अहमदनगर जिल्हे आहेत. दक्षिणेस पुणे जिल्हा आणि माढा तालुका आहे.

### ब) क्षेत्रफळ :

करमाळा तालुका हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सोलापूर जिल्हयातील सर्वात मोठा तालुका आहे. करमाळा तालुक्याचे भौगोलीक क्षेत्रफळ १६०९.७ चौरस कि. मी. असून ते सोलापूर जिल्हयाच्या एकुण क्षेत्रफळाच्या १०.८४ टक्के आहे. त्यापैकी १०.६४ टक्के (१५७८.९ चौरस कि. मी. ) ग्रामीण व ०.२० टक्के (३०.८ चौरस कि. मी. ) नागरी क्षेत्रफळ आहे. करमाळा तालुक्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ९८.०९ टक्के क्षेत्रफळ ग्रामीण आहे. तर १.९१ टक्के क्षेत्रफळ नागरी आहे.




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

क) <u>महत्वाच्या नद्या</u> :

करमाळा तालुक्या मध्ये भीमा आणि सीना या दोन महत्वाच्या नद्या आहेत. भीमा नदी ही सहयाद्री पर्वतावरील भीमाशंकर तालुका खेड जिल्हा पुणे येथून उगम पावून आग्नेयेकडे पुणे व अहमदनगर या जिल्हयातून करमाळा तालुक्यात वाहत येते. या नदीच्या पाणलोट क्षेत्रात डाव्या बाजुस करमाळा तालुक्याचा पश्चिमेकडील अर्धाभाग येतो सीना नदी ही अहमदनगर जिल्हयातून करमाळा तालुक्यात प्रवेश करते. या नदीच्या उजव्या बाजुस करमाळा तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग येतो.

ड) <u>हवामान आणि पर्जन्य</u> :

<u>तपमान</u> :

सोलापूर जिल्हयातील कमाल तपमान ४०.३ सेन्टी ग्रेड व किमान तपमान १६.७ सेन्टी ग्रेड आहे. करमाळा तालुक्यातील कमाल तपमान जिल्हयातील कमाल तपमानापेक्षा जास्त असून ते ४०.४ सेन्टी ग्रेड आहे. तर किमान तपमान जिल्हयातील किमान तपमानापेक्षा कमी असून ते ११.१ सेन्टी ग्रेड असल्याची नोंद जेऊर केंद्रात झाली आहे.

<u>पर्जन्य</u> :

पर्जन्य मानाच्या दृष्टीने संपूर्ण सोलापूर जिल्हा पर्जन्य छायेच्या प्रदेशात येतो. मान्सुनचा कालावधी जूनच्या दुस-या पंधरवाडयापासून सप्टेंबर अखेर असतो. जिल्हयातील वार्षिक सरासरी (नॉर्मल) पर्जन्यमान ५८४ मि.मी. आहे. पर्जन्यमानाची सन १९५३ पासूनची आकडेवारी पाहता असे दिसून येते की दरवर्षीच्या पर्जन्यमानामध्ये बरीच तफावत असून ते आवश्यकते पेक्षा कमी आहे.

फ) <u>लोकसंख्या</u> :

१९७१ ते १९८१ या कालावधीत करमाळा तालुक्याची लोकसंख्या १,५१,००० पासून ते १,६६,००० पर्यंत वाढली. या दशकातील लोकसंख्येची निव्वळ वाढ १५,००० नी झालेली आहे. या कालावधीत एकुण लोकसंख्या ९.९३ टक्के वाढली आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार करमाळा तालुक्याची लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी. ९४ होती. ती १९८१ च्या जनगणनेनुसार १०३ झाली.

इ) <u>शेती</u> :

शेती हा करमाळा तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. करमाळा तालुक्याच्या जमिन वापराचा तपशील कोष्टक १ मध्ये दिला आहे.

<u>कोष्टक १:</u>

<u>करमाळा तालुक्यातील जमिनीचा वापर</u> :

(हेक्टर मध्ये)

| अ.न. | तपशील | १९७४-७५ | १९८०-८१ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | एकूण भौगोलीक क्षेत्र | १,५९,६०० | १,५९,६०० |
| २) | जंगल व्याप्त क्षेत्र | ६,२०० | ६,२०० |
| ३) | शेतीस उपलब्ध नसलेले क्षेत्र | १२,१०० | १२,२०० |
| ४) | लागवडी लायक क्षेत्र | उ.ना. | १,३०,४०० |
| ५) | निव्वळ पिका खालील क्षेत्र | १,१६,८०० | १,१५,७०० |
| ६) | एका पेक्षा जास्त पिकांच्या खालील क्षेत्र | ५,८०० | ८,९०० |
| ७) | एकूण लागवडी खालील क्षेत्र | १,२२,६०० | १,२४,५०० |

टिप : उ. ना. उपलब्ध नाही.

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा. १९७६-७७ आणि १९८५-८६

एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी जंगलव्याप्त क्षेत्र या कालावधीत कायम असून ते ६,२०० हेक्टर आहे. एकुण भौगोलीक क्षेत्राशी जंगल व्याप्त क्षेत्राचे प्रमाण ३.८८ टक्क्यावर स्थिर आहे. या कालावधीत निव्वळ पिकाखालील क्षेत्र १,१०० हेक्टरने घटले आहे. एकुण भौगोलीक क्षेत्राशी निव्वळ लागवडी खाली असलेल्या क्षेत्राच्या प्रमाणात १९७४-७५ ते १९८०-८१ या कालावधीत ७३.१८ टक्क्या पासून ७२.४९ टक्क्यापर्यंत घट झाली. याच कालावधीत एका पेक्षा जास्त पिकाखालील क्षेत्र ३१०० हेक्टरने वाढले आहे. एकूण लागवडी खालील क्षेत्र १९०० हेक्टरने वाढले आहे.

ग) <u>पिकांचा आकृतीबंध</u>:

करमाळा तालुक्याच्या पिकाच्या आकृतीबंधात ज्वारीच्या क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. १९७४-७५ या वर्षी ज्वारीच्या लागवडी खालील क्षेत्र ९१,९१५ हेक्टर होते. निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी हे प्रमाण ७८.६९ टक्के होते. १९८०-८१ या वर्षी ज्वारी खालील क्षेत्र ८१,१९८ हेक्टर झाले. याचे निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी असलेले प्रमाण ७०.१८ टक्के होते. या कालावधीत करमाळा तालुक्यातील ज्वारीच्या लागवडी खालील क्षेत्र १०,७१७ हेक्टरने घटले आहे. करमाळा तालुक्यातील पिकाचा आकृतीबंध कोष्टक २ मध्ये दिलेला आहे.

या कोष्टकावरून असे दिसते पिकाच्या आकृतीबंधात तृणधान्याच्या लागवडीचे महत्वाचे स्थान आहे. १९७४-७५ या वर्षी एकुण लागवडी खालील क्षेत्राशी हे प्रमाण ८३.४६ टक्के होते. १९८०-८१ या वर्षी ते प्रमाण ७५.४० टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात ८.०६ टक्क्यांनी घट झाली आहे. याच कालावधीत कडधान्याच्या लागवडी खालील क्षेत्रात वाढ झाली आहे.

तृणधान्या खालोखाल पिकाच्या आकृती बंधात गळीत धान्ये महत्वाची आहेत. १९७४-७५ मध्ये गळीत धान्याचे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी असलेले प्रमाण ९.२४ टक्के होते. ते प्रमाण १९८०-८१ मध्ये १३.२८ टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात ४.०४ टक्के वाढ झाली.

कोष्टक - २
करमाळा तालुक्यातील पिकाचा आकृतीबंध

(हेक्टर मध्ये)

| अ. नं. पिके | १९७४-७५ | १९८०-८१ |
|---|---|---|
| १ २ | ३ | ४ |
| अ) तृणधान्ये | १,०२,३२७ | ९३,८७२ |
| १) ज्वारी | ९१,९१५ | ८१,११८ |
| २) गहू | ६,९३९ | ७,७६५ |
| ३) बाजरी | २,५५४ | ३,९३२ |
| ४) भात | ११३ | १३७ |
| ५) इतर तृणधान्ये | ८०६ | ८४० |
| ब) कडधान्ये | ७,०३३ | १२,११८ |
| १) हरभरा | ४,३२६ | ३,९४५ |
| २) तूर | २,३२० | ३७५ |
| ३) हूलगा | - | ५,०२५ |
| ४) इतर कडधान्ये | ३८७ | २,७७३ |
| क) गळीत धान्ये | ११,३२३ | १६,५३३ |
| १) करडई | ८,७०१ | १३,८४७ |
| २) शेंगा | १,५८६ | १,८६० |
| ३) इतर गळीत धान्ये | ७८६ | ८२६ |
| ड) इतर पिके | १,११७ | १,९७७ |
| १) ऊस | उ. ना. | ६६२ |
| २) मसाल्याचे पदार्थ | उ. ना. | २६६ |
| ३) इतर पिके | उ. ना. | १,०४९ |
| एकूण पिके | १,२२,६०० | १,२४,००० |

टिप: उ. ना. = उपलब्ध नाही.

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा १९७६-७७ व १९८५-८६

कडधान्याच्या आणि इतर पिकांच्या लागवडीच्या क्षेत्राचे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी असलेले प्रमाण १९७४–७५ मध्ये अनुक्रमे ५.७४ टक्के आणि १.५६ टक्के होते. हे प्रमाण १९८०–८१ या वर्षी अनुक्रमे ९.७३ टक्के आणि १.५९ टक्के आले. या कालावधीत या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ अनुक्रमे ३.९९ टक्के आणि ०.०३ टक्के आहे.

करमाळा तालुक्यातील प्रमुख पिके ज्वारी, गहू, बाजरी, हरभरा, तूर, हुलगा करडई, शेंगा व ऊस ही आहेत.

घ) ओलिता खालील क्षेत्र:

करमाळा तालुक्यात भीमा आणि सीना या दोन महत्वाच्या नद्या असून करमाळा तालुक्याचा पश्चिम भाग हा उजनी जलाशयामुळे ओलिताखाली आलेला आहे. ओलिता खालील क्षेत्रात झालेला बदल कोष्टक ३ मध्ये स्पष्ट केला आहे.

कोष्टक – ३

करमाळा तालुक्यातील ओलिता खालील क्षेत्र (हेक्टर मध्ये)

| वर्ष | ओलीताखालील क्षेत्र | निव्वळ लागवडी खालील क्षेत्र | निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी ओलीता खालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४–७५ | ५,१२३ | १,१६,८०० | ४.३९ |
| १९८४–८५ | ५,९९४ | १,१५,७०० | ५.१८ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा १९७६–७७ आणि १९८५–८६

या कोष्टकावरून हे स्पष्ट होते की या कालावधीत करमाळा तालुक्यातील ओलीता खालील क्षेत्र ८७१ हेक्टरने निव्वळ वाढले आहे. याच कालावधीत निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी ओलीताखालील क्षेत्राचे असलेले प्रमाण ०.७९ टक्के निव्वळ वाढले आहे. या ओलीता खालील क्षेत्रात ८७१ हेक्टरने जी निव्वळ वाढ झाली आहे

ती प्रामुख्याने करमाळा तालुक्याच्या पश्चिम भागात. कारण या भागात उजनी धरणाचे बॅक वॉटर असल्यामुळे सहकारी तत्वावरील पाणी पुरवठा योना राबविण्यात आल्या आहेत. या भागातील उल्लेखनिय पाणीपुरवठा सहकारी संस्था पुढील प्रमाणे आहेत.

१) शैलेश सहकारी पाणी पुरवठा संस्था, शेलगांव (वांगी)
२) समस्त महार पाणी पुरवठा सहकारी संस्था, वाशिंबे
३) विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा सहकारी संस्था, पारेवाडी.
४) शंकर सहकारी पाणी पुरवठा संस्था, दहिगांव.
५) सिध्देश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था, दहिगांव.
६) यशोदा नं. १ व २ सहकारी पाणी पुरवठा संस्था, कविटगांव.
७) हनुमान सहकारी पाणी पुरवठा संस्था, चिखलठाण
८) शिवाजी सहकारी पाणी पुरवठा संस्था, वांगी.
९) भिमा नं. १ सहकारी पाणी पुरवठा संस्था, वांगी.
१०) कितीकेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था, केतूर.
११) छत्रपती शिवाजी सहकारी पाणी पुरवठा संस्था, चिखलठाण.
१२) बालाजी सहकारी पाणी पुरवठा संस्था, चिखलठाण.
१३) नागनाथ व हरितक्रांती सहकारी पाणी पुरवठा संस्था, चिखलठाण.
१४) भैरवनाथ सहकारी पाणी पुरवठा संस्था, हिंगणी.

च) सहकारी संस्था:

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मधील कलम ८१ नुसार ३०-६-१९८८ पर्यंत करमाळा तालुक्यात नोंदणी झालेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ३०६ होत्या.

यापैकी प्राथमिक सहकारी पतपुरवठा करणा-या संस्था ९१ होत्या. एकुण सहकारी संस्थाशी प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थाचे प्रमाण २९.७४ टक्के होते. या खालोखाल करमाळा तालुक्यात पाणी पुरवठा सहकारी संस्था

असुन त्यांची संख्या ७३ होती. या संस्थाचे एकूण सहकारी संस्थाशी असलेले प्रमाण २३.८६ टक्के होते. महाराष्ट्रात सर्वात जास्त सहकारी पाणी पुरवठा संस्था करमाळा तालुक्यात आहेत.

यानंतर दूध सहकारी संस्था, मजुर सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था आणि पगारदार सहकारी संस्था अनुक्रमे ३९, ३७, १९ आणि ९ आहे. मच्छीमार सहकारी संस्था आणि ग्राहक भांडार सहकारी संस्था यांची संख्या प्रत्येकी ७ आहे. गृह निर्माण संस्थांची संख्या ५ आहे. शेती सहकारी संस्था आणि कृषी बी-बियाणे सहकारी संस्था यांचुया प्रत्येक ३ संस्था आहेत.

याशिवाय मेंढपाळ सहकारी संस्था, कुक्कुट पालन सहकारी संस्था आणि वाहतुक सहकारी संस्था यांच्या प्रत्येकी २ संस्था आहेत. बलुतेदार सहकारी संस्था सहकारी खरेदी-विक्री संघ, औद्योगिक सहकारी वसाहत, हातमाग सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाना, सुपरव्हिजन युनियन आणि अर्बन सहकारी बँक यांची प्रत्येकी एक संस्था आहे.

या पैकी सहकारी साखर कारखाना आजपर्यंत सुरु झालेला नाही व हातमाग सहकारी संस्था बंद पडली आहे.

छ) <u>वाहतुकीच्या सुविधा</u>:

करमाळा तालुक्यात १९८७-८८ या वर्षापर्यंत रस्त्यांच्या सुविधा पुढील प्रमाणे उपलब्ध झाल्या होत्या. तालुक्यात एकूण ८१५ कि.मी. लांबीचे सर्व प्रकारचे रस्ते असून त्यापैकी १८८ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले होते. ४५७ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे खडीकरण झालेले होते. तर १७० कि.मी. लांबीचे रस्ते मुरमापासून तयार केले होते.

याशिवाय करमाळा तालुक्यात ६८ कि.मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे.

प्रकरण ४ थे

## कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा

### भाग १ ला


अ) स्थापना:

नियंत्रित कृषी विपणनामध्यें सगळ्यात महत्त्व असते ते कृषी उत्पन्न बाजार समितीला. नियंत्रित बाजारपेठेचे फायदे या बाजारपेठेशी संबंधीत असणा-या घटकांना मिळवून देण्याची जबाबदारी या समितीची असते. यामुळे प्रस्तूत अभ्यासाची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा पासून करण्यात आलेली आहे.


१९३९ च्या मुंबई बाजार कायद्यानुसार करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १ जानेवारी,१९४८ रोजी झाली आहे. मात्र समितीच्या प्रत्यक्ष कार्याला सुरुवात १ जून,१९४९ रोजी झाली. पहिली बाजार समिती,१९४८ मध्ये शासनाने नियुक्त केली. या नियुक्त केलेल्या बाजार समितीची पहिली सभा सप्टेंबर,१९४८ मध्ये झाली. यात बाजार समितीचे उप-नियम तयार करण्यात आले. हे उप-नियम "कृषी विपणन आणि ग्रामीण वित्त संचालक, (दि. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटींग ॲण्ड रूरल फायनान्स)पुणे यांनी १५ एप्रिल,१९४९ रोजी मान्य केले. बाजार समितीची स्थापना झाल्यापासून सुरु होण्यापर्यंत एक वर्ष आणि पाच महिन्यांचा कालावधी गेला.

ब) मुख्य आणि उप बाजार आवार:

कृषी विपणन आणि ग्रामीण वित्त, संचालक पुणे यांनी १ मे,१९४९ च्या गॅजिट नुसार करमाळा तालुक्याचे क्षेत्र नियंत्रित बाजारासाठी निश्चित केले. करमाळा शहर हे मुख्य बाजार आवार म्हणून घोषीत केले. करमाळा मुख्य बाजार आवारात कृषी उत्पन्न बाजार समितीची मुख्य इमारत आहे. या ठिकाणी समितीच्या मालकीची ३५ एकर आणि ३९ गुंठे जागा (गट नंबर २,१०३ ४ए आणि २९) आहे. या जागेत ५० गाळे असून ते व्यापा-यांना वार्षिक भाड्याने दिले जातात.


करमाळा तालुका
उ
प्रमाण
0 1 2 3
१ से.मी. = ४ कि.मी.
मुख्य बाजार आवार
उप बाजार आवार
वर्गीकरण तक्ता
१) राज्य मार्ग
२) मुख्य जिल्हा मार्ग
३) इतर जिल्हा मार्ग
४) रेल्वे मार्ग
अहमदनगर कडे
जामखेड कडे
भूम कडे
कर्जत कडे
करमाळा
जेऊर
जिंती
केम
परांडा कडे
सोलापूर कडे

# * करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा आराखडा *
## गट नंबर २, २९, १०३/४ए.



या बाजार समितीने जेऊर, जिंती आणि केम हे तिन उपबाजार आवार स्थापन केले आहेत. करमाळा हे मुख्य बाजार आवार तालुक्यातील अनेक गावांना लांब होत असल्याने शेतक-यांना शेतमालाच्या विक्रीची नजीक व्यवस्था करून देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार हे उपबाजार स्थापन करण्यात आले आहेत.

जेऊरची उप-बाजारपेठ करमाळ्याच्या दक्षिणेला १६ कि. मी. अंतरावर आहे. केम ची उपबाजार पेठ करमाळ्याच्या अग्नेयला २१ कि. मी. अंतरावर आहे. जिंती ची उप-बाजारपेठ करमाळ्याच्या पश्चिमेला २८ कि. मी. अंतरावर आहे.

जेऊर उपबाजाराचे कार्य १९५३-५४ मध्ये सुरु झाले. हे आठवडयातून प्रत्येक सोमवारी भरणारे बाजार केंद्र आहे. या ठिकाणी शेतमालाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यासाठी समितीच्या मालकीची १० एकर जागा (गट नंबर १६९, १७१ आणि १७२) आहे. तसेच बाजार समितीने या ठिकाणी कार्यालय बांधले आहे. प्रत्येक सोमवारी करमाळा बाजर समिती मधील कर्मचारी (ग्रेडर व क्लार्क) येऊन विक्री व्यवस्थेचे कामकाज पार पाडतात.

केम या उपबाजारपेठेचे कार्य १९८३-८४ मध्ये सुरु झाले. हे आठवडयातून प्रत्येक मंगळवारी भरणारे बाजार केंद्र आहे. या ठिकाणी बाजार समितीच्या मालकीची जागा नसून व्यापा-यांच्या जागेतच शेतमालाच्या विपणनाचे व्यवहार केले जातात.

मात्र जिंती या ठिकाणचे उपबाजार केंद्र १९८६-८७ पर्यंत सुरु झाले नव्हते. कारण-

१) परवाना धारक व्यापारी किरकोळ होते. ठोक व्यापारी नव्हते.

२) शेतक-यांनी उपबाजार केंद्र सुरु करण्याची मागणी केली नव्हती.

३) शेतमालाला किरकोळ व्यापा-यामुळे योग्य किंमत मिळत नव्हती म्हणून आवक कमी होती.

क) <u>बाजार समिती</u>:

१९६३ च्या बाजर कायद्यानुसार प्रत्येक नियंत्रित बाजारपेठेला एक बाजार

समिती नेमावी लागते. ही निवड मतदानाच्या माध्यमातुन केली जाते. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती या नियमाला अपवाद नाही. करमाळा नियंत्रित बाजार पेठेने निवडलेल्या बाजार समितीची रचना कोष्टक १ मध्ये दर्शविली आहे.

कोष्टक – १

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभासदांची वर्गवारी

| अ. नं. | सभासदांची वर्गवारी | सभासद संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १) | सहकारी संस्थांच्या पदाधिका-यातून | ७ |
| २) | ग्राम पंचायतींच्या पदाधिका-यातून | ३ |
| ३) | परवानाधारक व्यापा-यातून | २ |
| ४) | खरेदी-विक्री संघाचा पदाधिकारी किंवा चेअरमन | १ |
| ५) | नगरपालिका (स्थानिक संस्थातील) प्रतिनिधी | १ |
| ६) | पंचायत समितीचा प्रतिनिधी | १ |
| ७) | सहकारी संस्थाचे शासकिय अधिकारी | १ |
| ८) | परवानाधारक हमाल प्रतिनिधी | १ |
| ९) | जिल्हा शेती अधिकारी | १ |
| | एकूण | १८ |

संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती करमाळा यांच्या दिनांक २३-१२-८८ च्या कार्यालयीन माहितीनुसार.

सहकारी संस्थांच्या पदाधिका-यातून निवडण्यात येणारे ७ सभासद आणि ग्राम पंचायतीच्या पदाधिका-यातून निवडण्यात येणारे ३ सभासद (क्रमांक १ आणि २ साठी निवडण्यात येणारे १० सभासद) असे एकूण १० सभासद शेतकरी असलेच पाहिजेत अशी कायद्यात तरतूद आहे. या कायदेशीर तरतूदीचे पालन करमाळा बाजार समितीने केलेले आहे.

निवडण्यात येणारे कार्यवाह आणि उपकार्यवाह या व्यक्ती शेतकरी सभासद असलेच पाहिजेत अशी अट बाजार समितीची आहे. ही अट करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने आजपर्यंत तरी पूर्ण केली आहे.

१९६३-च्या कायद्यानुसार बाजार समितीत परवानाधारक व्यापा-यांची सभासद संख्या ३ होती. ती संख्या २३-१२-८८ च्या बाजार समितीत २ आहे. ही संख्या कमी होण्याचे कारण हमाल संघटनेने संप करून व्यवस्थापनात परवानाधारक हमालासाठी एक जागा राखीव ठेवली आहे. या शिवाय खरेदी-विक्री संघाचा प्रतिनिधी, नगरपालिका प्रतिनिधी, पंचायत समितीचा प्रतिनिधी, सहकारी संस्थांचे शासकिय अधिकारी व जिल्हा शेती अधिकारी या सर्वांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीत असल्याचे स्पष्ट होते. असे एकूण १८ प्रतिनिधी करमाळा बाजार समितीत आहेत.

ड) <u>साठवण्याच्या सोयी</u>:

भारतातील कृषी विपणन व्यवस्थेचा सर्वांत महत्त्वाचा दोष सांगितला जातो तो म्हणजे साठवणुकीच्या सोयींचा अभाव हा होय. हा दोष कमी करण्यासाठी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ४-९-१९७९ पासून १०९९ मे. टन क्षमतेचे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम सुरू करण्यात आले आहे. या गोदामाने १९८८ पर्यंत पुरविलेल्या साठवणुकींच्या सुविधा व त्या साठविलेल्या मालाच्या तारणावर करण्यात आलेले कर्ज वाटप यांची माहिती कोष्टक २ मध्ये दिली आहे.

या कोष्टकावरून हे स्पष्ट होते की करमाळा बाजार आवारात असलेल्या गोदामाच्या साठवण क्षमतेचा पूर्ण वापर अभ्यासाच्या कालावधीत तरी झालेला नाही.

१९७९ ते १९८८ या कालावधीत एकूण ५९,१०२ क्विंटल शेतमालाची साठवण या गोदामात केली आहे. याच कालावधीत एकूण ९९,२९,८९० रूपयांची कर्जे शेतमालाच्या तारणावर देण्यात आलेली आहेत.

१९७९ ते १९८८ या कालावधीत साठविलेल्या शेतमालाच्या ५५ ते ६० टक्के

मालावर कर्ज घेतले होते.

कोष्टक - २

साठविलेला शेतमाल आणि त्या तारणावर दिलेले कर्ज

| अ. नं. | वर्ष | साठविलेला शेतमाल (क्विंटल) | कर्ज वाटपाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | १९७९ | ५२ | कर्ज वाटप नाही. |
| २) | १९८० | ३,४२८ | ५,३३,२०० |
| ३) | १९८१ | ७,९५४ | १२,५०,६९० |
| ४) | १९८२ | १०,२१३ | १९,०५,००० |
| ५) | १९८३ | ४,३१३ | ७,४३,८०० |
| ६) | १९८४ | ७,८२४ | ११,४०,२०० |
| ७) | १९८५ | ६,१३४ | १३,४८,००० |
| ८) | १९८६ | ९,२८७ | १७,५६,४०० |
| ९) | १९८७ | ५,४२२ | ६,३७,२०० |
| १०) | १९८८ | ४,४७५ | ६,०७,४०० |
| | एकूण | ५९,१०२ | ९९,२१,८९० |

संदर्भ : साठा अधिकक्ष महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.
शाखा: करमाळा बाजार आवार यांच्या कार्यालयीन माहितीनुसार

सर्वात जास्त शेतमालाची साठवण १९८२ या वर्षी झाली असून ती १०,२१३ क्विंटल होती. आणि सर्वात कमी शेतमालाची साठवण १९७९ या वर्षी असून ती ५२ क्विंटल होती.

कर्जवाटपाच्या रक्कमेत सुध्दा अशाच प्रकारचे चढउतार दिसून येतात. सर्वात जास्त कर्ज वाटप १९८२ या वर्षी केले असून ते १९,०५,००० रुपये होते.

आणि सर्वात कमी कर्ज वाटप १९८० या वर्षी केले असून ते ५,३३,२०० रुपये होते.

इ) <u>लिलाव पध्दतीचा वापर</u>:

शेतमालाची किंमत ठरविताना पूर्वी हप्ता पध्दतीचा वापर केला जात असे. हप्ता पध्दती म्हणजे हातावर रूमाल किंवा फडके टाकून दलाल व खरेदीदार बोटांच्या सांकेतिक पध्दतीचा वापर करतात. तसेच शेतक-यांना किंमत ठरविताना चर्चेला घेतले जात नसे. म्हणजेच शेतक-यांच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार व्यापारी आणि दलाल यांना असे. या पध्दतीने शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होत नाही. म्हणजेच शेतक-यांची फसवणूक केली जात असे.

शेतक-यांची हप्ता पध्दतीने केली जाणारी फसवणूक थांबविण्यासाठी राज्य सरकारने नियंत्रित बाजार पेठांच्या आवारात उघड लिलाव पध्दतीचा वापर केलेला आहे. करमाळा बाजार समितीच्या आवारात सुध्दा उघड लिलाव पध्दतीचा वापर केला गेला आहे. असे नमुन्यासाठी निवडण्यात आलेल्या सर्व शेतक-यानी सांगितले.

फ) <u>प्रमाणीकरणाच्या सुविधा</u>:

शेतमालाला दर्जानुसार किंमत प्राप्त होण्यासाठी आणि ग्राहकांना निर्भेळ शेतमाल मिळण्यासाठी बाजार आवारात प्रमाणीकरणाच्या सुविधा असणे आवश्यक असते. करमाळा बाजार आवारात ज्वारी, शेंगा, करडी, तूर, बाजरी, गहू, गुळ आणि मिरची या शेतमालासाठी व्यापारी पध्दतीच्या प्रतवारीच्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत. या बाजार आवारात करण्यात आलेल्या शेतमालाचे प्रमाणीकरण कोष्टक ३ मध्ये दर्शविले आहे.

या वरून हे स्पष्ट होते की १९७४-७५ ते १९८५-८६ या कालावधीत करमाळा बाजार समितीच्या आवारात एकूण १२,७१,२३१ क्विंटल शेतमालाचे प्रमाणीकरण करण्यात आले होते. या कालावधीत सर्वात जास्त प्रमाणीकरण १९८३-८४ या वर्षी केले असून ते १,९६,०३० क्विंटल होते. तर सर्वात कमी प्रमाणीकरण केलेले परिमाण १९७५-७६ या वर्षी असून ते ६०,०८२ क्विंटल होते.

१९७४–७५ ते १९८५–८६ या कालावधीतील एकूण आवकेशी प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाचे प्रमाण सरासरी ५०.४६ टक्के आहे. हे प्रमाण सर्वात जास्त १९८३–८४ या वर्षी असून ते ७२.३७ टक्के होते. आणि सर्वात कमी प्रमाण १९७६–७७ या वर्षी असून ते ३१.१४ टक्के होते.

कोष्टक – ३

प्रमाणीकरण केलेला शेतमाल आणि त्याचे एकूण आवकेशी असलेले प्रमाण

| वर्ष | एकूण आवक (क्विंटल) | प्रमाणीकरण केलेला शेतमाल (क्विंटल) | प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाचे एकूण आवकेशी असलेले शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४–७५ | १,४२,६०६ | ६१,४०६ | ४३.०६ |
| १९७५–७६ | १,७०,७३७ | ६०,०८२ | ३५.१९ |
| १९७६–७७ | २,०९,५७४ | ६५,२७० | ३१.१४ |
| १९७७–७८ | २,३८,६३८ | ८२,२५४ | ३६.४७ |
| १९७८–७९ | २,१४,७३२ | ७८,४६२ | ३६.५४ |
| १९७९–८० | २,०३,२०६ | ७२,३९० | ३५.६२ |
| १९८०–८१ | २,५२,४७३ | १,५९,५१८ | ६३.१८ |
| १९८१–८२ | १,७५,८०३ | ९५,८९१ | ५४.५० |
| १९८२–८३ | १,२८,३०८ | ६९,८५७ | ५४.४४ |
| १९८३–८४ | २,७०,८८४ | १,९६,०३० | ७२.३७ |
| १९८४–८५ | २,६२,९१२ | १,७४,८३२ | ६६.५० |
| १९८५–८६ | २,४९,१४८ | १,५५,२३१ | ६२.३० |
| एकूण | २५,१९,०२१ | १२,७१,२३१ | ५०.४६ |

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४–७५ ते १९८५–८६.

ग) <u>नियंत्रित केलेल्या वस्तु</u>:

नियंत्रित बाजारपेठेचे महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे या बाजार आवारात शासनाने परवानगी दिलेल्या (नियंत्रित केलेल्या) वस्तुच्या खरेदी विक्रीचे व्यवहार चालतात. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शासनाने स्थापनेच्या वेळेला (१९४८ मध्ये) शेंगा, शेंगदाणे, तूर, करडी आणि मिरची या पाच वस्तुंना नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता दिली होती.

वस्तुचे नियंत्रण करण्यासाठी बाजार समिती शेतक-यांच्या मागणीनुसार शेतक-यांनी मागणी केलेल्या वस्तुची यादी नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता घेण्यासाठी शासनाकडे पाठविते. शासनाने नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता दिल्यानंतर ती वस्तु विपणनाच्या व्यवहारासाठी नियंत्रित वस्तु म्हणून मान्य केली जाते.

१९८७-८८ मध्ये शासनाने करमाळा बाजार व उप बाजार आवारासाठी नियंत्रित केलेल्या वस्तु या प्रमाणे ज्वारी, बाजरी, गहू, मका, जोंड, भात, तांदूळ, जवस, तिळ, करडी, शेंगा, शेंगदाणे, सुर्यफुल, निंबोळया, तूर, मूग, मटकी, हुलगा, हरभरा, मिरची, गुळ, कांदा, चिंच, उडिद, आंबा, अंबाडी आणि एरंडी या शेतमालाचे नियंत्रण करण्यात आले आहे. या शिवाय वैरण, गाई, म्हशी, शेळया मेंढया यांचा समावेश नियंत्रित वस्तुत करण्यात आला आहे.

थोडक्यात असे सांगता येईल की करमाळा नियंत्रित बाजाराच्या स्थापने पासून अधिकाधिक वस्तुचे विपणन नियंत्रित बाजारपेठे मार्फत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. १९४८ मध्ये केवळ ५ वस्तु नियंत्रित होत्या तर १९८७-८८ मध्ये या वस्तु २७ झाल्या आहेत. करमाळा तालुक्यातला महत्त्वाचा शेतमाल नियंत्रित बाजार पेठेखाली आणण्याचा प्रयत्न झाला आहे.

घ) <u>परवानाधारक</u>:

बाजार समितीच्या आवारात कृषी विपणनासाठी आवश्यक असणारी

प्रक्रिया पार पाडण्यासाठी व्यापा-यांना व इतर मध्यस्थांना बाजार समितीकडून परवाना घ्यावा लागतो.

परवाना मागणा-या व बाजार समितीची अट मान्य करणा-या सर्व व्यक्तीला परवाना दिला जातो. अट पूर्ण न करणा-या व्यक्तीला परवाना देण्याचे नाकारले जाते. परवान्याबाबतची महत्वाची अट किंवा निकष म्हणजे त्या परवान्यासाठी बाजार समितीने ठरवून दिलेली परवाना फी भरणे ही आहे.

शेतक-यांना किंवा शेतमालाची विक्री करणा-या व्यक्तीला मात्र बाजार समितीकडून परवाना घ्यावा लागत नाही.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कार्यकरणा-या परवानाधारकांच्या संख्येत झालेला बदल कोष्टक ४ मध्ये दर्शविला आहे.

कोष्टक - ४

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील परवानाधारकांची संख्या

| वर्ष | परवानाधारकांची संख्या | परवानाधारकांच्या संख्येतील शेकडा वाढ |
|---|---|---|
| १९७४-७५ | ६४६ | - |
| १९७५-७६ | ५८५ | - ९.४४ |
| १९७६-७७ | ६२४ | ६.६६ |
| १९७७-७८ | ७०१ | १२.३४ |
| १९७८-७९ | ८७५ | २४.८२ |
| १९७९-८० | ६९४ | -२०.६९ |
| १९८०-८१ | ८०१ | १५.४२ |
| १९८१-८२ | ७१२ | -११.११ |
| १९८२-८३ | ६३१ | -११.३८ |
| १९८३-८४ | ७०५ | ११.७३ |
| १९८४-८५ | ७५७ | ७.३८ |
| १९८५-८६ | ७८१ | ३.१७ |

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८५-८६.

१९७४-७५ या वर्षी परवानाधारकांची संख्या ६४६ होती. ही संख्या १९८५-८६ या वर्षी ७८१ पर्यंत वाढली. १९७४-७५ ते १९८५-८६ या कालावधीत परवानाधारकांच्या संख्येतील निव्वळ वाढ १३५ आहे. ही वाढ २०.९० टक्के आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी परवानाधारकांच्या संख्येत झालेली सरासरी वाढ १.९ टक्क्यांची आहे.

परवानाधारकांच्या संख्येत वाढ झालेली असली तरी या वाढीत सातत्य दिसून येत नाही. यातील काही वर्षे परवानाधारकांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. १९७५-७६, १९७६-७७ आणि १९८२-८३ या वर्षी परवानाधारकांची संख्या १९७४-७५ पेक्षा कमी होती. ती अनुक्रमे ५८५, ६२४ आणि ६३१ अशी होती. सर्वात जास्त परवानाधारकांची संख्या १९७८-७९ या वर्षी होती. ती ८७५ एवढी होती.

प्रत्येक वर्षी परवानाधारकांच्या संख्येत होणा-या शेकडा वाढीचा विचार केल्यास असे दिसून येते की, १९७५-७६, १९७९-८०, १९८१-८२ आणि १९८२-८३ या वर्षी परवानाधारकांच्या संख्येत शेकडा वाढ न होता घट झाली आहे. ही घट अनुक्रमे ९.४४ टक्के, २०.६९ टक्के, ११.११ टक्के आणि ११.३८ टक्के आहे. या शिवाय इतर वर्षी मात्र परवाना धारकांच्या संख्येत शेकडा वाढ झाली आहे. सर्वात जास्त वाढ १९७८-७९ या वर्षी असून ती २४.८२ टक्क्यांनी झालेली आहे. सर्वात कमी वाढ १९८५-८६ या वर्षी झाली असून ती ३.१७ टक्क्यांनी आहे.

थोडक्यात करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कार्यकरणा-या परवानाधारकांच्या संख्येत विश्लेषण काळात चढ उतार झाले आहेत. या चढ उताराच्या कारणासंबंधी संबंधित अधिका-याकडे चौकशी केली असता त्यांनी असे सांगितले की बाजार समितीची निवडणूक असलेल्या वर्षी परवानाधारकांची संख्या वाढते आणि इतर वर्षी ती कमी होते.

निवडणूका असलेल्या वर्षी परवानाधारकांची संख्या वाढते कारण बाजार समितीमध्ये परवानाधारकांचे तिन प्रतिनिधी निवडावयाचे असतात. आपल्या बाजुचे

मतदान वाढविण्यासाठी वेगवेगळया गटाकडून परवानाधारकांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. निवडून येणा-या सभासदांना प्रवासभत्ता, सभाभत्ता या प्रकारचे फायदे मिळतात. या शिवाय कोणताही फायदा मिळत नाही.

च) <u>कर्मचारी वर्ग</u>:

बाजार समितीला आपले दररोजचे कामकाज चालविण्यासाठी कर्मचारी वर्गाची आवश्यकता असते. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचा-यांची वर्गवारी व संख्या कोष्टक ५ मध्ये दर्शविली आहे.

<u>कोष्टक - ५</u>

<u>कर्मचारी वर्ग</u> -(१९८७-८८ मधील)

| अ.नं. | कर्मचारी विभागणी | कर्मचारी संख्या | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | सचिव | १ | एक |
| २) | उप-सचिव | १ | |
| ३) | हिशोबनिस ( Accountant ) | १ | |
| ४) | सांख्याकिय (Statistician) | १ | दोन |
| ५) | ग्रेडर | १ | |
| ६) | परवाना इन्स्पेक्टर | १ | |
| ७) | लेखनिक (क्लार्क) | ५ | |
| ८) | शिपाई | ४ | तीन |
| ९) | वॉचमन | १ | |
| १०) | झाडुवाले | १ | |
| | एकुण | १७ | |

संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती करमाळा यांचा वार्षिक अहवाल १९८७-८८.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकूण १७ कामगार आहेत. त्यांची वर्गवारी अशी आहे. वर्ग एक मध्ये तिन कर्मचारी येतात यात सचिव, उप-सचिव, आणि हिशोबनिस यांचा समावेश होतो. वर्ग दोन मध्ये ८ कर्मचारी येतात यात सांख्याकिय, ग्रेडर, परवाना इन्स्पेक्टर (यांचा प्रत्येक एक) आणि लेखनिक (पाच) यांचा समावेश होतो. वर्ग तिन मध्ये सहा कर्मचारी येतात यात शिपाई (चार) वॉचमन (एक) आणि झाडुवाला(एक) यांचा समावेश होतो.

ग्रेडरचे काम करणा-या व्यक्तीला "पणन संचालनालय पुणे" यांच्या मार्फत चालविला जाणारा ३ महिन्याचा व्यापारी प्रतवारीच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

...

प्रकरण ४ थे

## भाग २ रा

### अ) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील आवक :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात येणा-या शेतमालाची आवक व त्या आवकेच्या प्रवृत्तीत झालेला बदल कोष्टक ६ मध्ये दर्शविला आहे.

१९७४-७५ मध्ये एकूण शेतमालाची करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती मधील आवक १,४२,६०६ क्विंटल होती. यात वाढ होऊन १९८७-८८ मध्ये एकूण आवक ३,५०,६२९ क्विंटल झाली. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत बाजार समितीच्या आवारात येणारी आवक २,०८, ०२३ क्विंटलने निव्वळ वाढली. ही वाढ १४५.८७ टक्क्यांनी झाली आहे. १३ वर्षांच्या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ११.२२ टक्के दराने आवक वाढली आहे.

एकूण आवकेच्या प्रमाणात वाढ झाली असली तरी बाजारात येणा-या सर्व शेतमालाच्या आवकेत वाढ झालेली नाही. काही वस्तुंची आवक या कालावधीत घटली आहे. करडीची आवक सर्वात जास्त घटली आहे. १९७४-७५ मध्ये असणारी करडीची ३७,५५९ क्विंटलची आवक १९८७-८८ मध्ये ७,९३३ क्विंटल पर्यंत कमी झाली. करडीच्या आवकेमधील या कालावधीतील निव्वळ घट आहे ती २९,६२६ क्विंटलची या आवकेतील घट७८.८८ टक्क्यांनी झाली आहे.

करडीची बाजारपेठेतील आवक कमी होण्याची प्रमुख कारणे अशी सांगता येतील.

१) १९७५-७६ पासून बाजारपेठेच्या आवारात होणा-या करडीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात खरेदीदारावर सरकारकडून ८ टक्के दराने कर आकारावयास सुरुवात झाली.

त्यामुळे खरेदीदार करडीची खरेदी करताना बाजार आवारात असणा-या किंमतीपेक्षा १ ते २ टक्के किंमत जास्त देऊन शेतक-यांच्या कडून बाजार आवाराच्या बाहेरच करडीची खरेदी करतात. ( यालाच दोन नंबरच्या मार्गांनी करडीची खरेदी म्हणतात) या दोन नंबरच्या मार्गांनी करडीच्या खरेदीचे व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे करमाळा बाजार आवारातील करडीच्या आवकेवर परिणाम झाली आहे.

२) १९७४-७५ पासून १९८४-८५ पर्यंत करडीच्या लागवडी खालील क्षेत्र ८,७०१ हेक्टर पासून ५,५३२ हेक्टर पर्यंत कमी झाले आहे.

३) सूर्यफुलाला नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता मिळाल्यामुळे शेतक-यांच्यात करडी ऐवजी सूर्यफुलाचे उत्पादन घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाला आहे.

कोष्टक - ६

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती मधिल आवक

(क्विंटलमध्ये)

| अ. नं. | शेतमालाचे नांव | १९७४-७५ मधील आवक | १९८७-८८ मधील आवक | १९७४-७५ ते १९८७-८८ मधील आवकेतील बदल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | ज्वारी | २७,६२५ | १,३८,२०१ | १,१०,५७६ |
| २) | बाजरी | ३,०१७ | २९,९४४ | २६,९२७ |
| ३) | गहू | ५,१२८ | ५,२१४ | ८६ |
| ४) | मका | २,६३४ | ७,२३५ | ४,६०१ |
| ५) | करडी | ३७,५५९ | ७,९३३ | - २९,६२६ |
| ६) | शेंगदाणे | ८२२ | १,३९५ | ५७३ |
| ७) | शेंगा | २४,६५० | ६६,४३१ | ४१,७८१ |
| ८) | तिळ | ९२ | २१ | - ७१ |
| ९) | जवस | ५४४ | १५ | - ५२९ |
| १०) | मूग | २११ | ९७८ | ७६७ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

(कोष्टक – ६ चालू)

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ११) | तूर | ४,०६९ | ८,१२९ | ४,०६० |
| १२) | मटकी | ८३३ | १,३९३ | ५६० |
| १३) | हुलगा | २,४४९ | ४,०२५ | १,५७६ |
| १४) | हरभरा | ४,२३९ | २,९३० | – १,३०९ |
| १५) | जोंड | ४८० | ७१२ | २३२ |
| १६) | मिरची | ३,३५५ | ७२४ | – २,६३१ |
| १७) | कापूस | १,०५९ | – | – १,०५९ |
| १८) | गूळ | २३,४०४ | १७,४३९ | – ५,९६५ |
| १९) | भात | १२१ | ३३२ | २११ |
| २०) | तांबूळ | ३१५ | ५,४४६ | ५,१३१ |
| २१) | उडिद | – | ३ | – |
| २२) | सुर्यफुल | – | २५,४९४ | – |
| २३) | एरंडी | – | ३ | – |
| २४) | कांदा | – | २४,८०९ | – |
| २५) | चिंच | – | ५७ | – |
| २६) | आंबा | – | ४८० | – |
| २७) | अंबाडी | – | २४ | – |
| २८) | निंबोळी | – | १,२७० | – |
| | एकूण आवक | १,४२,६०६ | ३,५०,६२९ | – |

टिप : करमाळा, जेऊर व केमया बाजार आपारातील एकूण आवक दर्शविली आहे.

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४–७५ व १९८७–८८.

या कालावधीत करडीच्या खालोखाल गुळ, हरभरा, मिरची, जवस व तिळ यांची आवक घटली. ती अनुक्रमे ५९६५ क्विं., १३०९ क्विं., २६३१ क्विं., ५२९ क्विं. आणि ७१ क्विंटलने. या कालावधीत या वस्तुंची घट आहे ती अनुक्रमे २४.४९ टक्के, ३०.८४ टक्के, ७८.४२ टक्के, ९७.२४ टक्के आणि ७७.९७ टक्के.

कापसाची १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीतील घट १०५९ क्विंटलची दर्शविली आहे. परंतु ही आवक १९८७-८८ या वर्षी पूर्ण पणे थांबण्याचे कारण कापसाच्या एकाधिकार योजनेची सुरूवात हे आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत आवकेत वाढ झाली ती प्रामुख्याने ज्वारी शेंगा व बाजरी या शेतमालामध्यें. ही निव्वळ वाढ अनुक्रमे १,१०,५७६, ४१,६८१ व २६,९२७ क्विंटल झालेली आहे. मात्र आवकेत झालेला बदल टक्केवारीत आभ्यासल्यास सर्वात जास्त बाजरी व त्या खालोखाल ज्वारी आणि शेंगा अशी आहे. ही वाढ अनुक्रमे ८९२.५१ टक्के , ४००.२७ टक्के आणि १६९.५० टक्के अशी आहे.

वरील तीन शेतमालाशिवाय तांदूळ, मका , मूग, तूर, मटकी व हुलगा यांच्याही आवकेत वाढ झाली. परंतु ज्वारी, बाजरी व शेंगाच्या तुलनेत ही वाढ अत्यंत कमी आहे. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तांदूळ आणि मक्याची आवक अनुक्रमे ५१३१ क्विं., आणि ४६०१ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. ही वाढ अनुक्रमे १६२८.८९ टक्के आणि १७४.६८ टक्के आहे. त्याच प्रमाणे मूग, तूर, मटकी व हुलगा यांची आवक या कालावधीत अनुक्रमे ७६७ क्विंटल, ४०६० क्विंटल, ५६० क्विंटल आणि १,५७६ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. ही वाढ अनुक्रमे ३६३.५१ टक्के ९९.७८ टक्के, ६७.२३ टक्के आणि ६४.३५ टक्के अशी आहे. शेंगदाणे आणि भात यांची आवक निव्वळ वाढली ती अनुक्रमे ५७३ क्विंटल आणि २११ क्विंटलने ही वाढ अनुक्रमे ६९.७१ टक्के आणि १७४.३८ टक्के आहे.

सर्वांत कमी आवक वाढली ती प्रामुख्याने गहू या शेतमालाची.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत गव्हाची आवक केवळ ८६ क्विंटलने निव्वळ वाढल आहे. ही वाढ फक्त १.६७ टक्के आहे. परंतु १९७४-७५ ते १९८०-८१ या कालावधीत तालुक्यात गव्हाच्या लागवडीखालचे क्षेत्र वाढलेले आहे.

१९८४-८५ मध्यें सूर्यफूल, अंबाडी आणि चिंच यांना नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता देण्यात आली. त्यानंतर १९८७-८८ मध्ये ऐरंडी, कांदा, आंबा, निंबोळ्या यांना नियंत्रित वस्तू म्हणून मान्यता देण्यात आली. त्यामुळे १९८४-८५ आणि १९८७-८८ मध्ये या वस्तुंची आवक सुरु झाली. पैकी सुर्यफुलाची व कांदयाची आवक उल्लेखनिय आहे. १९८७-८८ मध्ये या वस्तुंची आवक सुर्यफूल २५,४९४ क्विंटल, कांदा २४,८०१ क्विंटल, उडिद ३ क्विंटल, ऐरंडी ३ क्विंटल, चिंच ५७ क्विंटल, आंबा ४८० क्विंटल, अंबाडी २४ क्विंटल आणि निंबोळ्या १२७० क्विंटल अशी होती.

## ब) कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा यांच्या आवारात येणा-या शेतमालाची किंमत:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात येणा-या शेतमालाची एकूण किंमत आणि त्या किंमतीच्या प्रवृत्तीत झालेला बदल याचे स्पष्टीकरण कोष्टक ७ मध्यें दर्शविले आहे.

बाजार समितीच्या आवारात येणा-या शेतमालाची एकूण किंमत १९७४-७५ मध्यें ३,०८,७७,४०० रुपये होती. ही किंमत १९८७-८८ मध्ये ११,७०,७३,५२६ रुपये झाली. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत शेतमालाची एकूण किंमत ८,६१,९६,१२६ रुपयांनी निव्वळवाढली आहे. ही वाढ २७९.१६ टक्के आहे. ही किंमत शेतक-यांनी मिळणारी होय.

शेतमालाच्या एकूण किंमतीत जी वाढ झाली आहे ती प्रामुख्याने शेंगाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे १९७४-७५ मध्यें शेंगाची एकूण किंमत ४८,६९,९०० रुपये होती. ती किंमत १९८७-८८ मध्यें ३,९१,५९,७४६ रुपये झाली. या १३ वर्षाच्या कालावधीत शेंगाच्या एकूण किंमतीत ३,४२,८९,८४६ रुपयांनी निव्वळ वाढ झाली आहे.

कोष्टक - ७

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात येणाऱ्या शेतमालाची एकूण किंमत

(रुपये)

| अ. नं. | शेतमालाचा प्रकार | १९७४-७५ मधील शेतमालाची एकूण किंमत | १९८७-८८ मधील शेतमालाची एकूण किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | ज्वारी | ४९,३९,३०० (१६.००) | २,८५,०५,५२० (२४.३५) |
| २) | बाजरी | ४,२८,३०० ( १.३९) | ५१,३५,३०० ( ४.३९) |
| ३) | गहू | १५,२२,००६ ( ४.९३) | १७,४५,८०० ( १.४९) |
| ४) | मका | ३,७१,३०० ( १.२०) | १३,२२,७९५ ( १.१३) |
| ५) | करडी | ६४,६३,२०० (२०.९३) | ४०,५५,७८० ( ३.४६) |
| ६) | शेंगदाणे | २,७६,९०० ( ०.९०) | १,३९,१७५ ( ०.१२) |
| ७) | शेंगा | ४८,६९,९०० (१५.७७) | ३,९१,५९,७४६ (३३.४५) |
| ८) | तिळ | २८,१०० ( ०.०९) | १२,७९० ( ०,०१) |
| ९) | जवस | १,२१,६०० ( ०.३९) | ८,७३० ( ०.०१) |
| १०) | मूग | ३६,८०० ( ०.१२) | ४,३१,२१० ( ०.३७) |
| ११) | मटकी | १,२३,१०० ( ०.४०) | ८,३९,२६५ ( ०.७२) |
| १२) | तूर | ७,६९,२०० ( २.४९) | ५५,३३,१०० (४.७३) |

(कोष्टक - ७ चालू)

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १३) | हुलगा | ३,०४,५०० ( ०.९९) | ६,२५,३६५ ( ०.५३) |
| १४) | हरभरा | ३०,६८,२९४ ( ९.९३) | १३,१३,८७५ ( १.१२) |
| १५) | जोड | ८,०३,००० ( २.६०) | २,२२,२८५ ( ०.१९) |
| १६) | मिरची | २५,९०,३०० ( ८.३९) | १२,२८,५९५ ( १.०५) |
| १७) | कापूस | ३,३८,३०० ( १.१०) | – |
| १८) | गूळ | ३७,७५,४०० (१२.२२) | ६२,०१,४५० ( ५.३०) |
| १९) | तांदूळ | ३५,६०० ( ०.१२) | २,१७,५५० ( ०.१८) |
| २०) | भात | १२,३०० ( ०.०४) | ६३,६३० ( ०.०५) |
| २१) | उडिद | – | ९०० |
| २२) | सूर्यफुल | – | १,७४,४९,३८५ (१४.९०) |
| २३) | ऐरंडी | – | १,००० |
| २४) | कांदा | – | २५,८६,३४० ( ०२.२१) |
| २५) | चिंच | – | १,५३,७६० ( ०.१३) |
| २६) | आंबा | – | ४८,००० ( ०.०४) |
| २७) | अंबाडी | – | ७,८८० ( ०.०१) |
| २८) | निंबोळी | – | ६३,५०० ( ० .०५) |
| | | ३,०८,७७,४००(१००) | ११,७०,७३,५२६(१००) |

टिप: कंसातील आकडे त्या प्रकारच्या शेतमालाच्या एकण किंमतीचे सर्व प्रकारच्या शेतमालाच्या एकूण किंमतीशी असलेले शेकडा प्रमाणी दर्शवितात.

संदर्भ: करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८

ही वाढ ७०४.१२ टक्के आहे. या कालावधीत शेंगाची एकूण किंमत प्रत्येक वर्षी सरासरी ५४.१६ टक्के दराने वाढली आहे. १९७४-७५ मध्यें शेंगाच्या एकूण किंमतीचे सर्व वस्तुंच्या किंमतीशी असलेले प्रमाण १५.७७ टक्के होते. ते १९८७-८८ या वर्षी ३३.४५ टक्के झाले.

शेंगाच्या खालोखाल ज्वारीच्या एकूण किंमतीत वाढ झाली आहे. १९७४-७५ मध्ये ज्वारीपासून मिळणारी एकूण किंमत ४९,३९,३०० रुपये होती. ही किंमत १९८७-८८ मध्ये २,८५,०५,५२० रुपये झाली. या कालावधीत ज्वारीच्या एकूण किंमतीत २,३५,६६,२२० रुपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ४७७.१२ टक्क्यांनी झाली आहे. विश्लेषण काळातील प्रत्येक वर्षी या वाढीचा दर सरासरी ३६.७० टक्के आहे. १९७४-७५ मध्यें ज्वारीच्या एकूण किंमतीचे सर्व वस्तुच्या एकूण किंमतीशी असलेले प्रमाण १६ टक्के होते. ते १९८७-८८ या वर्षी २४.३५ टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ ८.३५ टक्के आहे.

ज्वारीच्या खालोखाल सूर्यफुलाच्या एकूण किंमतीत वाढ झाली आहे. १९८४-८५ मध्यें सूर्यफुलाची एकूण किंमत ३६,७१,८६० रुपये होती. यात वाढ होऊन १९८७-८८ या वर्षी ती १,७४,४९,३८५ रुपये झाली आहे. या कालावधीत सूर्यफुलाच्या एकूण किंमतीत १,३७,७७,५२५ रुपयांनी निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ३७५.२२ टक्के आहे. १९८४-८५ मध्ये सूर्यफुलाच्या एकूण किंमतीचे सर्व वस्तुंच्या एकूण किंमतीशी असलेले प्रमाण ५.२१ टक्के होते. ते १९८७-८८ या वर्षी १४.९० टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ ९.६९ टक्के आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तूर बाजरी, गूळ, मका, गटकी, हुलगा, गहू, तांदूळ आणि भात यांच्या एकूण किंमतीत निव्वळ वाढ झाली असून ती अनुक्रमे ४७,६४,७०० रू., ४७,०७,००० रू., २४,२६,०५० रू., ९,५१,४९५ रू., ७,१६,१६५ रू., ३,२०,८६५ रू., २,२३,७१४ रू., १,८१,९५० रू. आणि ५१,३३० रुपये आहे.

एकूण शेतमालाच्या किंमतीत वाढ झाली असली तरी सर्वच वस्तुंच्या एकूण किंमतीत वाढ झालेली नाही. काही वस्तुंच्या पासून मिळणारी एकूण किंमत कमी झाली आहे. यात प्रामुख्याने करडीचा उल्लेख करावा लागेल. करडी पासून १९७४-७५ मध्ये ६४,६३,२०० रुपये एकूण किंमत प्राप्त होत होती. तीच किंमत १९८७-८८ मध्ये ४०,५५,७८० रुपयापर्यंत कमी झाली. या काळात करडीच्या एकूण किंमतीत २४,०७,४२० रुपये निव्वळ घट झाली आहे. ही घट ३७.२५ टक्के आहे. विश्लेषण काळातील सरासरी प्रत्येक वर्षी २.८६ टक्के दराने ही घट झाली आहे. १९७४-७५ मध्ये करडीच्या एकूण किंमतीचे सर्व वस्तुंच्या किंमतीशी असलेले प्रमाण २०.९३ टक्के होते. तेच प्रमाण १९८७-८८ मध्ये ३.४६ टक्के पर्यंत घटले. या कालावधीत या प्रमाणातील निव्वळ घट १७.४७ टक्के आहे. करडीची एकूण किंमत घटण्याचे कारण या कालावधीत करडीची आवक २९,६२६ क्विंटलने निव्वळ घटली आहे हेच म्हणावे लागेल.

या खालोखाल याच कालावधीत हरभ-याच्या एकूण किंमतीत घट झाली आहे. ही निव्वळ घट १७,५४,४११ रुपयांची आहे. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत हरभ-याच्या एकुण किंमतीचे सर्व वस्तुंच्या किंमतीशी असलेले प्रमाण ९.९३ टक्क्यापासून १.१२ टक्क्यापर्यंत घटले आहे. या प्रमाणातील निव्वळ घट ८.८१ टक्के आहे.

थोडक्यात असे सांगता येईल की १९७४-७५ मध्ये सर्व वस्तुच्या एकूण किंमतीमध्ये ज्वारी, करडी आणि शेंगा या वस्तुचा वाटा निम्म्यापेक्षा अधिक होता. ही परिस्थिती १९८७-८८ मध्ये बदललेली दिसते.

१९८७-८८ मध्ये शेंगा, ज्वारी आणि सुर्यफुल या वस्तुंची एकूण किंमत ८,५१,१४,६५१ रुपये होती. या वस्तुंच्या एकूण किंमतीचे सर्व वस्तुंच्या एकूण किंमतीशी असलेले प्रमाण ७२.७० टक्के होते.

यावरून हे स्पष्ट होते की करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेंगा, ज्वारी आणि सूर्यफुल या वस्तुंच्या खरेदीच्या उलाढाली मोठया प्रमाणावर होत होत्या. त्यातही प्रामुख्याने शेंगा आणि सूर्यफुल या तेलबियांचा हिस्सा अनुक्रमे ३३.४५ टक्के आणि १४.९ टक्के आहे. म्हणजेच करमाळा बाजार समितीच्या आवारात सूर्यफुल आणि शेंगा या दोन तेलबियांच्या व्यवहाराचे सर्व वस्तुच्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराशी ४९.३५ टक्के प्रमाण आहे.

## क) कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा यांच्या आवारात शेतमालाला मिळणारी प्रती क्विंटलची किंमत:

बाजार समितीच्या आवारात येणारी शेतमालाची आवक आणि शेतमालाला प्रतिक्विंटलला मिळणारी किंमत या बाबतचा तपशील कोष्टक ८ मध्ये दिलेला आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत प्रति क्विंटलची किंमत ही वाढली आणि शेतमालाची आवक वाढली असा शेतमाल या प्रमाणे ज्वारी, शेंगा बाजरी, मका, तूर, हुलगा, मूग, मटकी, भात आणि गहू होता. या शेतमालाची आवक अनुक्रमे १,१०,५७६ क्विं., ४१,७८१ क्विं., २६,९२७ क्विंटल, ४,६०१ क्विं., ४,०६० क्विं., १,५७६ क्विं., ७६७ क्विं., ५६० क्विं., २११ क्विं., आणि ८६ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. याच कालावधीत याच शेतमालाची प्रति क्विंटलची निव्वळ वाढलेली किंमत अनुक्रमे २७ रू., ३९१ रू., ३० रू., ४२ रू., ४९२ रू., ३१ रू., २६७ रू., ४५४ रू., ९० रू. आणि ३८ रूपये आहे.

शेकडा किंमत वाढीनुसार विचार केल्यास मटकीची किंमत विश्लेषण काळात सर्वात जास्त वाढली आहे. ही किंमत ३१८.०६ टक्क्यांनी वाढली आहे. ही वाढ प्रत्येक वर्षी सरासरी २४.४७ टक्के दराने झालेली आहे. त्या नंतर तूर आणि भात यांची किंमत वाढली आहे. ही वाढ अनुक्रमे २६०.३२ टक्के आणि २२५.४९ टक्के झाली आहे. ही वाढ प्रत्येक वर्षी सरासरी अनुक्रमे २०.०२ टक्के आणि १७.३५ टक्के दराने झाली आहे. त्यानंतर शेंगा आणि मूग यांची किंमत

कोष्टक - ८

कृषी उत्पन्न बाजार समिती करमाळा यांच्या आवारात

शेतमालाला मिळणारी प्रति क्विंटलची किंमत:

(रुपये)

| अ. नं. | शेतमाल | १९७४-७५ मधील आवक (क्विंटलमध्ये) | १९७४-७५ मधील किंमत | १९८७-८८ मधील आवक (क्विंटलमध्ये) | १९८७-८८ मधील किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | ज्वारी | २७,६२५ | १७९ | १,३८,२०१ | २०६ |
| २) | बाजरी | ३,०१७ | १४२ | २९,९४४ | १७२ |
| ३) | गहू | ५,१२८ | २१७ | ५,२१४ | ३३५ |
| ४) | मका | २,६३४ | १४१ | ७,२३५ | १८३ |
| ५) | करडी | ३७,५५९ | १७२ | ७,९३३ | ५११ |
| ६) | शेंगदाणे | ८२२ | ३३७ | १,३९५ | - |
| ७) | शेंगा | २४,६५० | १९८ | ६६,४३१ | ५८१ |
| ८) | तिळ | ९२ | ३०५ | २१ | ६०१ |
| ९) | जवस | ५४४ | २२४ | १५ | ५८२ |
| १०) | मूग | २११ | १७४ | ९७८ | ४४१ |
| ११) | तूर | ४,०६१ | १८१ | ८,१२९ | ६८१ |
| १२) | मटकी | ८३३ | १४८ | १,३९३ | ६०२ |
| १३) | हुलगा | २,४४९ | १२४ | ४,०२५ | १५५ |
| १४) | हरभरा | ४,२३९ | ७२४ | २,९३० | ४४८ |
| १५) | जोड | ४८० | - | ७१२ | - |
| १६) | मिरची | ३,३५५ | ७७२ | ७२४ | १६९७ |
| १७) | कापूस | १,०५१ | ३११ | - | - |
| १८) | गुळ | २३,४०४ | १६१ | १७,४३१ | ३५६ |
| १९) | भात | १२१ | १०२ | ३३२ | १९२ |
| २०) | तांदूळ | ३१५ | - | ५,४४६ | - |
| २१) | उडिद | - | - | ३ | ३०० |
| २२) | सुर्यफुल | - | - | २५,४१४ | ६८४ |

पुढील पानावर

(कोष्टक-८ )

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २३) | ऐरंडी | – | – | ३ | ३३३ |
| २४) | कांदा | – | – | २४,८०१ | १०४ |
| २५) | चिंच | – | – | ५७ | २६९८ |
| २६) | आंबा | – | – | ४८० | १०० |
| २७) | अंबाडी | – | – | २४ | ३२८ |
| २८) | निंबोळी | – | – | १,२७० | ५० |

आधार : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे वार्षिक अहवाल १९७४-७५ व १९८७-८८.

१९७.४७ आणि १५३.४५ टक्क्यांनी वाढली आहे. ही वाढ प्रत्येक वर्षी सरासरी १५.१९ टक्के आणि ११.८० टक्के दराने झाली आहे. यानंतर मका, बाजरी, ज्वारी आणि गहू यांची किंमत अनुक्रमे २९.७९ टक्के, २१.१३ टक्के, १५.०८ टक्के आणि १३.१८ टक्क्यांनी वाढली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ही वाढ अनुक्रमे २.२९ टक्के, १.६२ टक्के, १.१६ टक्के आणि १.०१ टक्के दराने झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत किंमत वाढली आणि आवक कमी झाली असा शेतमाल प्रामुख्याने करडी, गूळ, मिरची, जवस आणि तीळ या प्रमाणे आहे. या शेतमालाची या कालावधीत निव्वळ घटलेली आवक अनुक्रमे २१,६२६ क्विं., ५,९६५ क्विं., २,६३१ क्विं., ५२९ क्विं., आणि ७१ क्विंटल आहे. या कालावधीत या शेतमालाच्या प्रति क्विंटलच्या किंमतीत निव्वळ झालेली वाढ अनुक्रमे ३३९ रू., ११५ रू., १२५ रू., ३५८ रू. आणि ३०४ रूपये आहे.

हरभरा या शेतमालाची मात्र विश्लेषण काळात किंमत व आवक या दोहोंतही घट झालेली आहे. आवक १३०१ क्विंटलने निव्वळ घटली आहे. ही घट ३०.८८ टक्क्यांनी झाली आहे. ही घट प्रत्येक वर्षी सरासरी २.३७ टक्के दराने

झाली आहे. प्रति क्विंटलच्या किंमतीतील निव्वळ घट २७६ रूपयांनी झाली आहे. ही घट ३८.१२ टक्क्यांनी झाली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी २.९३ टक्के दराने किंमत घटली आहे. या वरून हे सांगता येईल की आवकेतील प्रत्येक वर्षीच्या सरासरी घटी पेक्षा किंमतीच्या प्रत्येक वर्षीच्या सरासरी घटीचा दर ०.५१ टक्क्यांनी जास्त आहे.

१९७४.७५ मध्ये शेंगदाणे व कापसाची प्रत्येक क्विंटलची किंमत अनुक्रमे ३३७ रू. आणि ३१९ रूपये होती.

१९८७-८८ मध्ये चिंच, सूर्यफूल, ऐरंडी, अंबाडी, उडिद, कांदा, आंबा आणि निंबोळी यांची प्रत्येक क्विंटलची किंमत अनुक्रमे २,६९८ रू., ६८४ रू., ३३३ रू., ३२८ रू., ३०० रू., १०४ रूपये, १०० रूपये आणि ५० रूपये होती.

ड) सहकारी संस्थामार्फत येणारी आवक:

भारत सरकारने कृषी विपणन व्यवस्थेतील दोष कमी करण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सहकारी संस्थामार्फत येणा-या आवकेचा तपशिल कोष्टक नऊ(९) मध्ये दिलेला आहे.

करमाळा बाजार क्षेत्रात जेऊर या उप-बाजार आवारात सहकारी खरेदी विक्री संघाचे एकच आडत दुकान आहे. या संघाला व्यापारी म्हणून नियंत्रि बाजार पेठेकडून परवाना घ्यावा लागतो. सहकारी खरेदी-विक्री संघा मार्फत नियंत्रित केलेल्या सर्व वस्तु येतात.

सहकारी खरेदी विक्री संघामार्फत येणा-या आवकेचे एकूण आवकेशी असणारे प्रमाण मुळातच अल्प आहे. १९७४-७५ च्या तुलनेने १९८७-८८ मध्ये हे प्रमाण आणखीन कमी झाले आहे. तसेच या प्रमाणात अस्थिरता आहे.

कोष्टक - ९

सहकारी संस्थामार्फत येणारी आवक (क्विंटल)

| वर्ष | एकूण आवक | सहकारी संस्था मार्फत येणारी आवक | एकूण आवकेशी सहकारी संस्था मार्फत येणाऱ्या आवकेचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४-७५ | १,४२,६०६ | ५,२२६ | ३.६६ |
| १९७५-७६ | १,७०,७३७ | ३,६६४ | २.१४ |
| १९७६-७७ | २,०९,५७४ | ३,३०९ | १.५८ |
| १९७७-७८ | २,३८,६३८ | ४,३१९ | १.८१ |
| १९७८-७९ | २,१४,७३२ | उ.ना. | - |
| १९७९-८० | २,०३,२०६ | ९,३४१ | ४.६० |
| १९८०-८१ | २,५२,४७३ | ६,२६८ | २.४८ |
| १९८१-८२ | १,७५,८०३ | ४,९०९ | २.७९ |
| १९८२-८३ | १,२८,३०८ | ६,००७ | ४.६८ |
| १९८३-८४ | २,७०,८८४ | ५,४७४ | २.०२ |
| १९८४-८५ | २,६२,९१२ | ६,१९९ | २.३६ |
| १९८५-८६ | २,४९,१४८ | ४,९९७ | २.००० |
| १९८६-८७ | १,२२,२१२ | २,५८९ | २.१२ |
| १९८७-८८ | ३,५०,६२९ | २,१४९ | ०.६ |
| एकूण | २९,९१,८६२ | ६४,४५१ | २.१५ |

टिप : उ. ना. उपलब्ध नाही.

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८.

१९७४-७५ ते १९८७-८८ या १३ वर्षांच्या कालावधीत सहकारी संस्थामार्फत आलेली एकूण आवक ६४,४५१ क्विंटल होती. तर याच कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमधील एकूण आवक २९,९१,८६२ क्विंटल होती. सहकारी संस्थामार्फत येणाऱ्या आवकेचे एकूण आवकेशी असलले प्रमाण २.१५ टक्के होते. या कालावधीत सहकारी संस्थाची एकूण आवक ५९,२२५ क्विंटलने तर कृषी उत्पन्न बाजार समिताची एकूण आवक २८,४९,२५६ क्विंटलेनवाढली आहे.

१९७४-७५ मध्ये सहकारी संस्थेमार्फत येणाऱ्या आवकेचे एकूण आवकेशी ३.६६ टक्के प्रमाण होते यात घट होऊन १९८७-८८ मध्ये ते प्रमाण ०.६ टक्के झाले. १९७४-७५, १९७९-८०, १९८२-८३ व १९८७-८८ या वर्षाचा अपवाद वगळल्यास हे प्रमाण १.५८ ते २.७९ टक्क्यांच्या दरम्यान आहे. या अपवाद असलेल्या वर्षी हे प्रमाण अनुक्रमे ३.६६ टक्के, ४.६० टक्के, ४.६८ टक्के व ०.६ टक्के होते.

थोडक्यात करमाळा बाजार समितीच्या आवारात सहकारी संस्थामार्फत येणारी आवक अतिशय अल्प म्हणजे (१९७४-७५ ते १९८७-८८ या काळातील सरासरी) २.१५ टक्के आहे. याच्या कारणासंबंधी शेतकऱ्यांशी चर्चा केली असता असे समजले की खाजगी व्यापारी किंवा सहकारी खरेदी-विक्री संघ यापैकी कोणीही आम्ही शेतमाल त्यांच्या दुकानात विक्रीला टाकल्या शिवाय पैसे देत नाहीत. मग अशा वेळेला आम्हाला खाजगी व्यापाऱ्याकडेच शेतमालाची विक्री करणे सोयीस्कर जाते कारण खाजगी व्यापाऱ्याकडे फॉर्म भरण्याची गरज नसून शेतमाल विक्रीला टाकला की लगेच पैसे मिळतात. व संध्याकाळ पर्यंत शेतमालाचा लिलाव होऊन काटा पट्टी मिळते. व हिशोब पूर्ण होतो. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संघात शेतमालाची विक्री करण्या ऐवजी खाजगी व्यापाऱ्याकडे शेतमालाची विक्री करणे शेतकरी अधिक पसंत करतात.

या परिस्थितीतमिला सहकारी खरेदी विक्री संस्थाची उदासिनता अथवा

या संस्थावरील कायदेशीर निर्बंध जबाबदार असू शकतील. बाजार समितीमध्ये खरेदी-विक्री संघाचा अध्यक्ष प्रतिनिधी म्हणून घेण्यामागे सहकारी संस्थाचा अधिकाधिक सहभाग असावा अशी अपेक्षा असावी. करमाळा बाजार पेठेत मात्र सहकारी खरेदी विक्री संघाचा कोणताच प्रभाव पडल्याचे आढळत नाही.

या बाबतीत सहकारी खरेदी-विक्री संघाच्या पदाधिका-याशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगीतले की करमाळा बाजार आवारात खरेदी-विक्री संघाचा प्रभाव न पडण्याचे कारण या बाजारपेठेच्या स्थापनेनंतर संघाची स्थापना झाली. शिवाय करमाळा नियंत्रित बाजारपेठेचे कार्य व्यवस्थित चालत असल्यामुळे संघात शेतमालाची विक्री करण्यापेक्षा शेतकरी खाजगी व्यापा-याकडेच शेतमालाची विक्री करणे पसंत करतात. कारण त्या ठिकाणी शेतक-यांना फॉर्म वगैरे कोणत्याच गोष्टीची पुर्तता करावी लागत नाही.

.....

प्रकरण ४ थे

## भाग ३ रा

प्रस्तुत अभ्यासाचा विशेष उद्देश करमाळा शेतमाल नियंत्रित बाजारपेठेतील तेलबियांचा अभ्यास करणे हा असल्याने या बाजारपेठेतील तेलबियांची आवक व तेलबियांना मिळणारी किंमत यांचा स्वतंत्रपणे विचार केलेला आहे.

अ) तेलबियांच्या आवके मधील बदल:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात विक्री होणा-या तेलबियांच्या आवकेत १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत बदल झाला आहे. हा बदल कोष्टक १० मध्ये दर्शविला आहे.

१९७४-७५ मध्ये तेलबियांची एकूण आवक ६३,६६७ क्विंटल होती. यात वाढ होऊन १९८७-८८ मध्ये तेलबियांची एकूण आवक १,०१,२८९ क्विंटल झाली. या १३ वर्षाच्या कालावधीत तेलबियांची निव्वळ आवक ३७,६२२ क्विंटलने वाढली. ही वाढ ५९.०९ अक्क्यांनी झाली आहे. ही वाढ प्रत्येक वर्षी सरासरी ४.५४ टक्के दराने झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तेलबियांची एकंदर आवक वाढली असली तरी या आवकेत चढउतार झाल्याचे आढळते. तेलबियांची सर्वात कमी आवक १९८२-८३ मध्ये झाल्याचे दिसून येते. ही आवक फक्त ३५,६०४ क्विंटल होती. १९७५-७६, १९७६-७७, १९८१-८२ या वर्षीही मूळ वर्षाच्या तुलनेत तेलबियांची आवक कमी होती.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत बाजारपेठेतील एकंदर तेलबियांची आवक वाढली आहे. परंतु अभ्यासाच्या कालावधीत एकूण शेतमालामध्ये असणारा तेलबियांचा प्रभाव कमी झाला आहे. १९७४-७५ मध्ये तेलबियांच्या आवकेचे एकूण आवकेशी असणारे प्रमाण ४४.६५ टक्के म्हणजे जवळ जवळ निम्मे होते. १९८७-८८ मध्ये हे प्रमाण २८.२९ टक्के झाले आहे. हे प्रमाण सर्वात जास्त १९८६-८७ मध्ये असून ते ६१.४९ टक्के आहे.

कोष्टक - १०


करमाळा कृषी उत्पन्न बाजारपेठेतील तेलबियांची आवक (१९७४-७५ ते १९८७-८८)

(क्विंटल)

| वर्ष | एकुण आवक | तेलबियांची आवक | एकुण आवकेशी तेल- बियांच्या आवकेचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४-७५ | १,४२,६०६ | ६३,६६७ | ४४.६५ |
| १९७५-७६ | १,७०,७३७ | ५६,९४३ | ३३.३५ |
| १९७६-७७ | २,०९,५७४ | ६०,९०७ | २९.०६ |
| १९७७-७८ | २,३८,६३८ | ८३,१४१ | ३४.८४ |
| १९७८-७९ | २,१४,७३२ | ७८,८९४ | ३६.७४ |
| १९७९-८० | २,०३,८३६ | ७२,३८५ | ३५.५१ |
| १९८०-८१ | २,५२,४७३ | ६८,७४७ | २७.२३ |
| १९८१-८२ | १,७५,८०३ | ५२,२२१ | २७.७० |
| १९८२-८३ | १,२८,३०८ | ३५,६०४ | २९.७५ |
| १९८३-८४ | २,७०,८८४ | ९२,७८८ | ३४.२५ |
| १९८४-८५ | २,६२,९१२ | ९५,१३७ | ३६.११ |
| १९८५-८६ | २,४९,१४८ | ८१,९२२ | ३२.८८ |
| १९८६-८७ | १,२२,२१२ | ७५,१५० | ६१.४९ |
| १९८७-८८ | ३,५०,६२९ | १,०१,२८९ | २८.२९ |

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तेलबियांची आवक ५९.०९ टक्क्याने वाढली तर एकुण शेतमालाची आवक १४५.८७ टक्क्याने वाढली.


तेलबियांच्या आवकेमधील बदल
-: प्रमाण :-
'अय' अक्ष १ सेमी = ५००० क्विंटल
'अक्ष' अक्ष १ सेमी = १ वर्ष
य
११०
१०५
१००
९५
९०
८५
८०
७५
७०
६५
६०
५५
५०
४५
४०
३५
३०
२५
२०
१५
१०
५
अ
क्ष
तेलबियांची आवक (००० क्विंटल)
तेलबियांचा आवक वक्र
प्रवृत्ती रेषा
७१.५७+१.६८
१९७४-७५
७५-७६
७६-७७
७७-७८
७८-७९
७९-८०
८०-८१
८१-८२
८२-८३
८३-८४
८४-८५
८५-८६
८६-८७
८७-८८
कालखंड

१९७४–७५ च्या तुलनेत १९८७–८८ मध्ये तेलबियांच्या आवकेचे एकूण शेतमालाच्या आवकेशी असलेले प्रमाण १५.७६ टक्क्यांनी घटले आहे. याची कारणे अशी सांगता येतील.

१) तेलबियांतील करडी या महत्त्वाच्या तेलबियांची आवक १९७५–७५ ते १९८७–८८ या कालावधीत २९,६२६ क्विंटलने निव्वळ घटली आहे.

२) सूर्यफुलाला नियंत्रित वस्तु म्हणून १९८४–८५ मध्ये मान्यता मिळाली. परंतु करडीच्या आवकेतील घट भरून काढण्या इतकी सूर्यफूलाची आवक झाली नाही.

३) तालुक्यातील पिकाच्या लागवडी खालील क्षेत्रातही काही उल्लेखनीय बदल झाले. कडधान्याच्या लागवडी खालील क्षेत्र वाढले तसेच बाजरीच्या लागवडी खालचे क्षेत्र वाढले.

ब) <u>तेलबियांचे पैशातील मूल्य किंवा</u>
<u>तेलबियांच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न</u>:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात होणाऱ्या तेलबियांच्या विक्रीपासून शेतकऱ्यांना मिळणारे पैशातील उत्पन्न आणि या उत्पन्नाचे सर्व वस्तुंच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाशी असलेले प्रमाण कोष्टक ११ मध्ये दर्शविले आहे.

विश्लेषण कालावधीत सर्व वस्तुंच्या मूल्याशी तेलबियांच्या मूल्याचे प्रमाण वाढले आहे. १९७४–७५ मध्ये हे प्रमाण ३८.११ टक्के होते. १९८७–८८ मध्ये ते प्रमाण ५१.९६ टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात १३.८५ टक्क्यांनी निव्वळ वाढ झाली आहे. वाढीचा सरासरी वेग १ टक्का आहे.

सर्व वस्तुंच्या मूल्याशी तेलबियांच्या मूल्याचे प्रमाण सर्वात जास्त १९८६–८७ मध्ये असून ते ५७.६३ टक्के होते. सर्वात कमी प्रमाण १९८०–८१ मध्ये असून ते ३६.३५ टक्के होते.

कोष्टक - ११

तेलबियाचे पैशातील मूल्ये

(रुपये)

| वर्ष | सर्व वस्तुचे पैशातील मूल्य | तेलबियाचे पैशातील मूल्य | तेलबियांच्या मूल्याचे सर्व वस्तुंच्या मूल्याशी असलेले शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४-७५ | ३,०८,७७,४०० | १,१७,६८,७०० | ३८.११ |
| १९७५-७६ | उ.ना. | १,०२,६८,४८२ | - |
| १९७६-७७ | ३,९४,२३,६२३ | १,४७,९३,११० | ३७.५३ |
| १९७७-७८ | ३,७५,७६,९८९ | १,६२,३४,१४० | ४३.२० |
| १९७८-७९ | ४,४७,२४,५३८ | २,०३,८१,७९० | ४५.५७ |
| १९७९-८० | ४,४९,५६,२३० | २,०३,३६,६२० | ४५.२४ |
| १९८०-८१ | ६,४९,८४,५९२ | २,३६,२३,००० | ३६.३५ |
| १९८१-८२ | ४,८७,३०,६८० | १,८२,८६,३२८ | ३७.५३ |
| १९८२-८३ | ३,४६,९९,१११ | १,४६,४९,८१० | ४२.२२ |
| १९८३-८४ | ७,८४,४८,३०० | ३,९७,३७,४९५ | ५०.६५ |
| १९८४-८५ | ७,०४,१२,४४६ | ३,८७,६६,१४० | ५५.०६ |
| १९८५-८६ | ८,९६,५८,६६० | ३,९३,५८,६२४ | ४३.९० |
| १९८६-८७ | ८,६०,२३,६२७ | ४,९५,७८,६२५ | ५७.६३ |
| १९८७-८८ | ११,७०,७३,५२६ | ६,०८,२५,६०६ | ५१.९६ |

टिप : उ.ना. = उपलब्ध नाही.

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल
१९७४-७५ ते १९८७-८८

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात १९७४-७५ मध्ये तेलबियांच्या विक्री पासून शेतक-यांना जे उत्पन्न प्राप्त होत होते त्याचे प्रमाण सर्व वस्तुंच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नाशी ३८.११ टक्के होते. यात वाढ होऊन १९८७-८८ मध्ये ते प्रमाण ५१.९६ टक्के झाले.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तेलबियांच्या आवकेचे एकूण आवकेशी असलेले प्रमाण मात्र ४४.६५ टक्क्यापासून २८.८९ टक्क्यापर्यंत घटले आहे. परंतु तेलबियांच्या मूल्याचे सर्व वस्तुंच्या मूल्याशी असलेले प्रमाण १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत मात्र ३८.११ टक्क्यापसून ५१.९६ टक्क्यापर्यंत वाढले आहे.

अशी परिस्थिती उद्भवण्याचे कारण किंमतीत व आवकेत झालेल्या वाढीचे प्रमाण हे मानता येईल. कोष्टक १२ मध्ये १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीतील प्रमुख वस्तुंचे किंमत निर्देशांक व आवक निर्देशांक दर्शविले आहेत.

या निर्देशांका वरून असे दिसते की शेंगाच्या किंमत निर्देशांकात (२९७.४७) जितके बदल झाले आहेत जवळ जवळ तितकेच बदल शेंगाच्या आवक निर्देशांकात (२६९.५०) झाले आहेत. या उलट ज्वारी व बाजरीच्या किंमतीत (११५.०८ व १२१.१३) झालेल्या वाढी पेक्षा ज्वारी व बाजरीची आवक (५००.२८ व ९९२.१५) अधिक प्रमाणात झालेली आहे. सूर्यफुलाला नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता मिळाल्यानंतर सूर्यफुलाच्या किंमतीत (१५३.३६) झालेल्या वाढीपेक्षा आवक अधिक असली तरी ज्वारी व बाजरीच्या तुलनेत सूर्यफलाची किंमत जास्त वाढली आहे व आवक कमी आहे.

सर्वात जास्त वाढ मटकीच्या किंमत निर्देशांकात झाली आहे. १९८७-८८ साली मटकीचा निर्देशांक ४०६.७६ आहे व सर्वात कमी किंमत निर्देशांक हरभ-याचा असून तो ६१.८७ आहे. आवक निर्देशांक सर्वात जास्त बाजरीचा असून तो ९९२.५१ आहे आणि सर्वात कमी आवक निर्देशांक मिरचीचा असून तो २१ आहे.

कोष्टक – १२

प्रमुख वस्तुंचे किंमत निर्देशांक व आवक निर्देशांक(१९७४–७५ ते १९८७–८८)

| अ. नं. | शेतमालाचे नांव | किंमत निर्देशांक | आवक निर्देशांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | ज्वारी | ११५.०८ | ५००.२८ |
| २) | बाजरी | १२१.१३ | १९२.१५ |
| ३) | गहू | ११२.७९ | १०१.६८ |
| ४) | मका | १२९.७९ | २७४.६८ |
| ५) | करडी | २९७.४७ | २१.१२ |
| ६) | शेंगा | २९७.४७ | २६९.५० |
| ७) | तीळ | १९९.६७ | २२. ८३ |
| ८) | जवस | २५९.८२ | ३६.२६ |
| ९) | मूग | २५३.०० | ४६३.५० |
| १०) | तूर | ३६०.३१ | १९९.७८ |
| ११) | मटकी | ४०६.७६ | १६७.२३ |
| १२) | हुलगा | १२५.०० | १६४.३५ |
| १३) | हरभरा | ६१.८७ | ६९.०० |
| १४) | मिरची | २१९.८२ | २१.०० |
| १५) | गूळ | २२१.०० | ७४.५७ |
| १६) | भात | १८८.२३ | २७४.३८ |
| १७) | सूर्यफुल | १५३.३६(x) | ३०९.४३(x) |

(x) १९८४–८५ ते १९८७–८८ या कालावधीतील किंमत निर्देशांक व आवक निर्देशांक आहेत.

संदर्भ : प्रकरण ४ मधील कोष्टक ६ आणि ८ च्या आधारे.

तेलबियांची आवक आणि तेलबियांना मिळणारी किंमत यांच्यात असणारा सहसंबंध अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतची आवश्यक ती माहिती कोष्टक १३ मध्ये दिलेली आहे.

<u>कोष्टक – १३</u>

<u>प्रमुख तेलबियांची आवक आणि त्यांची प्रति क्विंटलची किंमत</u>

| वर्ष | करडी | | शेंगा | | सूर्यफुल | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आवक (क्विंटल) | किंमत (रुपये) | आवक (क्विंटल) | किंमत (रुपये) | आवक (क्विंटल) | किंमत (रुपये) |
| १ | २ | | ३ | | ४ | |
| १९७४–७५ | ३७,५५९ | १७२ | २४,६५० | १९८ | – | – |
| १९७५–७६ | १३,५६३ | १३२ | ४२,३३७ | १९५ | – | – |
| १९७६–७७ | १८,४१० | २२१ | ४१,९९१ | २५२ | – | – |
| १९७७–७८ | ७,८३६ | १९१ | ७४,४१८ | १९४ | – | – |
| १९७८–७९ | ११,५८९ | २०० | ५८,८७३ | २७४ | – | – |
| १९७९–८० | ९,१६७ | २७० | ६२,२२३ | २८१ | – | – |
| १९८०–८१ | १७,२७६ | ३४४ | ५१,१५९ | ३४३ | – | – |
| १९८१–८२ | १७,३०६ | ३४० | ३४,२४० | ३५८ | – | – |
| १९८२–८३ | ११,५७६ | ३४२ | २२,२०९ | ४७१ | – | – |
| १९८३–८४ | २२,७८२ | ३७२ | ६१,५२० | ४४७ | – | – |
| १९८४–८५ | ११,०९९ | ३५४ | ७३,९३५ | ४११ | ८,२२९ | ४४६ |
| १९८५–८६ | १७,३८२ | उ. ना. | ५५,५३० | ६१८ | ८,८७१ | ४८७ |
| १९८६–८७ | ९,५६५ | ५१८ | ५१,१०१ | ६८१ | ६,४०६ | ६७१ |
| १९८७–८८ | ७,९३३ | ५११ | ६६,४३१ | ५८१ | २५,४९४ | ६८४ |

टिप : प्रति क्विंटलची किंमत ही त्या वर्षातील सरासरी किंमत आहे.

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल
१९७४–७५ ते व १९८७–८८.

कोष्टकावरून हे स्पष्ट होते की १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तेलबियांना मिळणारी किंमत व तेलबियांची आवक यांच्यात संबंध दिसून येत नाही.

१९७४-७५ ते १९७५-७६ या वर्षात करडीची किंमत प्रति क्विंटल ४२ रूपयांनी कमी झाली. या बरोबरच आवक २३,९९६ क्विंटलने कमी झाली. १९७५-७६ ते १९७६-७७ या वर्षात करडीची प्रति क्विंटलची किंमत ८९ रूपयांनी वाढली. व आवक ४,८४७ क्विंटलने वाढली. १९७६-७७ ते १९७७-७८ या वर्षी करडीची आवक व किंमत दोन्हीतही घट झाली आहे.

१९७७-७८ ते १९७८-७९ या वर्षात करडीची प्रति क्विंटलची किंमत ९ रूपयांनी वाढली. या बरोबरच ११,७४९ क्विंटलने आवक वाढली. १९७८-७९ ते १९७९-८० या वर्षात करडीची प्रति क्विंटलची किंमत ७० रूपयांनी वाढली. परंतु आवक १०,४२२ क्विंटलने घटली. १९७९-८० ते १९८०-८१ या वर्षात करडीची प्रति क्विंटलची किंमत व आवक यांच्यात वाढ झाली. प्रति क्विंटलची किंमत ७४ रूपयांनी वाढली तर आवक ८,१०९ क्विंटलने वाढली.

१९८०-८१ ते १९८१-८२ या वर्षात करडीची किंमत ४ रूपये प्रती क्विंटलने घटली. तर आवक ३० क्विंटलने वाढली. १९८१-८२ ते १९८२-८३ या वर्षात करडीची किंमत २ रूपयांनी वाढली पण आवक ५,७३० क्विंटलने घटली. १९८२-८३ ते १९८३-८४ या वर्षात करडीची प्रतिक्विंटलची किंमत व आवक यांच्यात वाढ झाली आहे. किंमत ३० रूपयांनी व आवक ११,२०६ क्विंटलने वाढली आहे.

१९८३-८४ ते १९८४-८५ या वर्षात करडीची प्रति क्विंटलची किंमत १८ रूपयांनी घटली. तर आवक ११,६८३ क्विंटलने घटली. १९८४-८५ ते १९८६-८७ या कालावधीत करडीची प्रति क्विंटलची किंमत १६४ रूपयांनी वाढली. पण आवक २,५३४ क्विंटलने घटली. १९८६-८७ ते १९८७-८८ या वर्षात करडीची किंमत ७ रूपयांनी घटली त्या बरोबरच १६३२ क्विंटलने आवक घटली.

करडी प्रमाणेच शेंगाची प्रति क्विंटलची किंमत व आवक यांच्यात विश्लेषण काळात संबंध दिसून येत नाही.

१९७४-७५ ते १९७५-७६ या वर्षात शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ३ रूपयांनी घटली पण आवक मात्र १७,६८७ क्विंटलने वाढली. १९७५-७६ ते १९७६-७७ या वर्षात शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ५० रूपयांनी वाढली तर आवक ३४६ क्विंटलने घटली.

१९७६-७७ ते १९७७-७८ या वर्षी शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ५८ रूपयांनी कमी झाली. पण आवक ३३,४२० क्विंटलने वाढली. १९७७-७८ ते १९७८-७९ या वर्षात शेंगाची किंमत ८० रूपये क्विंटलने वाढली. पण आवक १९,५४५ क्विंटलने कमी झाली. १९७८-७९ ते १९७९-८० या वर्षात शेंगाची किंमत व आवक यांच्यात वाढ झाली ही वाढ अनुक्रमे ७ रूपये प्रति क्विंटल व ३,३५० क्विंटलची आहे.

१९७९-८० ते १९८२-८३ या कालावधीत शेंगाची प्रति क्विंटलची किंमत १९० रूपयांनी वाढली व आवक ४०,०१४ क्विंटलने घटली. १९८२-८३ ते १९८४-८५ या कालावधीत शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ५२ रूपयांनी घटली आणि आवक ५१,७२६ क्विंटलने वाढली आहे.

१९८४-८५ ते १९८५-८६ या वर्षात शेंगाची किंमत १९९ रूपये प्रति क्विंटल प्रमाणें वाढली परंतु आवक १८,४५० क्विंटलने घटली आहे. १९८५-८६ ते १९८६-८७ या वर्षात शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ६३ रूपयांनी वाढली त्या बरोबरच आवक ३,५७१ क्विंटलने वाढली. १९८६-८७ ते १९८७-८८ या वर्षात शेंगाची प्रति क्विंटलची किंमत ९२ रूपयांनी वाढली. परंतु आवक ७,३३० क्विंटलने घटली.

करडी व शेंगा प्रमाणेच सूर्यफुलाची किंमत व आवक यांच्यात संबंध दिसून येत नाही.

१९८४-८५ ते १९८५-८६ या वर्षात सूर्यफुलाची किंमत ४१ रुपये प्रति क्विंटल प्रमाणे वाढली. या बरोबर आवक ६४२ क्विंटलने वाढली. १९८५-८६ ते १९८६-८७ या वर्षात सूर्य-फुलाची प्रति क्विंटलची किंमत १८४ रुपयांनी वाढली पण आवक २,४६५ क्विंटलने कमी झाली. १९८६-८७ ते १९८७-८८ या वर्षात सूर्यफुलाची प्रति क्विंटलची किंमत १३ रुपयांनी वाढली व आवक १९,०८८ क्विंटलने वाढली.

यावरून हे स्पष्ट होते की विश्लेषण काळात प्रमुख तेलबियांना मिळणारी किंमत व त्याची आवक यांच्यात सहसंबंध नाही. म्हणजेच तेलबीयांच्या आवकेवर तेलबियांच्या किंमती शिवाय इतर कोणत्यातरी घटकांचा प्रभाव पडतो.

क) करमाळा बाजार आवारात येणा-या तेलबियांचे वर्गीकरण :

करमाळा बाजार समितीच्या आवारात येणा-या तेलबियांची आवक आणि मूल्य यांचा विचार केल्यानंतर या तेलबियांत प्रामुख्याने कोणत्या तेलबियांचा हिस्सा जास्त आहे व त्यात कसा बदल होत गेला याचे स्पष्टीकरण कोष्टक १४ मध्ये केले आहे.

१९७४-७५ मध्ये तेलबियांची आवक एकूण आवक ६३,६६७ क्विंटल होती. यात प्रामुख्याने करडीची आवक सर्वात जास्त म्हणजे ३७,५५९ क्विंटल होती. एकूण तेलबियांच्या आवकेशी करडीच्या आवकेचे प्रमाण ५८.९९ टक्के होते. त्या खालोखाल शेंगाची आवक होती. ती आवक २४,६५० क्विंटल होती. एकूण आवकेशी शेंगाच्या आवकेचे प्रमाण ३८.७२ टक्के होते. म्हणजेच तेलबियांच्या उत्पादनात करडी आणि शेंगा यांचा हिस्सा ९७.७१ टक्के होता. आणि इतर तेलबियांचा (शेंगादाणे, तिळ आणि जवस) हिस्सा केवळ २.२९ टक्के होता.

कोष्टक – १४


: करमाळा बाजार आवारात येणा-या तेलबियांचे वर्गीकरण :

(क्विंटलमध्ये)

| वर्ष | तेलबियांची एकुण आवक | करडीची आवक | शेंगाची आवक | शेंगदाण्याची आवक | तिळाची आवक | जवसाची आवक | सूर्यफुलाची आवक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १९७४–७५ | ६३,६६७ (१००) | ३७,५५९ (५८.९९) | २४,६५० (३८.७२) | ८२२ (१.२९) | ९२ (०.१४) | ५४४ (०.८६) | – |
| १९७५–७६ | ५६,९४३ (१००) | १३,५६३ (२३.८२) | ४२,३३७ (७४.३५) | १० (०.०२) | २०० (०.३५) | ८३३ (१.४६) | – |
| १९७६–७७ | ६०,९०७ (१००) | १८,४१० (३०.२३) | ४१,९९१ (६८.९४) | ८ (०.०१) | २३८ (०.३९) | २६० (०.४३) | – |
| १९७७–७८ | ८३,१४१ (१००) | ७,८३६ (९.४२) | ७४,४१८ (८९.५१) | ५३० (०.६४) | १३० (०.१६) | २२७ (०.२७) | – |
| १९७८–७९ | ७८,८९४ (१००) | १९,५८९ (२४.८३) | ५८,८७३ (७४.६२) | – | ८३ (०.११) | ३४९ (०.४४) | – |
| १९७९–८०) | ७२,३८५ (१००) | ९,१६७ (१२.६६) | ६२,२२३ (८५.९६) | ६३० (०.८७) | १५ (०.०२) | ३५० (०.४९) | – |
| १९८०–८१ | ६८,७४७ (१००) | १७,२७६ (२५.१३) | ५१,१५९ (७४.४२) | – | ४७ (०.०७) | २६५ (०.३८) | – |
| १९८१–८२ | ५२,२२१ (१००) | १७,३०६ (३३.१४) | ३४,२४० (६५.५७) | ४१६ (०.८०) | ३६ (०.०७) | २२३ (०.४२) | – |
| १९८२–८३ | ३५,६०४ (१००) | ११,५७६ (३२.५१) | २२,९०२ (६४.३२) | १,००० (२.८१) | २३ (०.०७) | १०३ (०.२९) | – |
| १९८३–८४ | ९२,७८८ (१००) | २२,७८२ (२४.५५) | ६९,५२० (७४.९२) | १२० (०.१३) | ९५ (०.११) | २७१ (०.२९) | – |
| १९८४–८५ | ९५,१३७ (१००) | ११,०९९ (११.६८) | ७३,९३५ (७७.७१) | १,८३० (१.९२) | १५ (०.०१) | १९ (०.०२) | ८,२३९ (८.६६) |
| १९८५–८६ | ८१,९२२ (१००) | १७,३८२ (२१.२२) | ५५,५३० (६७.७९) | ८५ (०.१०) | २७ (०.०३) | २७ (०.०३) | ८,८७१ (१०.८३) |
| १९८६–८७ | ७५,१५० (१००) | ९,५६५ (१२.७३) | ५९,१०१ (७८.६४) | ६९ (०.०९) | – | ०९ (०.०१) | ६,४०६ (८.५३) |
| १९८७–८८ | १०१,२८९ (१००) | ७,९३३ (७.८३) | ६६,४३१ (६५.५९) | १,३९५ (१.३८) | २१ (०.०२) | १५ (०.०१) | २५,४९४ (२५.१७) |

टिप : कंसातील आकडे विशिष्ट तेलबियांचे एकुण तेलबियांच्या आवकेशी असणारे शेकडा प्रमाण दर्शवितात.

आधार: करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४–७५ ते १९८७–८८.



करमाळा बाजार आवारात येणाऱ्या तेलबियांचे
वर्गीकरण
-: सुचि :-
एकूण तेलबियांची आवक.
शेंगांची आवक.
करडीची आवक.
सुर्यफुलाची आवक.
इतर तेलबियांची आवक.
[शेंगदाणे, जवस आणि तिळ]
तेलबियांची आवक (000) क्विंटल मध्ये.
वर्षे
६३,६६७
७२,३८५
६२,२२३
६५,९३७
७३,९३५
१,०१,२८९
६६४३१
२५,४९४
२०००

परंतु १९७५-७६ पासून १९८७-८८ पर्यंत एकूण तेलबियांत करडीच्या आवकेचे प्रमाण कमी तर शेंगाच्या आवकेचे प्रमाण अधिक झाल्याचे आढळते. १९८७-८८ या वर्षी तर शेंगाच्या आवकेचे एकूण तेलबियांशी असणारे प्रमाण ६० टक्क्यापेक्षा अधिक आहे. म्हणजेच अभ्यासाच्या कालावधीत करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीत शेंगा प्रमुख तेल बी म्हणून आपले स्थान टिकवून आहेत.

१९८४-८५ मध्ये सूर्यफुल या तेलबियाला शेतकऱ्यांच्या मागणीनुसार नियंत्रित वस्तु म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे तेलबियात सूर्यफुलाचा समावेश झाला. या वर्षी तेलबियांची एकुण आवक ९५,१३७ क्विंटल होती. यात शेंगा, करडी सूर्यफुल व इतर (शेंगदाणे, तिळ व जवस) या तेलबियांची आवक अनुक्रमे ७३,९३५ क्विंटल, ११,०९९ क्विंटल, ८,८७१ क्विंटल आणि १,८६४ क्विंटल होती. या तेलबियांचे एकूण तेलबियांच्या आवकेशी असलेले प्रमाण अनुक्रमे ७७.७१ टक्के, ११.६८ टक्के, ८.६६ टक्के आणि १.९५ टक्के होते.

परंतु सूर्यफुलाची आवक होऊ लागल्यानंतर केवळ तीनच वर्षात करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीत तेलबियांच्या आवकेत पहिला क्रमांक शेंगा (एकूण तेलबियांच्या आवकेशी ६५.५९ टक्के प्रमाण), दुसरा क्रमांक सूर्यफुल (एकूण तेलबियांच्या आवकेशी २५.९७ टक्के प्रमाण) तर तिसरा क्रमांक करडीचा (एकूण तेलबियांच्या आवकेशी ७.८३ टक्के प्रमाण) आहे.

करमाळा कृषी उत्पन्न बाजारपेठेत सूर्यफुलाची आवक अल्प काळात (१९८४-८५ ते १९८७-८८) जास्त प्रमाणात वाढली आहे. याची कारणे या प्रमाणे सांगता येतील.

१) या कालावधीत सूर्यफुलाची किंमत वाढत असल्यामुळे आवक वाढल्याचे दिसून येते. या कालावधीत सूर्यफुलाची किंमत ४४६ रुपये क्विंटल पासून ६८४ रुपये क्विंटल पर्यंत वाढली आहे.

२) सूर्यफुलाचे पिक रब्बी आणि खरीप दोन्ही हंगामात येत असल्यामुळे सूर्यफुल नियंत्रित वस्तु झाल्याबरोबर सूर्यफुलाची लागवड वाढल्याचे दिसते.

३) १९८४-८५ ते १९८७-८८ या कालावधीत सूर्यफुलाच्या लागवडी खालील क्षेत्र ५९५ हेक्टर पासून २,२५४ हेक्टर पर्यंत वाढले आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत करडीची आवक २९,६२६ क्विंटलने निव्वळ घटली आहे. ही घट ७८.८८ टक्क्यानी झाली आहे. ज्या प्रमाणे करडीची आवक घटली त्याच प्रमाणें एकूण तेलबियांच्या आवकेशी करडीच्या आवकेचे असलेले प्रमाण या कालावधीत ५१.१६ टक्क्यांनी निव्वळ घटले आहे.

शेंगाची आवक १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत ४१,७८१ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. ही वाढ १६९.५० टक्के आहे. प्रत्येक वर्षी सरासरी १३.०३ टक्के दराने शेंगाची आवक वाढली आहे. ज्या प्रमाणे शेंगाची आवक वाढली त्याच प्रमाणे एकूण तेलबियांच्या आवकेशी शेंगाच्या आवकेचे प्रमाण २६.८७ टक्क्यानी निव्वळ वाढले आहे. या प्रमाणातील वाढ प्रति वर्षी सरासरी २.०६ टक्के दराने झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत इतर तेलबियांची (शेंगदाणे, तिळ व जवस) आवक २७ क्विंटलने निव्वळ घटली आहे. ही घट १.८५ टक्के आहे. आवके प्रमाणेच तेलबियांच्या आवकेशी इतर तेलबियांच्या आवकेचे असलेले प्रमाण ०.८८ टक्क्यानी निव्वळ घटलेले आहे.

सूर्यफुलाची आवक १९८४-८५ ते १९८७-८८ या कालावधीत १७,२५५ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. ही वाढ २०९.४३ टक्के आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ६९.८७ टक्के दराने सूर्यफुलाची आवक वाढली आहे. सूर्यफुलाच्या आवकेप्रमाणेच सूर्यफुलाच्या आवकेचे एकूण तेलबियांच्या आवकेशी असलेले प्रमाण याच कालावधीत १६.५१ टक्क्यांनी निव्वळ वाढले आहे. या प्रमाणातील निव्वळ वाढ प्रत्येक वर्षी सरासरी ५.५ टक्के दराने झाली आहे.

१९८७-८८ मध्ये करमाळा कृषी उत्पन्न बाजारात शेंगा व सूर्यफुल या दोनच तेलबियांचा तेलबियांच्या एकंदर आवकेत महत्त्वपूर्ण वाटा आहे असे म्हणता येईल.

ड) <u>वेगवेगळया तेलबियांच्या विक्रीपासून मिळणारे पैशातील उत्पन्न</u>:

ज्याप्रमाणे तेलबियांच्या आवकेचे वर्गीकरण केले त्याचप्रमाणे प्रत्येक तेलबियांच्या विक्रीपासून शेतक-यांना मिळणारे पैशातील उत्पन्न किती. त्या उत्पन्नाचा एकूण तेलबियांच्या पैशातील उत्पन्नात असणारा वाटा या वाटयात झालेला बदल यांची माहिती घेणे आवश्यक आहे. ही माहिती कोष्टक १५ मध्ये दर्शविली आहे.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात १९७४-७५ मध्ये सर्व तेलबियांची विक्री करून शेतक-यांना १,१७,६८,७०० रूपये उत्पन्न प्राप्त झाले होते. या उत्पन्नात सर्वात जास्त हिस्सा करडीचा होता. तो ६४,६२,२०० रूपयांचा होता. हा हिस्सा ५४.९९ टक्के होता. त्या खालोखाल शेंगाची विक्रीकरून शेतक-यांना उत्पन्न प्राप्त होत होते. याच वर्षी शेतक-यांना शेंगाची विक्री करून ४८,६९,९०० रूपयाचे उत्पन्न प्राप्त झाले होते एकूण तेलबियांच्या उत्पन्नापासून मिळणा-या उत्पन्नापैकी शेंगाच्या उत्पन्नापासून मिळणारा हिस्सा ४१.३८ टक्के होता. इतर तेलबियांच्या (शेंगदाणे, तिळ व जवस) विक्रीपासून शेतक-यांना ४,३६,६०० रूपये उत्पन्न प्राप्त झाले होते. हे उत्पन्न एकूण तेलबियांच्या उत्पन्नाच्या ३.७१ टक्के होते.

करमाळा बाजार आवारात येणा-या तेलबियांच्या आवकेत झालेल्या बदलांचा परिणाम त्यांच्यापासून मिळणा-या उत्पन्नावरही झालेला दिसतो. १९८७-८८ मध्ये करडी पासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण केवळ ६.६७ टक्के झाल्याचे दिसते. यामुळे तेलबियापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात प्रथम क्रमांक शेंगाचा, दुसरा क्रमांक सूर्य फुलाचा व तिसरा क्रमांक करडीचा लागतो. या तेलबियांच्यापासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण तेलबियांच्या पासून मिळणा-या उत्पन्नाशी याच वर्षी असलेले प्रमाण अनुक्रमे ६४.३८ टक्के, २८.६९ टक्के, ६.६७ टक्के आहे या शिवाय इतर तेलबियांच्या (शेंगदाणे, तिळ व जवस) विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण तेलबियांच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नाशी

## कोष्टक – १५

### वेगवेगळया तेलबियांच्या विक्रीपासून मिळणारे पैशातील उत्पन्न

(रुपये)

| वर्ष | सर्व तेलबियांची पैशातील किंमत | करडीची पैशातील किंमत | भुईमुगाची पैशातील किंमत | भुईमुगदाण्याची पैशातील किंमत | तिळाची पैशातील किंमत | जवसाची पैशातील किंमत | सूर्यफुलाची पैशातील किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १९७४–७५ | १,१७,६८,७०० | ६४,६२,२०० | ४८,६९,९०० | २,७६,९०० | ३८,१०० | १,२१,६०० | – |
| | (१००) | (५४.९१) | (४१.३८) | (२.३५) | (०.३२) | (१.०४) | – |
| १९७५–७६ | १,०२,६८,४८२ | १७,९१,९५० | ८२,६०,५७० | २४,७६२ | ४८,०३० | १,४३,१७० | – |
| | (१००) | (१७.४५) | (८०.४५) | (०.२४) | (०.४७) | (१.३९) | – |
| १९७६–७७ | १,४७,९३,११० | ४०,७४,५१० | १,०५,७०,१०० | – | ८२,१०० | ६७,१२० | – |
| | (१००) | (२५.५५) | (७१.४५) | – | (०.५५) | (०.४५) | – |
| १९७७–७८ | १,६२,३४,९४० | १४,९६,११० | १,४४,०६,१३० | २,४७,३५० | ३६,२०० | ४१,१५० | – |
| | (१००) | (९.२२) | (८८.७४) | (१.५२) | (०.२२) | (०.३०) | – |
| १९७८–७९ | २,०३,८१,७९० | ३९,१८,१३० | १,६१,१३,०५० | २,५६,११० | २२,८०० | ७०,९०० | – |
| | (१००) | (१९.२२) | (७९.०६) | (१.२६) | (०.११) | (०.३५) | – |
| १९७९–८० | २,०३,३६,६२० | २४,७६,१५० | १,७४,८५,२६० | २,५०,९५० | ४,८०० | १,१९,४६० | – |
| | (१००) | (१२.१८) | (८५.९८) | (१.२३) | (०.०२) | (०.५९) | – |
| १९८०–८१ | २,३६,२३,००० | ५९,३९,५७० | १,७५,७०,६९० | – | ४,८९० | १,०७,८५० | – |
| | (१००) | (२५.२४) | (७४.३८) | – | (०.०२) | (०.४६) | – |

पुढे चालू

कोष्टक –१५

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८१–८२ | १,८२,८६,३२८ | ५८,७७,१४० | १,२२,५४,७९८ | २९,१४० | ४०,६६० | ८४,५१० | – |
| | (१००) | (३२.१४) | (६७.०२) | ( ०.१६) | ( ०.२२) | ( ०.४६) | – |
| १९८२–८३ | १,४६,४१,८१० | ३९,६२,३१० | १,०४,६०,७५० | १,८१,०५० | १,११० | ३५,७१० | – |
| | (१००) | (२७.०५) | (७१.४०) | ( १.२४) | ( ०.०७) | ( ०.२४) | – |
| १९८३–८४ | ३,१७,३७,४१५ | ८४,८१,७८५ | ३,१०,७०,२१० | १,५४० | ५१,१३० | १,२४,०३० | – |
| | (१००) | (२१.३४) | (७८.११) | ( ०.०२) | ( ०.१३) | ( ०.३२) | – |
| १९८४–८५ | ३,८७,६६,१४० | ३९,३३,६७० | ३,१०,०२,१३० | १,४६,२३० | ५,५५० | ६,७०० | ३६,७१,८६० |
| | (१००) | (१०.१५) | (७९.९७) | ( ०.३८) | ( ०.०१) | ( ०.०२) | ( ९.४७) |
| १९८५.८६ | ३,९३,५८,३६४ | ६,२५,३५१ | ३,४२,१६,५५० | ८५,४६० | १४,०४० | १५,५१० | ४३,२१,३६५ |
| | (१००) | ( १.५१) | (८७.१४) | ( ०.२२) | ( ०.०३) | ( ०.०४) | (१०.९८) |
| १९८६–८७ | ४,१५,७८,६२५ | ४१,५३,७१५ | ४,०२,५६,४०० | ६१,१०० | – | २,२१० | ४२,१७,२०० |
| | (१००) | ( १.११) | (८१.११) | ( ०.१४) | – | ( ०.०१) | ( ८.६७) |
| १९८७–८८ | ६,०८,२५,६६६ | ४०,५५,७८० | ३,११,५१,७४६ | १,३१,१७५ | १२,७१० | ८,७३० | १७४,४१,३८५ |
| | (१००) | ( ६.६७) | (६४.३८) | ( ०.२३) | ( ०.०२) | ( ०.०१) | (२८.६१) |

टिप : कंसातील आंकडे विशिष्ट तेलबियांच्यापासून मिळणा–या उत्पन्नाचे एकूण तेलबियांच्या उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.

आधार: करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४–७५ ते १९८७–८८.

असलेले प्रमाण याच वर्षी ०.२६ टक्के होते.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत तेलबियांच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न १,१७,६८,७०० रुपयांपासून ६,०८,२५,६०६ रुपयां पर्यंत वाढले या कालावधीत तेलबियांपासून मिळणा-या उत्पन्नात ४,९०,५६,९०६ रुपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ४१६.८४ टक्के झाली आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ३२.०६ टक्के दराने तेलबियांच्या पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झाली आहे.

तेलबियांच्या विक्रीपासून मिळणा-या एकंदर उत्पन्नात वाढ झाली असली तरी सर्वच तेलबियांच्या पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झालेली नाही. कांही तेलबियांपासून मिळणा-या उत्पन्नात घट झालेली आहे.

उत्पन्नात घट झालेल्या तेलबियांत करडी आणि इतर तेलबियां (शेंगदाणे, जवस व तीळ) यांचा समावेश होतो.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत करडी आणि इतर तेलबियां (शेंगदाणे जवस आणि तीळ) यांच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नात अनुक्रमे २४,०६,४२० रुपयांनी आणि २,७५,९०५ रुपयांनी निव्वळ घट झाली आहे. ही घट प्रत्येक वर्षी सरासरी ३.७१ टक्के आणि ०.२६ टक्के दराने झालेली आहे.

करडीपासून मिळणा-या उत्पन्नात घट झालेली असली तरी या घटीत अस्थिरता दिसून येते. यात प्रामुख्याने १९८३-८४ या वर्षी १९७४-७५ पेक्षा जास्त उत्पन्न करडीच्या विक्रीपासून प्राप्त झाले होते. हे उत्पन्न ८४,८१,७८५ रुपयांचे होते. तर १९८७-८८ या वर्षापेक्षा काही वर्ष कमी उत्पन्न प्राप्त झालेले आहे. यात प्रामुख्याने १९७५-७६, १९७७-७८, १९७८-७९, १९७९-८०, १९८२-८३ आणि १९८४-८५ या वर्षांचा समावेश करता येईल. यावर्षीचे करडीच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न अनुक्रमे १७,९१,९५० रु., १४,९६,११० रुपये, ३९१८,१३० रुपये, २४,७६,१५० रुपये, ३९,६२,३१० रुपये आणि ३९,३३,६७० रुपये होते. विश्लेषण काळात करडीच्या विक्रीपासून सर्वात कमी उत्पन्न १९७७-७८ या वर्षी प्राप्त झालेले असून ते १४,९६,११० रुपये होते.

तेलबियांच्या पासून मिळणा-या उत्पन्नाच्या वाढीबरोबर शेंगापासून व सूर्यफुला पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत शेंगाच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नात ३,४२,८९,८४६ रूपयांनी निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ७०४.१२ टक्क्यानी झालेली आहे. या वाढीत सातत्य नसून १९८१-८२ आणि १९८२-८३ ही वर्षे मागील वर्षाच्या तुलनेने अपवाद आहेत. या वर्षी मागील वर्षाच्या तुलनेने उत्पन्नात घट झाली असून या वर्षीची अनुक्रमे निव्वळ घट ५३,१५,८९२ आणि १७,९४,०४८ रूपयांची आहे. याशिवाय इतर वर्षी मात्र शेंगाच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत शेंगाच्या उत्पन्नाचे एकूण तेलबियांच्या उत्पन्नाशी असलेल्या प्रमाणात २३ टक्कयांनी निव्वळ वाढ झाली आहे.

१९८४-८५ ते १९८७-८८ या कालावधीत सूर्यफुलाच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नात १,३७,७७,५२५ रूपयांनी निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ३७५.३० टक्के झाली आहे. या वाढीत १९८६-८७ हे वर्ष अपवाद वगळता सातत्य दिसून येते. याच कालावधीत सूर्यफुलाच्या विक्रीपासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण तेलबियांच्या विक्रीपासून मिळणा-या प्रमाणात १९.२२ टक्कयांनी निव्वळ वाढ झाली आहे. या वाढीत सुध्दा १९८६-८७ हे वर्ष अपवाद वगळतासातत्य दिसून येते.

...

प्रकरण ४ थे

## भाग ४ था

## करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची वित्तीय स्थिती

अ) प्रस्तावना:

कोणत्याही यंत्रणेला आपली यंत्रणा राबविण्यासाठी उत्पन्न प्राप्त करावे लागते आणि ते उत्पन्न खर्च करावे लागते. त्याचप्रमाणें कृषी उत्पन्न बाजार समितीला विपणनासाठी आवश्यक असणा-या सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणा राबवावी लागते. पर्यायाने ही यंत्रणा राबविण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीला उत्पन्न मिळवावे लागते आणि ते खर्च करावे लागते. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती याला अपवाद नाही. बाजार समितीने कोणत्या मार्गांनी उत्पन्न मिळवावे हे विपणनाच्या कायद्यानुसार निश्चित केलेले आहे.

ब) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नाचे मार्ग:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीला बाजार क्षेत्रात सेवा पुरविल्या बद्दल उत्पन्न प्राप्त होते किंवा कार्यालयीन खर्च भागविण्यासाठी काही उत्पन्न प्राप्त करावे लागते. या उत्पन्नाचे मार्ग खालील प्रमाणें -

१) बाजार शुल्क:

बाजार समितीला प्राप्त झालेल्या उत्पन्नाच्या मार्गांपैकी सर्वात महत्वाचा मार्ग म्हणजे बाजार शुल्क होय. बाजार समितीच्या आवारात होणा-या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर बाजार शुल्क आकारले जाते. बाजार शुल्क शेतमालाची खरेदी करणा-या व्यक्तीकडून वसूल केले जाते.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उप-नियम क्रमांक १२ नुसार बाजारक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीच्या उत्पन्नावर बाजार समितीला खालील दराने

बाजार शुल्क आकारण्याचा व वसुल करण्याचा अधिकार आहे.

| शुल्कचा प्रकार | आकारली जाणारी शुल्क |
| --- | --- |
| १) बाजार शुल्क (सर्व नियंत्रीत शेतमालासाठी) | १०० रुपये किंमतीच्या शेतमालाच्या विक्रीस ८० पैसे शेतमाल खरेदीदाराकडून. |
| २) बाजार शुल्क (जनावरासाठी) | प्रत्येक नगाच्या किंमतीच्या शेकडा ८० पैसे खरेदी करणाराकडून. |
| ३) प्रतवारी शुल्क (शेंगा, ज्वारी, करडी, तूर बाजरी, गहू, गुळ, मिरची यासाठी) | १०० रुपयाच्या माल विक्रीवर ५ पैसे शेतमाल विक्रेत्याकडून. |

करमाळा बाजार समितीला बाजार शुल्कपासून मिळणारे उत्पन्न आणि या उत्पन्नाचे एकुण उत्पन्नासी असलेले प्रमाण कोष्टक १७ मध्ये दर्शविले आहे.

१९७४-७५ मध्ये बाजार शुल्कपासून मिळणारे उत्पन्न८०,०६८ रुपये होते ते १९८७-८८ या वर्षी ९,६१,२८४ रुपयापर्यंत वाढले. बाजार शुल्कच्या उत्पन्नात या कालावधीत ८,८१,२१६ रुपयांनी निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ११००.५८ टक्के झाली आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ८४.६६ टक्के दराने बाजार शुल्क पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावर्धीत बाजार शुल्कपासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ७०.७० टक्के पासून ८३.८५ टक्के पर्यंत वाढले आहे. या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ १३.०८ टक्के आहे. विश्लेषण काळात १९८०-८१ आणि १९८२-८३ ही वर्षे सोडून इतर सर्व वर्षी बाजार शुल्कपासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ७० टक्क्यापेक्षा जास्त आहे. सर्वात जास्त प्रमाण १९८७-८८ मध्ये असून ते ८३.८५ टक्के आहे. सर्वात कमी प्रमाण १९८०-८१ मध्ये असून ते ४०.९० टक्के आहे.

१९८०-८१ या वर्षी हे प्रमाण कमी असण्याचे कारण १९८०-८१ मध्ये केंद्रसरकारने करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीला ४ लाख रूपयाचे अनुदान दिले होते. या अनुदानामुळे बाजार समितीचे इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न ४ लाख रूपयानी वाढले. याचा परिणाम म्हणून एकूण उत्पन्नात इतर बाबीपासून मिळणा-या उत्पन्नाचा हिस्सा वाढला तो या वर्षी ५६.४९ टक्के झाला आणि बाजार शुल्क पासून मिळणा-या उत्पन्नाचा हिस्सा कमी झाला.

यावरून हे स्पष्ट होते की विश्लेषण काळात करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राप्त होणा-या उत्पन्नापैकी ७० टक्क्यापेक्षा जास्त उत्पन्न बाजार शुल्क या मार्गाने प्राप्त होते. म्हणजे बाजार शुल्क हा करमाळा बाजार समितीच्या उत्पन्नाचा महत्वाचा मार्ग आहे.

२) <u>अनुज्ञप्ति शुल्क किंवा परवाना शुल्क</u>:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उप-नियम क्रमांक ४(१) नुसार मुख्य किंवा दुय्यम बाजार किंवा बाजार क्षेत्रात अन्य ठिकाणी शेती उत्पन्नाची खरेदी-विक्री व इतर अन्य संबंधित व्यवहार करू इच्छिणा-या व्यक्तींना महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) १९६७ च्या कायधातील नियम क्रमांक ६ व ७ यास पात्र राहून खालील नमुद केलेल्या दराने बाजाराच्या प्रत्येक वर्षाकरीता अनुज्ञप्ति शुल्कची संपुर्ण रक्कम अर्जासोबत बाजार समितीकडे भरून परवाना घ्यावा लागतो. अनुज्ञप्ति शुल्कच्या दरासंबंधी उप-नियम क्रमांक ४(२) मध्ये तरतुद केली आहे. ती कोष्टक १६ मध्ये दर्शविली आहे.

अनुज्ञप्ति शुल्कपासून करमाळा बाजार समितीला मिळणारे उत्पन्न कोष्टक १७ मध्ये दर्शविले आहे.

१९७४-७५ मध्ये करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीला अनुज्ञप्ति शुल्कपासून १८,५४८ रूपये उत्पन्न प्राप्त होत होते. यात वाढ होऊन

१९८७-८८ या वर्षी ते ३०,१४१ रुपयांचे झाले. या कालावधीत या उत्पन्नात ११,५९३ रुपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ती वाढ ६२.५० टक्के आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ४.८० टक्के दराने या उत्पन्नात निव्वळ वाढ झाली आहे.

कोष्टक १६

अनुज्ञप्ति शुल्काचे दर

(रुपये)

| अ. नं. | अनुज्ञप्तिचे वर्गीकरण | अनुज्ञप्ति शुल्काचा वार्षिक दर | अनुज्ञप्ति नुतनीकरण शुल्काचा वार्षिक दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | आडत्या | १०० | ९० |
| २) | व्यापारी नं. १ (जनावरे सोडून) | १०० | १०० |
| ३) | व्यापारी नं. २ | ५० | ५० |
| ४) | व्यापारी नं. ३ | २० | २० |
| ५) | व्यापारी नं. ४ | १० | १० |
| ६) | व्यापारी नं. ४ (जनावरासाठी) | १० | १० |
| ७) | व्यापारी नं. ४ (कडब्यासाठी) | १० | १० |
| ८) | आडत्या (कडब्यासाठी) | २० | २० |
| ९) | दलाल (जनावरासाठी) | २० | २० |
| १०) | प्रक्रियाकरणार नं. १ | १०० | १०० |
| ११) | प्रक्रिया करणार नं. २ | ५० | ५० |
| १२) | तोलार | १० | १० |
| १३) | वखारवाला | १५ | १५ |
| १४) | गाडीवान आणि वटवण अभिकर्ता | १५ | १५ |
| १५) | मदतनिस (आडत्या, व्यापारी गाडीवान यांचा) | ०५ | ०५ |
| १६) | हमाल | ०३ | ०३ |
| १७) | इतर | ०५ | ०५ |

संदर्भ :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उप नियम क्रमांक ४ (२) नुसार.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विश्लेषण काळात अनुज्ञप्ति शुल्कपासून मिळणारे उत्पन्न वाढत असले तरी एकूण उत्पन्नाशी अनुज्ञाप्ति शुल्क पासून मिळणा-या उत्पन्नाचे असलेले प्रमाण कमी होत गेले आहे. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत या प्रमाणात १६.३९ टक्के पासून २.६३ टक्के पर्यंत घट झाली आहे. या प्रमाणातील निव्वळ घट १३.७६ टक्के आहे. ही घट प्रत्येक वर्षी सरासरी १.०५ टक्के दराने झाली आहे.

यावरून हे स्पष्ट होते की विश्लेषण काळात करमाळा बाजार समितीला अनुज्ञप्ति शुल्कपासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झाली आहे। परंतू एकूण उत्पन्नाशी अनुज्ञप्ति शुल्क पासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण घटले आहे।

३) इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न :

बाजार समितीला बाजार शुल्क आणि अनुज्ञप्ति शुल्क या शिवाय ज्या मार्गांनी उत्पन्न प्राप्त होते त्यांचा समावेश इतर मार्गांनी मिळणा-या उत्पन्नात केला आहे. या बाबीपासून मिळणारे उत्पन्न कोष्टक १७ मध्ये दर्शविले आहे.

१९७४-७५ मध्ये बाजार समितीला मिळणारे उत्पन्न १४,५२७ रूपयांचे होते. एकूण उत्पन्नाशी या उत्पन्नाचा हिस्सा या वर्षी १२.८४ टक्के होता. १९८७-८८ मध्ये बाजार समितीला इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न १,५५,०६६ रूपये होते. एकूण उत्पन्नाशी या उत्पन्नाचा हिस्सा १३.५२ टक्के होता. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत इतर मार्गांनी मिळणा-या उत्पन्नात १,४०,५३९ रूपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ९६७.४३ टक्के आहे। प्रत्येक वर्षी सरासरी ७४.४२ टक्के दराने या उत्पन्नात वाढ झाली आहे.

विश्लेषण काळात इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न सर्वात जास्त १९८०-८१ या वर्षी असून ते ४,९१,००२ रूपये होते. या वर्षी एकूण उत्पन्नाशी या उत्पन्नाचे असलेले प्रमाण ५६.४९ टक्के होते. यावर्षी हे उत्पन्न सर्वात

कोष्टक : १७

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न


(रुपये

| वर्ष | बाजार शुल्क पासून मिळणारे उत्पन्न | अनुज्ञाप्ति शुल्क पासून मिळणारे उत्पन्न | इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १९७४-७५ | ८०,०६८ | १८,५४८ | १४,५२७ | १,१३,१४३ |
| | (७०.७७) | (१६.३९) | (१२.८४) | (१००) |
| १९७५-७६ | १,०१,२२५ | १७,०१४ | २२,८८३ | १,४१,१२२ |
| | (७१.७३) | (१२.०६) | (१६.२१) | (१००) |
| १९७६-७७ | १,४७,३४१ | १६,८८६ | २८,५६८ | १,९२,७९५ |
| | (७६.४२) | (८.७६) | (१४.८२) | (१००) |
| १९७७-७८ | १,९१,२११ | १७,८०८ | ३६,९१० | २,४५,८३९ |
| | (७७.७४) | (७.२४) | (१५.०२) | (१००) |
| १९७८-७९ | २,२८,६६९ | २०,८३३ | ५१,९३७ | ३,०१,४३९ |
| | (७५.८६) | (६.९१) | (१७.२३) | (१००) |
| १९७९-८० | २,३१,५३७ | १९,८८० | ६२,९९६ | ३,१४,४१३ |
| | (७३.६४) | (६.३२) | (२०.०४) | (१००) |
| १९८०-८१ | ३,५५,४९२ | २२,६५३ | ४,९१,००२ | ८,६९,१४७ |
| | (४०.१०) | (२.६१) | (५६.४९) | (१००) |
| १९८१-८२ | २,९२,९३९ | २१,१८५ | १,०१,२७१ | ४,१५,३९५ |
| | (७०.५२) | (५.१०) | (२४.३८) | (१००) |
| १९८२-८३ | २,०१,२२६ | १९,८४२ | १,१६,७४३ | ३,४५,८११ |
| | (६०.५०) | (५.७४) | (३३.७६) | (१००) |
| १९८३-८४ | ४,७०,४७४ | २३,७८२ | ९८,६७७ | ५,९२,९३३ |
| | (७९.३५) | (४.०१) | (१६.६४) | (१००) |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १९८४-८५ | ४,८२,७९६<br>(७८.९३) | २९,१२८<br>(४.७६) | ९९,७७६<br>(१६.३१) | ६,११,७००<br>(१००) |
| १९८५-८६ | ५,३८,२१४<br>(७३.९७) | २५,९२४<br>(३.५६) | १,६३,४५५<br>(२२.४७) | ७,२७,५९३<br>(१००) |
| १९८६-८७ | ५,८२,९६२<br>(७४.९८) | २७,७७७<br>(३.५७) | १,६६,७३६<br>(२१.४५) | ७,७७,४७५<br>(१००) |
| १९८७-८८ | ९,६१,२८४<br>(८३.८५) | ३०,१४१<br>(२.६३) | १,५५,०६६<br>(१३.५२) | ११,४६,४९१<br>(१००) |

टिप : कंसातील आकडे त्या विशिष्ट मार्गापासून मिळणा-या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८


करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न
प्रमाण
'अय' अक्ष १ सेमी = १ लाख
'अक्ष' अक्ष १ सेमी = १ वर्ष
य
उत्पन्न [लाख रुपये]
१५
१४
१३
१२
११
१०
९
८
७
६
५
४
३
२
१
उत्पन्न वक्र
प्रवृत्ती रेषा
४.८६ + ०.६४
अ
क्ष
१९७४-७५
१९७५-७६
१९७६-७७
१९७७-७८
१९७८-७९
१९७९-८०
१९८०-८१
१९८१-८२
१९८२-८३
१९८३-८४
१९८४-८५
१९८५-८६
१९८६-८७
१९८७-८८
कालखंड

जास्त असण्याचे कारण केंद्रसरकारने करमाळा बाजार समितीला ४ लाख रूपयांचे अनुदान दिले होते.

४) एकूण उत्पन्न :

बाजार शुल्क, अनुज्ञाप्ति शुल्क आणि इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न यांचा समावेश बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात केला जातो. करमाळा बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील बदल कोष्टक १७ मध्ये दर्शविला आहे.

१९७४-७५ मध्ये बाजार समितीचे एकूण उत्पन्न १,१३,१४३ रूपये होते. ते १९८७-८८ मध्ये ११,४६,४९१ रूपयां पर्यंत वाढले या कालावधीत बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात १०,३३,३४८ रूपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ९१३.३१ टक्कयांनी झाली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ७०.२५ टक्के दराने एकूण उत्पन्नात वाढ झाली आहे. या उत्पन्नाच्या वाढीत १९८०-८१ आणि १९८२-८३ ही दोन वर्षे अपवाद आहेत. १९८०-८१ मध्ये हे उत्पन्न ८,६९,१४७ रूपयांचे होते हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेने एकदम वाढले कारण केंद्रसरकारचे ४ लाख रूपयांचे अनुदान हे होय १९८२-८३ या वर्षी मागील वर्षाच्या तुलनेने शेतमालाची आवक कमी झाल्यामुळे पर्यायाने शेतमालाचे पैशातील मुल्य घटले त्यामुळे बाजार समितीला मिळणारे उत्पन्न कमी झाले या वर्षी बाजार समितीचे एकूण उत्पन्न ३,४५,८९१ रूपये होते.

क) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा खर्च :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या खर्चाच्या प्रमुख बाबी खालील प्रमाणे.

१) कार्यालयीन खर्च :

बाजार समितीला व्यवस्थापन चालविण्यासाठी खर्च करावा लागतो.

यात प्रामुख्याने कर्मचारी वर्गाला देण्यात येणारे वेतन, महागाई भत्ता, इत्यादींचा समावेश केला जातो. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयीन खर्चाचे स्पष्टीकरण कोष्टक १८ मध्ये केले आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत बाजार समितीचा कार्यालयीन खर्च ४७,३४१ रुपयांपासून ३,४१,१४० रुपयांपर्यंत वाढला आहे. या कालावधीत या खर्चात झालेली निव्वळ वाढ २,९३,७९९ रुपयांची आहे. ही वाढ ६२०.६० टक्के झाली आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ४७.७३ टक्के दराने या खर्चात वाढ झाली आहे. याच कालावधीत कार्यालयीन खर्चाचे एकूण खर्चाशी असणारे प्रमाण ५८.८० टक्क्यावरून ५७.६६ टक्क्यापर्यंत घटले आहे. या कालावधीत या प्रमाणात १.१४ टक्केनी निव्वळ घट झाली आहे.

या वरून हे स्पष्ट होते की विश्लेषण काळात कार्यालयीन खर्चात वाढ झाली आहे. परंतू कार्यालयीन खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण या काला- वधीत घटले आहे.

२) इतर खर्च :

इतर खर्चात प्रामुख्याने सभासद व सदस्य खर्च, सभासदांना द्यावे लागणारे मानधन, प्रवास भत्ता, इत्यादींचा समावेश केला जातो. या शिवाय प्रशासकिय खर्च या खर्चात प्लॅन्स, दूरध्वनी, वर्तमान पत्र, नियत कालिके, पोशाख, छपाई लेखन सामुग्री ,डाक व तार, मुद्रांक भेटीव सभारंभ, किरकोळ यासाठी केलेला खर्च महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ वर्गणी, करभरणा निवडणूक खर्च विद्युत बिल,जाहिरात, प्रचार प्रदर्शन खर्च,पाणी पट्टी इत्यादी खर्चाचा समावेश केला जातो. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने इतर बाबीवर केलेला खर्च आणि या खर्चात झालेला बदल कोष्टक १८ मध्ये दर्शविला आहे.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीकडून सभासदांना देण्यात येणारे मानधन व भत्ता या प्रमाणे -

सभापती ४०० रुपये महिना मानधन

उप सभापती २०० रुपये महिना मानधन

इतर सभासदांना सभा भत्त्याशिवाय कोणतेही मानधन दिले जात नाही.

सदस्यांना द्यावयाच्या भत्त्यासंबंधी :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उप-नियम क्रमांक ३७ (अ) (ब) आणि (क) नुसार बाजार समितीच्या सभांना हजर राहण्यासाठी किंवा कामकाजा संबंधात प्रवास करावा लागल्यास सदस्यास खालील दराने भत्ते दिले जातात.

१) प्रवास भत्ता :

| | |
|---|---|
| १:१ ) रेल्वे प्रवास | : पहिल्या वर्गाचे भाडे |
| १:२) एस् टी. ने प्रवास | : एस्. टी. चे दिडपट भाडे |
| १:३) स्वत:चे स्वयंचालीत दुचाकी वाहनाने प्रवास | : एस् टी. चे दिडपट भाडे |
| १:४) अन्य वाहनाने प्रवास | : रेल्वे असल्यास पहिल्या वर्गाचे दिडपट व रेल्वे नसल्यास एस्. टी. चे दुप्पट भाडे. |

( हा प्रवास खर्च राहत्या ठिकाणापासून बाजार समितीच्या सभेच्या ठिकाणापर्यंत देण्यात येतो. )

२) दैनिक भत्ता :

| | |
|---|---|
| २:१) बाजार क्षेत्रात प्रवास केल्यास | : २५ रुपये |
| २:२) बाजार क्षेत्राचे बाहेर महाराष्ट्र राज्यात कोठेही मात्र महानगर पालिकेच्या हद्दी खेरीज | : २५ रुपये |
| २:३) महाराष्ट्र राज्यातील महानगर पालीकांच्या हद्दीत व महाराष्ट्र राज्याबाहेर कोठेही | : ४० रुपये. |

३) <u>सभा उपस्थिती भत्ता</u> :

३:१) प्रत्येक सभेबद्दल : २५ रुपये

३:२) बाजार समितीच्या सभापतींना दरमहा कायम स्वरूपाचा सभा उपस्थिती भत्ता. : १२५ रुपये.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत बाजार समितीचा इतर बाबीवरील खर्च ३३,१६८ रुपयापासून २,५०,५२६ रुपयापर्यंत वाढलेला आहे. या कालावधीत या खर्चातील निव्वळ वाढ २,१७,३५८ रुपयांची आहे. या वाढीचे प्रमाण ६५५.३२ टक्के आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ५०.४० टक्के दराने इतर बाबीवरील खर्चात वाढ झाली आहे.

इतर बाबीवरील खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण विश्लेषण काळात ४१.२० टक्के पासून ४२.३४ टक्के पर्यंत वाढलें आहे. या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ अल्प असून ती १.१४ टक्के आहे.

इतर खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण सर्वात जास्त १९८६-८७ यावर्षी असून ते ४८.४९ टक्के होते. तर सर्वात कमी प्रमाण १९८१-८२ या वर्षी असून ते ३५.६९ टक्के होते.

३) <u>एकूण खर्च</u> :

कार्यालयीन खर्च आणि इतर खर्च यांचा समावेश एकूण खर्चात केला आहे. विश्लेषण काळात एकूण खर्चात झालेल्या बदलाचा तपशील कोष्टक १८ मध्ये दिलेला आहे.

कोष्टक १८

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा खर्च

(रुपये)

| वर्ष १ | कार्यालयीन खर्च २ | इतर खर्च ३ | एकूण खर्च ४ |
|---|---|---|---|
| १९७४-७५ | ४७,३४१ (५८.८०) | ३३,१६८ (४१.२०) | ८०,५०९ (१००) |
| १९७५-७६ | ५०,४०६ (५२.९३) | ४४,८३२ (४७.०७) | ९५,२३८ (१००) |
| १९७६-७७ | ६३,१९५ (५८.५०) | ४४,८२२ (४१.५०) | १,०८,०१७ (१००) |
| १९७७-७८ | ६५,४४१ (५३.८८) | ५६,०२४ (४६.१२) | १,२१,४६५ (१००) |
| १९७८-७९ | ८३,४९३ (६०.६०) | ५४,२८५ (३९.४०) | १,३७,७७८ (१००) |
| १९७९-८० | ९२,९६३ (५४.३८) | ७७,९९५ (४५.६२) | १,७०,९५८ (१००) |
| १९८०-८१ | ९४,१३१ (५९.०५) | ६५,२७५ (४०.९५) | १,५९,४०६ (१००) |
| १९८१-८२ | १,५६,३३९ (६४.३१) | ८६,७५४ (३५.६९) | २,४३,०९३ (१००) |
| १९८२-८३ | १,४०,८७२ (६३.८२) | ७९,८५५ (३६.१८) | २,२०,७२७ (१००) |
| १९८३-८४ | १,६२,४४३ (६४.२४) | ९०,४३० (३५.७६) | २,५२,८७३ (१००) |
| १९८४-८५ | २,१८,३६६ (५४.८०) | १,८०,०८५ (४५.२०) | ३,९८,४५१ (१००) |
| १९८५-८६ | २,५०,६२५ (५२.४१) | २,२७,५४९ (४७.५९) | ४,७८,१७४ (१००) |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९८६-८७ | ३,१३,०३२ (५१.५१) | २,७५,८६६ (४८.४९) | ५,६८,८९८ (१००) |
| १९८७-८८ | ३,४१,१४० (५७.६६) | २,५०,५२६ (४२.३४) | ५,९१,६६६ (१००) |

टिप : कंसातील आकडे त्या विशिष्ट खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.


संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षीक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत एकूण खर्च ८०,५०९ रुपयांपासून ५,९१,६६६ रुपयापर्यंत वाढला आहे. या कालावधीतील एकूण खर्चातील निव्वळ वाढ ५,११,१५७ रुपयांची असून ही वाढ ६३४.९१ टक्के झाली आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ४८.८४ टक्के दराने एकूण खर्चात वाढ झाली आहे.

१९८०-८१ आणि १९८२-८३ ही दोन वर्षे मागील वर्षाच्या तुलनेने अपवाद वगळता इतर सर्व वर्षी एकूण खर्चाच्या वाढीत सातत्य दिसून येते.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा उत्पन्नवखर्च लक्षात घेतल्यास या बाजारपेठेने अभ्यासाच्या कालावधीत अर्थक्षमतेची पातळी पार केली आहे असे म्हणता येईल. कारण १९६७ मध्ये महाराष्ट्रात लागु करण्यात आलेल्या कायद्यानुसार बाजार समितीच्या उत्पन्न खर्चाचा ताळमेळ बसाव्याचा असल्यास बाजारपेठेतील वार्षीक उलाढाल किमान १ कोटी रुपयांची हवी हा निकष लावल्यास करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमालाची उलाढाल समाधान कारक आहे. असे म्हणता येईल.

## करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा खर्च



ड) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा नफा:

या बाजार समितीचा विश्लेषण काळातील खर्च हा उत्पन्नापेक्षा कमी असल्यामुळे निव्वळ नफा प्राप्त झालेला आहे. या कालावधीत करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा निव्वळ नफा वाढत गेला आहे. या निव्वळ नफ्याचा तपशील कोष्टक १९ मध्ये दिला आहे.

कोष्टक -१९


करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा नफा (रूपये)

| वर्ष | एकूण उत्पन्न | नफा | एकूण उत्पन्नाशी नफ्याचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४-७५ | १,१३,१४३ | ३२,६३४ | २८.८४ |
| १९७५-७६ | १,४१,१२२ | ४५,८८३ | ३२.५१ |
| १९७६-७७ | १,९२,७९५ | ८४,७७८ | ४३.९७ |
| १९७७-७८ | २,४५,८३९ | १,२४,३७४ | ५०.५९ |
| १९७८-७९ | ३,०१,४३९ | १,६३,६६१ | ५४.२१ |
| १९७९-८० | ३,१४,४१३ | १,४३,४५५ | ४५.६३ |
| १९८०-८१ | ८,६९,१४७ | ७,०१,७४१ | ८१.६६ |
| १९८१-८२ | ४,१५,३९५ | १,७२,३०२ | ४१.४८ |
| १९८२-८३ | ३,४५,८११ | १,२५,०८४ | ३६.१७ |
| १९८३-८४ | ५,१२,९३३ | ३,४०,०६० | ५७.३५ |
| १९८४-८५ | ६,११,७०० | २,१३,२४१ | ३४.८६ |
| १९८५-८६ | ७,२७,५१३ | २,४९,४११ | ३४.२८ |
| १९८६-८७ | ७,७७,४७५ | २,०८,५७७ | २६.८३ |
| १९८७-८८ | ११,४६,४११ | ५,५४,८२५ | ४८.३९ |

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८.

विश्लेषण काळात एकूण उत्पन्नाच्या वाढी बरोबर निव्वळ नफ्यात सुध्दा वाढ झालेली आहे. १९७४-७५ मध्ये बाजार समितीला मिळणारा नफा ३२,६३४ रूपयांचा होता. तो १९८७-८८ या वर्षी ५,५४,८२५ रूपयांचा झाला.

# करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा नफा



या कालावधीत बाजार समितीच्या निव्वळ नफ्यात ५,२२,१९१ रुपयांनी निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ १६००.१४ टक्क्यांनी झाली आहे. या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी १२३.०८ टक्के दराने निव्वळ नफ्यात वाढ झाली आहे.

विश्लेषण काळात बाजार समितीला सर्वात जास्त नफा १९८०-८१ या वर्षी झाला असून तो ७,०९,७४१ रुपयांचा आहे. या वर्षी नफा वाढण्याचे कारण केंद्र सरकारने या वर्षी बाजार समितीला ४ लाख रुपयांचे अनुदान दिले होते. सर्वात कमी नफा १९७४-७५ या वर्षी झाला असून तो ३२,६३४ रुपयांचा आहे. विश्लेषण काळातील पहिले वर्ष असल्यामुळे हा नफा कमी वाटतो. कारण या नंतर प्रत्येक वर्षी नफ्यात वाढ झालेली आहे.

ज्याप्रमाणे बाजार समितीला मिळणा-या नफ्यात वाढ झाली त्याचप्रमाणे या नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण वाढले आहे. १९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत या प्रमाणात २८.८४ टक्क्यापासून ४८.३९ टक्क्यापर्यंत वाढ झाली आहे. या प्रमाणात विश्लेषण काळात झालेली निव्वळ वाढ १९.५५ टक्के आहे. प्रत्येक वर्षी सरासरी १.५० टक्के दराने या प्रमाणात वाढ झाली आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत नफ्यांचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण वाढले आहे. परंतु या वाढीत सातत्य दिसून येत नाही. १९७४-७५ ते १९७८-७९ पर्यंत २८.८४ टक्के पासून ५४.२९ टक्के पर्यंत हे प्रमाण वाढले. १९७४-७५ ते १९७८-७९ या कालावधीत या प्रमाणात झालेली निव्वळ वाढ २५.४५ टक्के आहे. या चार वर्षाच्या कालावधीत प्रत्येक वर्षी सरासरी ६.३६ टक्के दराने या प्रमाणात वाढ झाली आहे.

१९७९-८० या वर्षी नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ४५.६३ टक्के पर्यंत कमी आले. म्हणजे मागील वर्षाच्या(१९७८-७९) तुलनेने या प्रमाणात ८.६६ टक्के घट झाली आहे.

१९८०-८१ मध्ये नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण विश्लेषण काळात सर्वात जास्त असून ते ८१.६६ टक्के होते. या वर्षी या प्रमाणात मागील वर्षाच्या (१९७९-८०) तुलनेने ३६.०६ टक्के वाढ झाली आहे.

१९८१-८२ पासून १९८६-८७ या कालावधीत १९८३-८४ हे वर्ष अपवाद सोडता नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ४१.४८ टक्क्यापासून २६.८३ टक्क्यापर्यंत घटले. या कालावधीत या प्रमाणात झालेली निव्वळ घट १४.६५ टक्के आहे. १९८३-८४ या वर्षी हे प्रमाण ५७.३५ टक्के होते.

१९८७-८८ या वर्षी नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण ४८.३९ टक्के होते. १९८६-८७ या वर्षाशी तुलना करता या प्रमाणात २१.५६ टक्के निव्वळ वाढ झाली आहे.

यावरून हे स्पष्ट होते की विश्लेषण काळात नफा वाढत गेला. त्याच बरोबरनफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण सुध्दा वाढत गेले आहे. परंतु या वाढीत चढ उतार दिसून येतात ही चढ-उतार २६.८३ टक्के पासून ८१.६६ टक्क्याच्या दरम्यान दिसून येते.

इ) <u>करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने कायम स्वरूपी फंडात गुंतविलेली रक्कम</u>:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने कायम स्वरूपी फंडात काही रक्कम गुंतविलेली आहे. या फंडात प्रामुख्याने नफा गुंतविल्याचे दिसून येते. समितीच्या कायम स्वरूपाच्या फंडात विश्लेषण काळात झालेल्या बदलाचा तपशिल कोष्टक २० मध्ये दिलेला आहे.

१९७४-७५ ते १९८७-८८ या विश्लेषण कालावधीत करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायम स्वरूपी फंडात वाढ झालेली आहे. ही वाढ ४,४७,१४१ रूपयांपासून ३८,५३,४९२ रूपयांपर्यंत झाली आहे. या कालावधीत या फंडात

कोष्टक - २०

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने कायम स्वरूपी फंडात गुंतविलेली रक्कम

(रुपये)


| वर्षे १ | कायम स्वरूपी फंडातील रक्कम २ |
|---|---|
| १९७४-७५ | ४,४७,१४९ |
| १९७५-७६ | ४,८८,७८४ |
| १९७६-७७ | ५,३४,६६८ |
| १९७७-७८ | ६,११,४४५ |
| १९७८-७९ | ७,४३,८११ |
| १९७९-८० | ९,०७,५५८ |
| १९८०-८१ | १०,५१,१७२ |
| १९८१-८२ | १७,६०,९१३ |
| १९८२-८३ | १९,७६,१६५ |
| १९८३-८४ | २१,०२,०४१ |
| १९८४-८५ | २७,७३,३६० |
| १९८५-८६ | २९,८६,६०८ |
| १९८६-८७ | ३४,४४,६०३ |
| १९८७-८८ | ३८,५३,४९२ |

संदर्भ करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८.

३४,०६,३४३ रुपयांची निव्वळ वाढ झाली आहे. ही वाढ ७६१.७९ टक्के झाली आहे. या १३ वर्षाच्या कालावधीत प्रत्येक वर्षी या फंडात सरासरी ५८.६० टक्के दराने वाढ झाली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायम स्वरूपाचा निधि



कायमस्वरूपी फंडात विश्लेषण काळात सातत्याने वाढ झालेली आहे. परंतु १९८०-८१ ते १९८१-८२ या वर्षात झालेली वाढ इतर सर्व वर्षाच्या वाढी पेक्षा जास्त आहे. ही वाढ ७,०९,७४१ रूपयांची आहे. या वर्षाची वाढ सर्वात जास्त असण्याचे कारण १९८०-८१ या वर्षी बाजार समितीला विश्लेषण काळात सर्वात जास्त नफा झाला आहे. आणि तो सर्वच्या सर्व नफा बाजार समितीने कायम स्वरूपी फंडात गुंतविलेला आहे.

कायम स्वरूपी फंडात गुंतविलेली रक्कम म्हणजे बाजार समितीने स्थावर संपत्तीत केलेली गुंतवणुक होय.

थोडक्यात असे सांगता येईल की विश्लेषण काळात बाजार समितीच्या कायम स्वरूपी निधीत वाढ झाली आहे.

...

प्रकरण ४ थे

भाग ५ वा

अ) प्रस्तावना:

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे एकंदर कामकाज कसे चालते व बाजाराच्या आवारात अभ्यासाच्या कालावधीत झालेल्या शेतमालाच्या उलाढालीचा आतापर्यंत विचार केलेला आहे. परंतु या अभ्यासामुळे करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीशी प्रत्यक्ष संबंधित असणा-या घटकांचा किती फायदा झाला ? हे घटक बाजार समितीच्या कामकाजा बाबत समाधानी आहेत का ? यावर प्रकाश पडू शकला नाही. यासाठी बाजारपेठेतील पदाधिका-यांशी गरजेनुसार चर्चा केलीच परंतु बाजार पेठेतील सर्वात महत्वाचा घटक म्हणून बाजारपेठेत येणा-या शेतक-यांची मते अजमावण्याचा प्रयत्न केला.

ब) नमुना निवड :

ही मते अजमावण्यासाठी नमुना पाहणी ( Sample Survey ) करण्यात आली. या नमुना पाहणीत घटकांची निवड आपत्ती अथवा सोयिस्कर नमुना या नुसार करण्यात आली. संशोधकाने त्याच्या सायिनुसार एके दिवशी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जाऊन तेथे भेटलेल्या शेतक-यांच्या मुलाखती घेतल्या. त्यामुळे नमुन्यातील सर्व एककांची निवड त्यांच्या उपलब्धतेनुसार झाली. मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करण्यात आलेली होती. एकंदर ५० शेतक-यांच्या मुलाखती घेण्यात आल्या मात्र शेतक-यांच्या मुलाखती घेत असताना जे तेलबियांचे उत्पादन करीत होते अशांच्याच मुलाखती घेण्यात आल्या.

क) नमुना पाहणीचे उद्देश :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात येणा-या शेतक-यांच्या मुलाखती घेण्यामागे खालील उद्देश होते.

१) तेलबियांचे उत्पादन घेणा-या शेतक-यांची करमाळा नियंत्रित बाजारपेठे बाबतची मते अजमावणे .

२) तेल बियांच्या नियंत्रित बाजारपेठेमुळे या शेतक-यांना मिळालेले फायदे अभ्यासणे.

३) करमाळा बाजार आवारात शेतक-यांना जाणवणा-या अडचणी अभ्यासणे.

ड) नमुना पाहणीचे प्रमुख निष्कर्ष :

या नमुना अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष खालील प्रमाणे.

१) धारणक्षेत्रानुसार मुलाखत घेतलेल्या शेतक-यांची वर्गवारी :
मुलाखत घेतलेल्या ५० शेतक-यांची धारण क्षेत्रानुसार वर्गवारी केली असता ती खालील प्रमाणे-

| अ. नं. | शेतक-यांची वर्गवारी | शेतक-यांची संख्या | मुलाखत घेतलेल्या सर्व शेतक-यांशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | सीमांत शेतकरी | २ | ४ |
| २) | लहान शेतकरी | १६ | ३२ |
| ३) | मध्यम शेतकरी | १७ | ३४ |
| ४) | मोठे शेतकरी | १५ | ३० |
| | एकूण | ५० | १०० |

सीमांत शेतकरी (२.५ एकरापेक्षा कमी धारणक्षेत्र) २ असून नमुन्यासाठी निवडलेल्या शेतक-यांशी यांचे प्रमाण ४ टक्के आहे. लहान शेतकरी (२.५ ते १० एकरापर्यंत धारणक्षेत्र ) १६ असून नमुन्यासाठी निवडलेल्या शेतक-यांशी यांचे प्रमाण ३२ टक्के आहे. मध्यम शेतकरी (१० ते २५ एकरापर्यंत धारणक्षेत्र) १७ असून त्याचे

नमुन्यासाठी निवडलेल्या शेतक-यांशी असलेले प्रमाण ३४ टक्के आहे. आणि मोठे शेतकरी (२५ एकरापेक्षा जास्त धारणक्षेत्र) १५ असून नमुन्यासाठी निवडलेल्या शेतक-यांशी यांचे प्रमाण ३० टक्के आहे. ही वर्गवारी असे दर्शविते की करमाळा बाजाराच्या आधारात येऊन नियंत्रित बाजारपेठेचे फायदे प्रामुख्याने मध्यम व मोठया शेतक-यांकडून घेतले जात असावेत.

२) तेलबियांचे उत्पादन घेण्याची कारणे :

करमाळा तालुक्याचे प्रमुख पिक ज्वारी व बाजरी आहे. परंतु मुलाखत घेतलेले शेतकरी अन्य पिकापेक्षा तेलबियांचे उत्पादन घेणे अधिक पसंद करतात. याची कारणे खालील प्रमाणे सांगण्यात आली.

करमाळा तालुक्याची भौगोलिक परीस्थिती व पावसाचे कमी प्रमाण यामुळे अधिक उत्पन्न देणारी परंतु कमी पाणी लागणारी भूईमूग व सूर्यफुल ही पीके घेणे या शेतक-यांना फायदेशीर वाटते.

ज्वारीच्या पिकात अंतर्गत पिक म्हणून करडईचे पिक घेता येते.

ज्वारी व बाजरी सारख्या पिकापेक्षा तेलबियांच्या बाबतीत पिकांवर पडणा-या रोगांचा प्रभाव कमी असतो.

३) शेतक-यांना मिळणारे फायदे :

३:१) व्यापा-याकडून होणा-या शोषणाला प्रतिबंध :

करमाळा नियंत्रित बाजारपेठ १९४८ मध्ये स्थापन झाली. तेव्हांपासून या बाजारपेठेत समाविष्ट होणा-या नियंत्रित वस्तुंची संख्याही वाढत गेली. या बाजारपेठेमुळे अनियंत्रित बाजारपेठेत दलाल अथवा व्यापारी यांच्याकडून शेतक--यावर आकारले जाणारे अनेक प्रकारचे दर, वर्गणी, सूट व सांड यासाठी जादा धान्य घेणे इत्यादी प्रकार पूर्णपणे थांबले आहेत काय ? किंवा हे प्रकार दुस-या कोणत्या तरी

स्वरूपात चालू आहेत काय? याबाबत विचारणा करण्यात आली होती. या संदर्भात असे आढळून आले की करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने आडत, हमाली इत्यादी बाबत जे दर ठरवून दिले आहेत तेवढेच दर प्रत्यक्ष व्यवहारात घेतले जातात. हे दर पुढील प्रमाणे –

शेतक-यांच्यावर आकारले जाणारे बाजार शुल्क :

| शुल्कचा प्रकार<br>१ | आकारली जाणारी शुल्क<br>२ | |
|---|---|---|
| आडत | १०० रुपये विक्री व्यवहारावर | २.४० पैसे |
| हमाली | प्रति क्विंटलला | ७५ " |
| प्रमाणीकरण शुल्क | १०० रुपयाच्या मालविक्रीवर | ०५ " |

या शिवाय कोणतीही जादा आकारणी परवानाधारक व्यापा-या-च्याकडून केली जात नाही. म्हणजे या बाजारपेठेमुळे अनियंत्रित बाजारपेठेत होणा-या शेतक-यांचे शोषण थांबण्याला मदत झाली आहे. असे म्हणता येईल.

३:२) साठवणूक सोयी उपलब्ध :

प्रकरण ४ मधील भाग १ मध्ये नमुद केल्या प्रमाणे या नियंत्रित बाजार-पेठेमुळे माल साठविण्याच्या सोयी उपलब्ध झाल्या परंतु या सोयीचा लाभ प्रत्यक्ष शेतकरी किती घेतात हे पाहणे महत्त्वाचे होते. मुलाखत घेतलेल्या ५० शेतक-यांपैकी किती शेतकरी या सोयींचा वापर करतात. किती शेतकरी करत नाहीत व त्याची कारणे काय याबाबत पृथःकरण केले असता खालील महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

मुलाखत घेतलेले एकंदर शेतकरी- ५०

- योग्य किंमत नसताना शेतमालाची साठवण करणारे शेतकरी
  २४(४८ टक्के)[१]
  - स्वत:च्या घरात शेतमालाची साठवण करणारे शेतकरी.
    २२(४४ टक्के)[२]
  - राज्य वखार महामंडळाच्या गोदामात शेतमालाची साठवण करणारे शेतकरी.
    २ (४ टक्के)[२]
- योग्य किंमत नसताना सुध्दा शेतमालाची विक्री करणारे शेतकरी
  २६(५२ टक्के)[१]

(१) कंसातील आंकडे मुलाखत घेतलेले शेतक-यांशी त्या विशिष्ट बाबीस असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.

(२) साठवण करणा-या शेतक-यांचे वर्गवारीनुसार शेकडा प्रमाण दर्शवितात.

५० पैकी २६ (५२ टक्के) शेतकरी शेतमालाला योग्य किंमत येई पर्यंत वाट पाहण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने हंगामानंतर लगेचच आपला शेतमाल विकून टाकतात. तर थांबण्याची कुवत (Staying Capacity) असणा-या २४ (४८टक्के) शेतक-यापैकी फक्त २(४ टक्के) शेतकरी सरकारने उपलब्ध केलेल्या साठवण सोयींचा वापर करतात.

शेतमालाची साठवण स्वत:च्या घरात करणा-या २२(४४ टक्के) शेतक-यांशी चर्चा केली की तुम्ही महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात शेतमालाची साठवण का करत नाही. त्याची कारणे त्यांनी या प्रमाणें सांगितली-

१) शेतमालाच्या तारणावर कर्ज घेण्याची आवश्यकता नसते.

२) महाराष्ट्र राज्यवखार महामंडळाच्या गोदामात शेतमालाची साठवण केली असता मालाची नासधुस होते.

३:३) प्रमाणीकरणांच्या सुविधा उपलब्ध:

प्रमाणीकरणांच्या सुविधा उपलब्ध नसल्यास शेतमालाला दर्जा प्रमाणे किंमत मिळत नाही व शेतक-याचे नुकसान होते. उपाय म्हणून करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात करडी, शेंगा व सूर्यफुल या तेल बियाचे प्रमाणिकरण करण्यात येते. या तेलबियांच्या प्रमाणिकरणाबाबतचा तपशिल कोष्टक २१ मध्यें दिला आहे.

कोष्टक -२१

प्रमाणीकरण केलेल्या तेलबिया आणि एकूण प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाशी त्याचे प्रमाण

| वर्ष | एकुण प्रमाणीकरण केलेला शेतमाल | तेलबियाचे केलेले प्रमाणिकरण | प्रमाणिकरण केलेल्या तेल बियाचे एकूण प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९७४-७५ | ६१,४०६ | - | |
| १९७५-७६ | ६०,०८२ | ५५,९०० | ९३.०० |
| १९७६-७७ | ६५,२७० | ६०,४०९ | ९२.५४ |
| १९७७-७८ | ८२,२५४ | ८२,२५४ | १००.०० |
| १९७८-७९ | ७८,४६२ | ७८,४६२ | १००.०० |
| १९७९-८० | ७२,३९० | ७१,३९० | ९८.६१ |
| १९८०-८१ | १,५९,५९८ | ६८,४३५ | ४२.९० |
| १९८१-८२ | ९५,८९९ | ५१,५४६ | ५३.७५ |
| १९८२-८३ | ६९,८५७ | ३४,४७८ | ४९.३५ |
| १९८३-८४ | १,९६,०३० | ९२,३०२ | ४७.०८ |
| १९८४-८५ | १,७४,८३२ | ९३,२७३ | ५३.३५ |
| १९८५-८६ | १,५५,२३१ | ८१,७८३ | ५२.६८ |
| एकूण | १२,७१,२३१ | ७,७०,२२४ | ६०.५९ |

संदर्भ : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८५-८६.

विश्लेषण काळात (१९७४-७५ ते १९८५-८६)प्रमाणीकरण केलेल्या एकूण १२,७१,२३१ क्विंटल शेतमालापैकी ७,७०,२२४ क्विंटल तेलबियाचे प्रमाणीकरण केले होते. प्रमाणीकरण केलेल्या तेलबियांचे प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाशी असलेले प्रमाण ६०.५९ टक्के आहे. म्हणजेच करमाळा बाजार आवारात प्रमाणीकरण केल्या जाणा-या शेतमालात तेल बियांचा हिस्स निम्म्यापेक्षा जास्त आहे.

करमाळा बाजार आवारात प्रतवारी लागू केलेल्या सर्व तेलबियांची प्रतवारी केली जाते असे ५० (१०० टक्के) शेतक-यांनी सांगीतले.

वेगवेगळया शेतक-यांच्या तेल बियांना समान प्रत मिळाली असता त्या तेलबियांना समान किंमत मिळते असे ४८ (९६ टक्के) शेतक-यांनी सांगीतले तर २ (४टक्के) शेतक-यांच्यामते समान किंमत प्राप्त होत नाही. पहिले कारण खरेदीदार वेगळा असल्यास समान किंमत मिळेलच याची हमी नसते. दुसरे कारण या बाजारात प्रतवारी करण्याची पध्दत चुकीची आहे. म्हणजेच ग्रेडर प्रतवारी योग्य पध्दतीने करत नाहीत.

यावरून हे स्पष्ट होते की करमाळा बाजार आवारात जवळ जवळ सर्व शेतक-यांच्या तेलबियांना दर्जानुसार किंमत प्राप्त होते. हा शेतक-यांचा फायदा झाला.

### ३:४) <u>उघड लिलाव पध्दतीचा वापर</u>:

शेतमालाची किंमत ठरवितांना स्वातंत्र्या पूर्वी व स्वातंत्र्यालगतच्या काळात हप्तापध्दतीचा वापर केला जात असे. शेतमालाची किंमत ठरविण्याचा अधिकार व्यापारी व दलाल यांना असे त्यामुळे व्यापा-याने दिलेली किंमत व शेतक-यांना मिळणारी किंमत यांच्यात मोठी तफावत असे.

या मार्गांनी शेतक-यांची केली जाणारी आर्थिक फसवणूक कमी करण्यासाठी राज्य सरकारने नियंत्रित बाजारपेठेत उघड सौदा पध्दतीने

शेतमालाची किंमत ठरविण्याच्या पध्दतीचा वापर केला आहे. या पध्दतीने शेतमालाची किंमत ठरवितांना शेतकरी व्यापारी व बाजार समितीचे अधिकारी प्रत्यक्ष हजर असतात. जो व्यापारी शेतमालाला जास्त किंमत देईल त्याला शेतमालाची विक्री केली जाते.

करमाळा बाजार आवारात सर्व शेतमालाची किंमत उघड सौदा पध्दतीने ठरविली जाते असे ५० (१०० टक्के) शेतक-यांनी सांगीतले. या पध्दतीने ठरविली जाणारी किंमत ४९ (९८ टक्के) शेतक-यांना मान्य असून १(२टक्के) शेतक-यांना मान्य नाही.

ही किंमत मान्य नसणा-या शेतक-यांची संख्या अल्प (१(२टक्के)) असली तरी त्याच्याशी केलेल्या चर्चेतून महत्त्वाचे मत समजले ते असे की व्यापारी किंवा बाजार समिती शेतमालाची किंमत ठरवितांना उत्पादन खर्चाचा विचार करत नाहीत। त्यामुळे शेतमालाची उघड सौदा पध्दतीने ठरणारी किंमत ही व्यापा-यांच्या स्पर्धेतुन ठरते. व्यापा-यांची स्पर्धा कमी असल्यास शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही. तसेच बाजार समितीला शेतमालाची किंमत ठरविण्याचा कोणताही अधिकार नसल्यामुळे व्यापा-यांनी ठरविलेली किंमत शेतक-यांना मान्य करावी लागते।

शेतमाल विक्रीस आणलेल्या दिवशी लिलावात ठरलेली किंमत योग्य वाटली नाही तर त्या दिवशी शेतमालाची विक्री न करणारे ३३ (६६ टक्के) शेतकरी असून हे शेतकरी दुस-या दिवशी लिलावात ठरणारी किंमत योग्य वाटली की शेतमालाची विक्री करतात। पण शेतमाल विक्रीस आणलेल्या दिवशी लिलावात ठरणारी किंमत योग्य वाटत नसतांना सुध्दा त्याच दिवशी ठरलेल्या किंमतीला १७(३४ टक्के) शेतकरी शेतमालाची विक्री करतात कारण त्यांना आर्थिक अडचण असते.

याच्या आधारे असे म्हणता येईल की करमाळा बाजार आवारात शेतमालाची किंमत उघड सौदा पध्दतीने व कोणतेही गैर प्रकार न होता

ठरविली जाते. खुली लिलाव पध्दती सुरु करण्यात ही बाजारपेठ यशस्वी झाली आहे असेही म्हणता येईल.

३:५) योग्य वजना मापांचा वापर:

भारतात १९५८ पासून वजना मापांच्या मध्ये असणारी विविधता टाळण्यासाठी दशमान पध्दतीच्या वजनामापांचा वापर केला आहे. करमाळा बाजार समितीच्या आवारात या दशमान पध्दतीच्या वजनामापांचा वापर केलेला आहे. त्यामुळे खोटी वजने व मापे वापरुन शेतक-याची केली जाणारी फसवणूक थांबली आहे. शेतमालाची किंमत क्विंटलमध्येच ठरविली जात असून वजन सुध्दा क्विंटल या परिमानातच केले जाते असे करमाळा बाजार आवारात येणा-या ५०(१०० टक्के) शेतक-यांनी सांगीतले.

करमाळा बाजार समितीच्या आवारात प्रत्येक आडत्याच्या वखारीवर तोलार म्हणून एक व्यक्ती नेमली जाते. या व्यक्तीचे मुख्य कार्य म्हणजे शेतमालाचे केले जाणारे वजन योग्य किंवा अयोग्य या कडे लक्ष ठेवणे हा तोलार शेतमालाचे वज करताना प्रत्यक्ष हजर असतो. असे ५०(१०० टक्के) शेतक-यांनी सांगीतले.

जर कांही व्यापारी किंवा आडत्यानी वजनामध्ये शेतक-यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला तर तोलार बाजार समितीकडे तक्रार नोंदवितो किंवा खोटी वजने मापे वापरल्याचे बाजार समितीच्या अधिका-यांच्या लक्षात आले तर त्या व्यापा-यावर किंवा आडत्यावर खटला भरला जातो. किंवा गंभिर बाब असल्यास परवाना कायमचा रद्द केला जातो. अशा प्रकारचे कांही खटले भरल्याचे बाजार समितीच्या सहसचिवानी सांगीतले.

करमाळा बाजार आवारात शेतमालाचे वजन करण्यासाठी योग्य वजना मापांचा वापर केला जातो व त्यामुळे वजना मापात होणारी शेतक-यांची फसवणूक पूर्ण पणे थांबली आहे असे या नमुना पाहणीत आढळून आले.

३:६) <u>शेतमालाच्या विक्रीचे व्यवहार त्वरितपूर्ण केले जातात:</u>

करमाळा बाजार आवारात विक्रीसाठी आणलेल्या शेतमालाचा लिलाव झालेल्या दिवशीच शेतमालाचे वजन करून शेतमालाची किंमत शेतक-यांना दिली जाते असे ४९ (९८ टक्के) शेतक-यांनी सांगितले फक्त एका (२ टक्के) शेतक-याने मात्र शेतमालाची विक्री झालेल्या दिवशी पैसे न देता ते १५ ते ९० दिवसाच्या दरम्यान दिले जातात अशी माहिती दिली.

मुलाखात घेतलेल्या ५० (१०० टक्के) शेतक-यापैकी ११ (२२ टक्के) शेतक-यांनी सांगीतले की नगरच्या नियंत्रित बाजारपेठेत गूळ विकण्यासाठी नेला असता पैसे मिळण्यासाठी ३ ते १५ दिवस थांबावे लागते परंतू करमाळा बाजार आवारात शेतमालाच्या विक्रीचे व्यवहार शक्यतो त्याच दिवशी पूर्ण केले जातात. किंवा अवक जास्त असल्यास दुस-या दिवशी हा व्यवहार पूर्ण होतोच.

३:७) <u>बाजार भावा संबंधी माहिती मिळते</u> :

भारतातील कृषी विपणन व्यवस्थेत बाजारासंबंधी शेतक-यांचे अज्ञान हा महत्वाचा दोष समजला जातो. हा दोष दूर करण्यासाठी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने भाव फलक बाजार आवारात लावले आहेत. या भाव फलकाशिवाय जर शेतक-यांना माहिती आवश्यक असेल तर ते बाजार समितीच्या कार्यालयात जाऊन माहिती विचारू शकतात. व बाजार समितीमधील अधिकारी शेतक-यांना माहिती सांगतात.

करमाळा बाजार समितीच्या आवारात येणा-या शेतक-यापैकी भाव फलक आणि बाजार समितीच्या कार्यालयातून माहिती मिळवणारे फक्त ६(१२टक्के) शेतकरी आहेत. उरलेले ४४ (८८ टक्के) शेतकरी बाजार भावासंबंधी माहिती घेण्याचा प्रयत्न करत नाहीत. अर्थात हा दोष बाजार समितीचा नसून उपलब्ध सुविधा न वापरण्या-या शेतक-यांच्याप्रवृत्तीचा म्हणावा लागेल.

३:८) शेतक-यांचा व्यवस्थापनात सहभाग :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवस्थापनात एकूण १८ सभासद असतात. त्यातील १० सभासद हे शेतकरी वर्गातील असतात. तसेच बाजार समितीचे कार्यवाह आणि उपकार्यवाह हे दोन्ही शेतकरी असलेच पाहिजेत अशी बाजार समितीस अट आहे. ही अट करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने आज पर्यंत तरी पाळली आहे. एकूण सभासदत संख्येत निम्म्यापेक्षा जास्त सभासद शेतकरी असल्यामुळे शेतक-यांना आवश्यक असणारे निर्णय बाजार समितीला घेणे शक्य होते म्हणजेच व्यवस्थापनात सहभाग असल्यामुळे शेतक-यांचा फायदा झाला आहे.

३:९) इतर फायदे:

वरील फायद्या शिवाय करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमुळे शेतक-यांना काही फायदे झाले आहेत. यात प्रामुख्याने जवळच शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था झाली, शेतकरी व परवानाधारक यांच्यात वाद झाल्यास तो मिटविण्याची सोय झाली. खेडेगावात शेतमालाची दलाल किंवा फिरते व्यापारी यांच्या मार्फत केली जाणारी शेतमालाची खरेदी पूर्णपणे थांबली आहे असे ५०(१०० टक्के) शेतक-यांनी सांगितले. या फायद्याचा समावेश होतो.

इ) शेतक-यांनी घेतलेले कर्ज :

करमाळा बाजार आवारात शेतमालाची विक्री करण्यासाठी येणा-या शेतक-यापैकी १६(३२ टक्के) शेतकरी कर्ज घेत नाहीत. तर ३४ (६८ टक्के) शेतकरी कर्ज घेतात. कर्ज घेणा-या शेतक-यांची कर्जपुरवठा करणा-या संस्थानुसार वर्गवारी या प्रमाणे आहे. खाजगी सावकाराकडून १३(२६ टक्के) शेतकरी कर्ज घेतात. बँकाकडून १२(२४ टक्के) शेतकरी कर्ज घेतात तर आडत्याकडून ९(१८ टक्के) शेतकरी कर्ज घेतात. म्हणजेच आज सुध्दा करमाळा बाजार आवारात येणा-या शेतक-यापैकी २२ (४४ टक्के) शेतकरी खाजगी व्यक्तीकडून कर्ज घेतात.

फ) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्याविषयी तक्रारी

४९(९८ टक्के) शेतक-यांच्या करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्याविषयी तक्रारी नाहीत. एका (२टक्के) शेतक-यांनी बाजार समितीच्या कार्याविषयी खालील तक्रारी सांगीतल्या आहेत.

१) शेतमालाची आवक आणि जावक यांची बाजार आवाराच्या गेटवर नोंद केली जात नाही:

या तक्रारी विषयी बाजार समितीच्या कार्यवाहाशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगीतले की शेतमालाची गेटवर नोंद करावयाची झाल्यास प्रत्येक गेटवर तिन कामगार वर्ग नेमावे लागतील (कारण प्रत्येकी ८ तास काम यानुसार) करमाळा बाजार आवाराला दोन गेट असल्यामुळे सहा कामगार जादा नेमावे लागतील. हे कामगार नेमण्यासाठी कायदेशीर बंधने येतात. यात प्रामुख्याने १९६३ च्या महाराष्ट्र शेती विपणन कायद्यानुसार "अ" वर्ग बाजार समितीला ( १ लाख रुपया पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणा-या बाजार समितीला) १७ कामगार नेमण्यास परवानगी आहे. त्यामुळे हे सहा जादा कामगार आम्हाला घेता येत नाहीत. त्यामुळे शेतमालाची आवक व जावक यांची बाजार गेटवर नोंद करता येत नाही.

२) बाजार आवाराबाहेर होणा-या व्यापा-यांच्या व्यवहारावर मर्यादा घालण्यास बाजार समिती असमर्थ ठरली आहे. या तक्रारीच्या संदर्भात कार्यवाहाशी चर्चा केली. असता त्यांनी सांगीतले की बाजार आवाराच्या बाहेर होणा-या व्यवहारावर निर्बंध आणण्यासाठी बाजार समितीला अधीकार नाहीत.

३) प्रतवारी पूर्वी शेतमालाची चाळण केली जात नाही. या तक्रारीचे कारण कार्यवाहाने असे सांगीतले की ही कायदयात तरतुद नाही.

४) व्यापारी व हमाल यांनी संघटनेच्या जोरावर बाजार बंद पाडल्यास त्यावर पर्यायी व्यवस्था बाजार समितीला करता येत नाही. या तक्रारीसाठी सुध्दा कायदेशीर तरतुदी अपु-या पडतात असे कार्यवाहाने सांगीतले.

याच्या आधारे असे म्हणता येईल की या तक्रारी प्रामुख्याने कायदा अपु-या असल्यामुळे निर्माण झाल्या आहेत. या तक्रारी बाबत बाजार समितीच्या कार्य पध्दतीला दोषी मानता येणार नाही.

ग) करमाळा बाजार समितीच्या आवारात - शेतक-यांना जाणवणा-या अडचणी :

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतक-यांना जाणवणा-या अडचणी खालील प्रमाणे आहेत.

१) पिण्याच्या पाण्याचा अभाव :

करमाळा बाजार समितीच्या आवारात जनावरांना व शेतक-यांना पिण्याच्या पाण्याची अडचण जाणवते असे शेतमालाची विक्री करण्यासाठी बैल-गाडी घेवून येणा-या ४५ (९० टक्के) शेतक-यांनी सांगीतले. बाजार समितीने पिण्याच्या पाण्यासाठी केलेल्या सुविधा अपु-या पडतात.

२) व्यापारी व हमाल यांचा संप :

व्यापारी व हमाल किरकोळ कारणावरून संघटनेच्या जोरावर बाजार बंद करतात. बाजार बंद केल्यानंतर शेतक-यांना आपला शेतमाल विकणे थांबवावे लागते. त्यामुळे त्यांची आर्थिक कुचंबणा होते. व शेतमाल विक्रीला असून सुध्दा शेतमालाची विक्री करून शेतक-यांना पैसे मिळविता येत नाहीत.

३) शेतक-यांच्या निवासाची गैरसोय :

करमाळा बाजार आवारात शेतकरी निवास असून ते अपुरे असल्यामुळे शेतक-यांना रात्री राहण्याची वेळ आल्यास निवासाची गैरसोय होते.

४) शेतमालाचा आवक जास्त असेल त्या दिवशी शेतमालाचे वजन होत नाही व पैसे मिळत नाहीत. तर पैसे नेण्यासाठी दुस-या दिवशी शेतक-यांना परत यावे लागते.

सर्वसाधारणपणे या नमुना पाहणीत महत्वाचे निष्कर्ष असे दर्शवितात की करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकंदर कार्यपध्दती बाबत शेतकरी समाधानी आहेत.

.....

प्रकरण ५ वे

## समारोप

या प्रबंधामध्यें करमाळा नियंत्रित बाजारपेठेने केलेल्या कार्याचा व शेतक-यांना झालेल्या फायद्यांचा अभ्यास केला आहे. तथ्य संकलनासाठी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षीक अहवालांचा / नोंदणी पत्राचा वापर करण्यात आला आहे. तसेच काही माहिती बाजार समितीचे कार्यवाह, सचिव, सहसचिव, लेखनिक यांच्याशी चर्चा करून उपलब्ध झाली आहे. तसेच शेतक-यांशी संबंधीत असणारी माहिती पूर्व रचीत प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त केली आहे. प्रबंधाला आवश्यक असणारी इतर माहिती करमाळा तहसील कचेरी व पंचायत समिती करमाळा यांच्या कार्यालयाकडून मिळविली आहे.

अभ्यासाचा विषय शेतमालाच्या विपणनास संबंधित असल्याने प्रबंधात प्रथम विपणी अथवा बाजार म्हणजे काय ? शेतमालाच्या विपणनाची वैशिष्टये व महत्व थोडक्यात स्पष्ट केले आहे. त्यानंतर स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील, कृषी विपणन व्यवस्थेतील दोष स्पष्ट केले आहेत. या दोषावरून हे स्पष्ट होते की त्या काळात शेतमालाची विक्री करत असतांना मोठया प्रमाणावर शेतक-यांची आर्थिक फसवणूक व पिळवणूक केली जात होती.

१९५१ ते १९८७ या कालावधीत शासनाने कृषी विपणन व्यवस्थतील दोष कमी करण्यासाठी केलेल्या वेगवेगळ्या प्रयत्नाचा आढावा घेतला आहे. या प्रयत्नात प्रामुख्याने नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढविण्यावर भर दिला आहे असे दिसून येते. १९५१ मध्ये देशात २८६ नियंत्रित बाजारपेठा होत्या. त्यांच्यात वाढ होऊन मार्च, १९८७ मध्ये देशात ५९४२ नियंत्रित बाजारपेठा झाल्या.

या नियंत्रित बाजारपेठांचे प्रमुख उद्दिष्ट उघड लिलाव पध्दतीने शेतमालाची किंमत ठरविणे व व्यापा-यांच्या कडून शेतक-यांची केली जाणारी

आर्थिक फसवणूक थांबविणे हे आहे.

या पार्श्वभूमीवर करमाळा तालुक्यातील शेतमालाचे विपणन करताना शेतक-यांचा फायदा कितपत झाला हे अजमावण्यासाठी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

या अभ्यासात करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना, बाजार समितीमधील आवक, तेलबियांच्या आवकेमधील बदल, बाजार समितीची वित्तिय स्थिती आणि बाजार समितीमध्ये तेलबियांची विक्रीकरणा-या शेतक-यांची नमुना पाहणी या प्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

या स्पष्टीकरणातून मिळालेल्या आकडेवारीवरुन व माहितीवरुन करमाळा तालुक्यातील शेतमालाच्या विपणन स्थिती बद्दल पुढील निष्कर्ष निघतात.

१) करमाळा नियंत्रित बाजारपेठेच्या स्थापनेपासून अधिकाधिक वस्तुंचे विपणन नियंत्रित बाजारपेठे मार्फत करण्याचे प्रयत्न झाले आहेत. १९४८ मध्ये ५ वस्तु नियंत्रित होत्या तर १९८७-८८ मध्ये या वस्तुंची संख्या २७ झाली.

२) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सर्व प्रकारच्या नियंत्रित शेतमालाची किंमत उघड सौदा पध्दतीने ठरविली जाते. त्यामुळे शेतमालाची हप्ता पध्दतीने किंमत ठरविताना होणारी फसवणूक पूर्णपणे थांबली आहे.

३) करमाळा बाजार आवारात असलेल्या राज्य वखार महामंडळाने उभारलेल्या गोदामात शेतमालाची साठवण करण्याचे प्रमाण अती अल्प ( १९७९ ते १९८८ या कालावधीत एकूण ५९,१०२ क्विंटल शेतमालाची साठवण केली)आहे.

४) अभ्यासाच्या कालावधीत शेतमालाची आवक २,०८,०२३ क्विंटलने निव्वळ वाढली आहे. ही वाढ १४५.८७ टक्के झाली आहे.

५) अभ्यासाच्या कालावधीत विक्री केलेल्या शेतमालाची एकूण किंमत ८,६१,९६,१२६ रुपयांनी वाढली आहे. ही वाढ २७९.१६ टक्के झाली आहे.

६) करमाळा तालुक्यात सहकारी खरेदी-विक्री संघाचा शेतमालाच्या विपणन व्यवस्थेत प्रभाव पडलेला दिसून येत नाही. (विश्लेषण काळात एकूण आवकेशी सहकारी संस्था मार्फत येणा-या आवकेचे प्रमाण सरासरी २.१५ टक्के आहे) कारण एक सहकारी खरेदी-विक्री संघाची नियंत्रित बाजारपेठेनंतर स्थापना झाली आहे. दोन या नियंत्रित बाजार पेठेचे कामकाज व्यवस्थित असल्यामुळे शेतकरी खाजगी व्यापा-याकडे शेतमाल विकणे पसंत करतात.

७) सद्य:स्थितीत करमाळा तालुक्यातील तेलबियांच्या विपणन व्यवहारात शेंगा आणि सूर्यफुल या दोन तेलबियांचा महत्वाचा वाटा असून तो एकूण तेलबियांच्या आवकेशी ९०.७६ टक्के आहे. तेलबियांच्या पासून मिळणा-या एकूण उत्पन्नाशी या दोन तेलबियांचा हिस्सा ९३.०३ टक्के आहे.

८) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतमालाची विक्री करून शेतक-यांना प्राप्त होणा-या उत्पन्नापैकी जवळ जवळ ६० टक्के उत्पन्न तेलबियांच्या विक्रीपासून प्राप्त होत आहे.

९) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची वित्तिय स्थिती समाधानकारक आहे. विश्लेषण काळात या समितीला तोटा झाला नसून कर्ज सुध्दा घेतलेले नाही. बाजार समितीला मिळणारा नफा वाढत गेला आहे. त्या बरोबरच नफ्याचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण (१९७४-७५ ते १९८७-८८ या कालावधीत) २८.८४ टक्क्यापासून ४८.३९ टक्क्यापर्यंत वाढले आहे.

१०) या बाजारपेठेमुळे करमाळा तालुक्यात शेतमालाची फिरते व्यापारी व दलाल यांच्या मार्फत खेडे गावात केली जाणारी खरेदी पूर्ण पणे (घेतलेल्या सर्व्हेक्षणावरून) थांबली आहे. तसेच योग्य वजना मापांचा वापर केला जात आहे.

शेतमालाच्या विक्रीचे व्यवहार त्वरित रोखीने पूर्ण केले जातात. उप-नियमात ठरविलेल्या बाजार आकाराशिवाय कोणतीही शुल्क शेतक-यांच्या कडून वसूल केले जात नाही. यामुळे व्यापा-याकडुन होणा-या शेतक-यांच्या आर्थिक शोषणाला प्रतिबंध झाला आहे.

११) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्याविषयी ज्या तक्रारी उदा:

अ) शेतमालाची आवक व जावक याची बाजार आवाराच्या गेटवर नोंद केली जात नाही,

ब) बाजार आवाराबाहेबर होणा-या व्यवहारावर मर्यादा घालण्यास बाजार समिती असमर्थ ठरली आहे,

क) व्यापारी व हमाल संघटनांनी संप केल्यानंतर बाजार समितीला शेतमालाच्या विक्री व्यवस्थेची पर्यायी व्यवस्था करता येत नाही.

ड) शेतमालाची किंमत ठरविण्याचा बाजार समितीला अधिकार नाही, या आहेत या तक्रारी प्रामुख्याने कायद्यातील अपु-या तरतुदीमुळे निर्माण झालूया आहेत.

१२) करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतक-यांना पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि निवासाची गैरसोय या अडचणी जाणवतात.

तक्रारी सोडविण्यासाठी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने कायद्यातील तरतुदीत बदल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाला आपली बाजु स्पष्ट करून दाखविली पाहिजे.

शेतक-यांना जाणवणा-या अडचणी कमी करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची कायम स्वरूपी उपाय योजना करणे आवश्यक आहे. तसेच शेतकरी

निवासाच्या सोयींचा विस्तार करणे आवश्यक आहे. या गोष्टी करणे बाजार समितीला सहज शक्य आहे. कारण विश्लेषण काळात ( १९७४–७५ ते १९८७–८८ ) बाजार समितीचा नफा सातत्याने (३२,६३४ पासून ५,५४,८२५ रूपये पर्यंत) वाढत गेला आहे.

या विश्लेषणावरून असे म्हणता येईल की करमाळा तालुक्यातील शेतमालाच्या विक्री व्यवस्थेतील दोष कमी करण्यासाठी करमाळा नियंत्रित बाजारपेठेने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

...